जून २०१३ । किंमत ₹ १०

# लोकराज्य

## दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण...

### उच्च व तंत्रशिक्षण



वर्ष ६५ वे | अंक ३ | जून २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — मीनल जोगळेकर
- सहसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके, दत्तात्रय कोकरे
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई



संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हूतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

**email :** lokrajya2011@gmail.com
lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी

**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

**e-mail :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com


# अंतरंग

## आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांचे जाळे उभारणार



उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या सुविधा या सुसज्ज आणि स्पर्धात्मक करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने चालवला आहे. शासकीय, तसेच खासगी शैक्षणिक संस्थांद्वारे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उच्च आणि तंत्रशिक्षणविषयक शैक्षणिक संस्थांचे जाळे राज्यात उभारण्यात येईल.

- मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

७

## दर्जा राखणे बंधनकारक



महाराष्ट्रासारखे राज्य जेव्हा स्वत:स 'ग्लोबल राज्य' म्हणून एका विशिष्ट उंचीवर नेण्याचा निर्धार करते तेव्हा दूरगामी व भविष्याचा वेध घेण्याची क्षमता अंगी बाणवावीच लागते. तशी ती महाराष्ट्रात असल्याने महाराष्ट्राकडे आज देशाचे 'एज्युकेशन हब' म्हणजेच शैक्षणिक केंद्र म्हणून पाहिले जाते.

- उपमुख्यमंत्री अजित पवार

८



| | | |
|---|---|---|
| दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण | संपदकीय | ५ |
| देशाला नेतृत्व देण्याची क्षमता | राज्यपाल के. शंकरनारायणन | ६ |
| गुणात्मक वाढ | डी. पी. सावंत | ११ |
| प्रगतीची नवी शिखरे... | संजय कुमार | १२ |
| संपूर्ण बदलाच्या दिशेने... | डॉ. नरेंद्र जाधव | १४ |
| सर्वसमावेशक आणि समान शिक्षण हवे | सुखदेव थोरात | १६ |
| गुणवत्ता आणि दर्जा | -- | १८ |
| आम्ही बदलू जगासोबत | -- | २१ |
| महा-कौशल्यनिर्मिती | -- | २४ |
| गुणवत्तावाढीचे नवे क्षितिज | डॉ. अभय वाघ | ३० |
| अधिकारी घडवणारी संस्था | डॉ.म.बा.भिडे | ३२ |
| संधी आणि साधन | -- | ३३ |
| शिष्यवृत्ती | मदन मोरवे | ३५ |
| आश्वासक आणि सुरक्षित निवारा | -- | ३६ |
| स्वत:च्या पायावर सन्मानाने | -- | ३८ |
| मुलींचे आयटीआय | सुधा महाजन | ३९ |
| सूत्रधाराच्या शोधाचे शास्त्र | -- | ४० |
| भाषाकौशल्याची किमया | डॉ. सुनीलकुमार लवटे | ४१ |
| भरपूर संधी... पुरेपूर समाधान | -- | ४४ |
| कष्टाची पायवाट यशाचा राजमार्ग | -- | ४६ |
| विद्यापीठांचे विद्यापीठ | डॉ. राजपाल हांडे | ४९ |
| मराठी मुद्रेचे वास्तव | तुकाराम जाधव | ५१ |
| तंत्राच्या कोंदणातील प्रतिभा | श्रीराम खाडिलकर | ५४ |
| दृष्टीक्षेपात उच्च व तंत्रज्ञान | -- | ५६ |
| एका विस्मृत विद्यापीठाचे संस्मरण | डॉ. सूरज अ. पंडित | ५८ |




## खाजगी विद्यापीठांमुळे शिक्षणक्षेत्रात क्रांती

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, राजेश टोपे यांची विशेष मुलाखत

९






## टॉपरच्या मदतीला लोकराज्य

लोकराज्यचा मी नियमित वाचक आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना लोकराज्यची मोलाची मदत होत असते. लोकराज्यचा प्रत्येक अंक एका विशिष्ट विषयावर/ विभागावर आधारित असल्यामुळे या विषयाची विश्लेषणासह इत्थंभूत माहिती प्राप्त होते. त्यामुळे लोकराज्यचे सर्व अंक संग्राह्य झाले आहेत. लोकराज्यने स्पर्धा परीक्षेची गरज अचूक ओळखली आहे. समकालीन घटना, घडामोडी, प्रश्न, विकास योजना यांचे प्रतिबिंब त्यात उमटलेले असते. युपीएससीच्या मुलाखतीत यावेळी महाराष्ट्रातील दुष्काळाशी संबंधित प्रश्न विचारले गेले. यासाठी मला मे २०१२ चा टंचाईवर मात या अंकाची खूप मदत झाली.


**- कौस्तुभ दिवेगावकर,** नागरी सेवा परीक्षेत राज्यात १ ला तर देशात १५ वा

---

### उचित आदरांजली

महाराष्ट्रातील कृषी जीवनाला वेगळी आणि विधायक दिशा देण्याचे क्रांतिकारी कार्य करणारे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृतीला 'लोकराज्य'चा डिसेंबर २०१२ चा अंक समर्पित करण्यात आला आहे. स्व. वसंतरावजी यांचे महाराष्ट्रावरील ऋण लक्षात घेता लोकराज्यने त्यांना वाहिलेली आदरांजली सर्वार्थाने उचित आहे. स्व. नाईकसाहेबांचा मला सुमारे चार वर्षांचा सहवास लाभला होता. त्यांच्या कार्यालयात काम करताना त्यांच्या स्वभावाचे अनेक संस्मरणीय पैलू मी पाहिलेले आहेत. कृषी क्षेत्र हा त्यांचा आवडता विषय. परंतु शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचाही त्यांचा सखोल अभ्यास होता. पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी व्हावा हे जे स्वप्न पाहिले होते ते आज साकार झाल्याचे प्रसादचिन्ह आपण पाहत आहोत. महाराष्ट्र राज्य सर्वार्थाने देशामध्ये प्रथम क्रमांकाचे राज्य व्हावे ही त्यांची मनीषा होती व त्यांनी घातलेल्या मजबूत पायावर आज आपले राज्य उभे आहे. अशा कर्तृत्ववान महाराष्ट्र पुत्राला यथोचित आदरांजली वाहण्यासाठी आपण लोकराज्यचा विशेषांक प्रसिद्ध केला याबद्दल आपणास धन्यवाद दिले पाहिजेत. अंकातील सर्वच लेख वाचनीय व स्व. वसंतराव नाईकसाहेबांच्या कर्तृत्वाची आठवण करून देणारे आहेत. त्यामुळे हा विशेषांक संग्राह्य झाला आहे.


**- मधु मंगेश कर्णिक,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ




### वैविध्यपूर्ण

लोकराज्यचे सर्व अंक वैविध्यपूर्ण आहेत. शासकीय योजनांबरोबर इतर अनेक विषयांना आपण न्याय देत आहात. आरोग्य, वसंतराव नाईक विशेषांक, वन विशेषांक हे अंक खूप भावले. आर्टपेपर, रंगीत फोटो व आकर्षक मांडणीमुळे अंक उठावदार झाले आहेत. आपले अभिनंदन.

**- अ. पां. देशपांडे**




### प्रेरणादायी

लोकराज्यचा वनसमृद्धी विशेषांक वाचला. वनसंवर्धनाची गरज या अंकातून सुबोधरीत्या व्यक्त झाली आहे. शासकीय ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यात लोकराज्यचे योगदान अनमोल आहे. अंकाचे स्वरूप व विषय मांडणी उत्तम झाली आहे. लोकराज्यपासून आम्हाला नेहमीच प्रेरणा मिळत आली आहे.

**- हेमंत लक्ष्मण पवार,** मिरज

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण



जून महिन्याचा प्रारंभ झाला की सर्वांनाच हायसे वाटू लागते. तीव्र उन्हाळ्याच्या आणि पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर जून महिन्यातील मान्सूनचे आगमन सुखदायक व दिलासादायक असते. पावसाच्या आगमनासोबतच जून महिन्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे नव्या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ. याच पार्श्वभूमीवर आम्ही जूनचा लोकराज्य, उच्च व तंत्रशिक्षण विशेषांक म्हणून प्रकाशित करत आहोत.

महाराष्ट्राला उच्च शिक्षणाची उज्ज्वल परंपरा आहे. प्राचीन काळापासून उच्च शिक्षणासाठी देश-विदेशातील विद्यार्थी महाराष्ट्रात येत असतात. मुंबईच्या बोरिवली राष्ट्रीय उद्यानात असणाऱ्या कान्हेरी गुंफा ह्या या प्राचीन विद्यापीठाच्या अस्तित्वाच्या साक्षीदार आहेत. महाराष्ट्रात इतर ठिकाणी असलेल्या गुंफामध्ये प्रामुख्याने धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य, कला यांचा अभ्यास केला जात असे. मध्ययुगीन कालखंडातील पाठशाळा व मदरसे यामधून तत्कालीन उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत असत. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रसार वेगाने होऊ लागला. त्यात महाराष्ट्राने मोठी आघाडी घेतली. देशातील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक असलेल्या मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७ साली झाली. या विद्यापीठात जगभरातील नवे ज्ञान-विज्ञान, विद्याशाखा यांचे अभ्यासक्रम सुरू झाले. नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि इतर अनेक ठिकाणी कालपरत्वे विद्यापीठांची स्थापना केली गेली. महाविद्यालयांची आणि विविध विद्याशाखांची संख्या जशी वाढत गेली तशी पारंपरिक विद्यापीठांशिवाय कृषी शाखा, अभियांत्रिकी शाखा, आरोग्य विज्ञान, पशुवैद्यकीय शाखा यांच्यासाठीही स्वतंत्र विद्यापीठे स्थापण्यात आली. या सर्वांच्या माध्यमातून महाराष्ट्रात आज उच्च व तांत्रिक शिक्षण संस्थांचे अतिशय भक्कम जाळे विणले गेले आहे. महाराष्ट्रात साधारणत: प्रत्येक तालुक्यात एका तरी विद्याशाखेचे महाविद्यालय आहे. आज महाराष्ट्र राज्य हे देशाचे एज्युकेशन हब म्हणजेच शैक्षणिक केंद्र म्हणून नावलौकिकास आले आहे.

उच्च शिक्षणाची गंगा खेडोपाडी नेण्यात राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि.रा.शिंदे, महर्षी धों.के.कर्वे, पंजाबराव देशमुख यांनी मोलाची कामगिरी बजावली. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजातील उपेक्षित घटकांसाठी उच्च शिक्षणाची कवाडे उघडावीत यासाठी अथक प्रयत्न केले. त्यामुळेच आज महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्राला सामाजिक न्यायाचा चेहरा प्राप्त होऊ शकला. समताधिष्ठित समाजनिर्मिती आणि विकासाच्या समान संधी प्राप्त होण्यासाठी ही बाब महत्त्वाची ठरली.

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षणाच्या विविध शाखांचा विकास, जागतिक पातळीवरील नवे प्रवाह आणि त्यात झालेले व होत असलेले सातत्यपूर्ण बदल लक्षात घेऊन झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण पदवी, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाधारक हे जागतिक दर्जाचे तंत्रज्ञ समजले जातात. विशेषत: माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाराष्ट्रीय युवक-युवतींची कामगिरी नेत्रदीपक ठरत आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योगामध्ये अमेरिकेतील ज्या सिलिकॉन व्हॅलीचा उल्लेख अत्यंत गौरवास्पदरीत्या केला जातो, त्यावर भारतीय विद्यार्थ्यांचे अधिराज्य राहिले असून त्यात महाराष्ट्रीय तरुणांचा वाटा सर्वाधिक आहे.

महाराष्ट्राने व्यवसाय शिक्षणाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सद्य:स्थितीत राज्यातील प्रत्येक ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आहेत. स्थानिक गरजा व स्थानिक उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची निर्मिती व्हावी या अनुषंगाने विविध शाखांमध्ये सहा महिने ते दोन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

भारत हा तरुणांचा देश असून २०३० पर्यंत भारताची कार्यात्मक लोकसंख्या म्हणजेच ३५ वर्षाखालील लोकसंख्या ६८ टक्के राहणार आहे. त्यांच्या साहाय्याने महासत्ता होण्याचे भारताचे स्वप्न साकार होणार आहे. मात्र त्यासाठी या तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या बाबीकडे पंतप्रधानांनी विशेषत्वाने लक्ष पुरविले असून महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी २०.६५ लाख याप्रमाणे २०२२ पर्यंत ४.५ कोटी मनुष्यबळ विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता यात सातत्याने वाढ व्हावी यासाठी भारत सरकार आणि जागतिक बँकेच्या साहाय्याने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.विद्यापीठीय अभ्यासक्रमांमध्ये कालानुरूप बदल, नव्या विद्याशाखांची सुरुवात, परीक्षा पध्दतीत सुधारणा, संशोधनाला चालना, महाविद्यालयांना स्वायत्तता, खाजगी विद्यापीठे आदी अनेक नव्या उपक्रमांवर राज्य शासनाने भर दिला आहे. यामुळे आधीच गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असलेल्या महाराष्ट्रातील या क्षेत्राची झळाळी आणखी वाढणार आहे.

राज्यातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विविध बाबी, पैलूंची इत्थंभूत माहिती देणारे विविध लेख हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. या अंकाच्या निर्मितीसाठी उच्च तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव संजय कुमार आणि उपसचिव डॉ. अभय वाघ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. लोकराज्यच्या इतर अंकाप्रमाणे या अंकाचेही आपण स्वागत कराल असा आम्हाला विश्वास आहे.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-
२२०४१५८५/२२०२७९५६

# देशाला नेतृत्व देण्याची क्षमता

**संशोधन हे विद्यापीठ शिक्षण प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे परंतु तितकेच दुर्लक्षित असे अंग आहे. वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय स्तरावर प्रगती करण्यासाठी संशोधन हे प्रभावी व आवश्यक साधन आहे. मात्र दुर्दैवाने देशातील एक टक्क्यापेक्षाही कमी स्नातक व पदव्युत्तर विद्यार्थी संशोधनाकडे वळतात. बरेच विद्यार्थी आपल्या बायोडाटामध्ये 'आणखी एक गुणवत्ता' जोडणे इतक्या मर्यादित हेतूने संशोधन क्षेत्रात प्रवेश करतात. आज प्रामुख्याने लोकांच्या जीवनाशी थेट निगडित क्षेत्रांमध्ये तसेच समाज कल्याणाच्या क्षेत्रामध्ये संशोधन होण्याची गरज आहे. सांगताहेत राज्यपाल के. शंकरनारायणन**

भारतातील उच्च शिक्षण प्रणालीपुढे सर्वसाधारणपणे तीन प्रमुख आव्हाने आहेत. उपलब्धता, परवडण्याजोगे शुल्क व गुणवत्ता. या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करण्याचे आपले उद्दिष्ट आहे.

देशातील उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीचे प्रमाण २००६-०७ साली १२.३ टक्के इतके होते. ते २०११-१२ या शैक्षणिक वर्षात १७.९ टक्के इतके वाढले. ही वाढ समाधानकारक आहे. जागतिक सरासरीच्या (२६ टक्के) तुलनेत पाहिल्यावर हे प्रमाण कमी आहे. त्यामुळे गेल्या पाच वर्षातील वृद्धीचा दर बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये कायम राखल्यास देशाला हे प्रमाण निश्चितच वाढविता येईल.



उच्च शिक्षणाचे क्षेत्र आज खाजगी, कॉर्पोरेट व विदेशी शिक्षण संस्थांकरिता खुले झाले आहे. अलीकडच्या काळात देशातील सर्वच भागांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. यापैकी काही संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबद्दल आग्रही आहेत. अनेक संस्था आकर्षक अभ्यासक्रम उपलब्ध करून देत आहेत. या सर्व बाबींमुळे आता पारंपरिक विद्यापीठांमध्येदेखील शिक्षणाची गुणवत्ता वृद्धिंगत करण्याबद्दल जागरूकता निर्माण होत आहे.

पारंपरिक विद्यापीठांपुढे विद्यार्थ्यांना आकर्षक अभ्यासक्रम देऊ करण्याचे, वेगवेगळे विषय एकत्र करण्याची मुभा देण्याचे व शिक्षणाचे शुल्क विद्यार्थ्यांना परवडेल इतके ठेवण्याचे आव्हान आहे.

आज अनेक महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांचा तुटवडा ही मोठी समस्या आहे व त्यावर लवकर उपाय शोधणे आवश्यक आहे. त्यासोबतच हुशार व मेधावी विद्यार्थी शिक्षकी पेशात येण्यासाठी अनुकूल वातावरण तयार केले गेले पाहिजे.

**परीक्षा पद्धतीचा फेरविचार**

विद्यार्थ्यांची उपजत क्षमता, विश्लेषण क्षमता व निवडलेल्या विषयातील स्वाभाविक कल या महत्त्वाच्या घटकांचे सध्याच्या परीक्षा पद्धतीत पुरेसे मूल्यमापन होत नाही.

सद्य:स्थितीत चौकस बुद्धीने विचारणा करणे, एखाद्या विषयाचे चिंतन करणे व नावीन्यपूर्ण दृष्टिकोन ठेवून विचार करणे यांसारख्या गोष्टी करायला विद्यार्थ्यांना फारसा वाव मिळत नाही. त्यामुळे सध्याच्या परीक्षा पद्धतीचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

**समाजाभिमुख संशोधन**

विद्यापीठे आणि समाज यामध्ये सातत्याने संवाद सुरू असला पाहिजे. आज दुष्काळ, पाणीटंचाई, कुपोषण, कृषी क्षेत्रातील अल्प उत्पादकता, अशाश्वत विकास या समस्यांच्या निराकरणासाठी विद्यापीठांकडे आशेने पाहिले जात आहे. विद्यापीठे ज्ञान आणि अनुभवजन्य ज्ञानाची केंद्रे असल्यामुळे स्वाभाविकच समाजाला विद्यापीठांकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

**व्यवसायाभिमुख शिक्षण :**

अधिकांश विद्यार्थ्यांचे पदवी प्राप्त करून नोकरी मिळवणे हे एकमात्र स्वप्न असते. मात्र दुर्दैवाने पदवी प्राप्त करूनदेखील अधिकांश विद्यार्थ्यांना कुठलाही रोजगार मिळत नाही व त्यांच्या वाट्याला निराशा येते. देशातील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे स्नातक वगळता उर्वरित जवळ-जवळ ८५ टक्के स्नातक रोजगारक्षम नाहीत. कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या अभावी देशातील शिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे.

नव्याने भरती झालेल्या उमेदवारांना कौशल्यपूर्ण शिक्षण देऊन, रोजगारक्षम करण्यासाठी अनेक उद्योजकांनादेखील सुरुवातीलाच प्रशिक्षण आयोजित करावे लागते व त्यासाठी पैसाही खर्च करावा लागतो. सध्याच्या शिक्षणव्यवस्थेमध्ये ही मोठीच त्रुटी असून ती दूर करणे गरजेचे आहे.


कौशल्यवर्धन व व्यवसाय शिक्षणाला अग्रक्रम मिळाला पाहिजे. जर्मनीमध्ये अत्याधुनिक व्यवसाय देणाऱ्या जागतिक दर्जाच्या अनेक संस्था आहेत. त्यामुळे उत्पादन क्षेत्रात जर्मनी आज महासत्ता गणली जाते.

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १२ व्या पंचवार्षिक योजनेअखेर ५ कोटी लोकांना कौशल्यवर्धन शिक्षण देण्याचे उद्दिष्ट देशापुढे ठेवले आहे. हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून भारत सरकारने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची सध्या असलेली संख्या वाढविण्याचे, अस्तित्वात असलेल्या संस्थांचे आधुनिकीकरण करण्याचे तसेच देशभर कौशल्य विकास केंद्रे व प्रगत शिक्षण संस्था सुरू करण्याचे ठरविले आहे.

महाराष्ट्रानेदेखील कौशल्यवर्धन शिक्षणासाठी जागतिक दर्जाची राज्यस्तरीय संस्था सुरू करण्याची हीच योग्य वेळ आहे. अशाप्रकारच्या संस्थेच्या माध्यमातून आपले कौशल्य शिक्षणाचे राष्ट्रीय उद्दिष्ट साधण्याच्या कामी निश्चितच मदत होईल. या कार्यात उद्योग-जगत, चेंबर्स ऑफ कॉमर्स व कामगार संघटनांचेदेखील सहकार्य घेतले पाहिजे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रणी राज्य आहे. कौशल्याधारित शिक्षणाच्या क्षेत्रातदेखील राज्य देशाला नेतृत्व प्रदान करू शकते.

**शब्दांकन : उमेश काशिकर,**
**मा. राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क : ९९२०८९९०६८**

# आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांचे जाळे उभारणार



आजचा काळ विज्ञानाधिष्ठित, उच्च तंत्रज्ञानाशी निगडित असा आहे. जग तांत्रिकदृष्ट्या वेगाने वाटचाल करीत आहे. भारतासारख्या देशाला भविष्यातील महासत्ता बनायचे असेल, तर विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि आधुनिक विज्ञानाच्या नवीन शाखांची कास धरावी लागेल, याला कोणताही पर्याय नाही. अर्थातच यासाठी जागतिक स्पर्धेत उतरू शकेल, असे उच्चप्रशिक्षित, स्पर्धाक्षम आणि कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागेल. या दृष्टीने उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या सुविधा या सुसज्ज आणि स्पर्धात्मक करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने चालवला आहे. शासकीय, तसेच खासगी शैक्षणिक संस्थांद्वारे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उच्च आणि तंत्रशिक्षणविषयक शैक्षणिक संस्थांचे जाळे उभारण्याचा मनोदय आहे. सांगताहेत, **मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण**

एक लक्षात घेतले पाहिजे की आता यापुढील समाजरचना आणि अर्थव्यवस्था ही ज्ञानाधिष्ठित असणार आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात माहिती आणि ज्ञानाला संपत्तीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यामुळे पारंपरिक शिक्षणाच्यापुढे जाऊन आता नवनवीन विद्याशाखांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी मोठ्या प्रमाणात करावी लागणार आहे.

उद्योग, अर्थविश्व, गुंतवणूक आदी क्षेत्रात जगाच्या वेगवेगळ्या भागातून महाराष्ट्राकडे गुंतवणुकीचा ओघ वाढतो आहे. 'मिहान' प्रकल्पामुळे नागपूर किंवा विदर्भाचाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाला वेगळी दिशा मिळणार आहे. बोईंगसारख्या कंपन्या आकर्षित होऊ लागल्या आहेत. पुणे परिसरात वाहन उद्योग भरभराटीला आला आहे.

अर्थातच या सर्व प्रकल्पांची कुशल, उच्चशिक्षित मनुष्यबळाची आणखी मागणीही मोठी असणार आहे. त्यांना आवश्यक असलेले हे मनुष्यबळ राज्यातच उपलब्ध झाले पाहिजे, म्हणजे त्यामुळे राज्यातील युवक-युवतींना रोजगाराचे साधन उपलब्ध होऊ शकेल. यापुढील अर्थव्यवस्था ही ज्ञानाधिष्ठित राहणार असल्याने शिक्षणाच्या पुढे जाऊन नवनवीन विद्याशाखांचे शिक्षण देणाऱ्या संस्था उभाराव्या लागतील. अलीकडेच राज्यात तीन ठिकाणी राष्ट्रीय विधी विद्यापीठे स्थापन करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो याचेच द्योतक आहे.

राज्यनिमिर्तीचा मंगलकलश महाराष्ट्रात आल्यानंतर ज्या विषयांकडे अत्यंत दूरदृष्टीने लक्ष पुरवले त्यात उच्च शिक्षणाचा क्रमांक वरचा लागतो. यामुळेच महाराष्ट्रात उच्च व तंत्रशिक्षण धोरणाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या दोन्ही क्षेत्रांमध्ये मराठी माणसाने मोठी आघाडी घेतली आहे. उद्योजकता, कष्टाळू वृत्ती, चोख कामाची शाश्वती, वेगळा विचार करण्याची क्षमता आणि तांत्रिक सक्षमता यामुळे मराठी माणूस जागतिक पातळीवर ठसा उमटवत आहे.

छत्रपती शाहू महाराजांसारख्या द्रष्ट्या विचारवंताने २० व्या शतकाच्या प्रारंभीच व्यवसायाभिमुख तंत्रशिक्षणाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली होती. ती परंपरा पुढे नेत बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, मॉलिक्युलर बायोलॉजी, संगणक विज्ञान अशा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा समावेश महाराष्ट्रातील आघाडीच्या विद्यापीठांनी अभ्यासक्रमात केला आहे. जिल्हा पातळीवरच्या महाविद्यालयांनीही विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे मानांकने मिळवली आहेत.

पदवी घेतलेला विद्यार्थी स्पर्धेला समर्थपणे तोंड देऊ शकेल, याची काळजी विद्यापीठांनी घेऊन त्या दृष्टीने सक्षम झाले पाहिजे. राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये जागतिक दर्जाची व्हावीत व देशात येऊ घातलेल्या परदेशी विद्यापीठांचे आव्हान त्यांना पेलता यावे, असे प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी अभ्यासक्रमात बदल करणे, उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या नियुक्त्या करणे, महाविद्यालयात व विद्यापीठात संशोधनासाठी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, आदी उपक्रमांना राज्य शासनाने प्राधान्य दिले आहे.

आधुनिक शिक्षण राज्यात देण्यात येत असले तरी त्यात सुधारणेसाठी बराच वाव आहे. स्थानिक परिस्थिती आणि उद्योगधंद्यांना लागणारे तांत्रिक मनुष्यबळ लक्षात घेता अशा प्रकारचे अभ्यासक्रम विद्यापीठांनी सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. सर्वच क्षेत्रात झपाट्याने प्रगती होते आहे. विद्याशाखांमध्ये नवनवी क्षेत्रे निर्माण होत आहेत. संशोधनाचे क्षेत्र विस्तारते आहे. एकीकडे नवनव्या विद्याशाखा आणि शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात उभ्या राहताना दिसतात. मात्र, या संस्थांमधून ज्यांनी नवीन पिढी घडवायची अशा तज्ज्ञ, प्रशिक्षित, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य यांची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. यासाठी बुद्धिमान विद्यार्थ्यांनी अध्यापनाच्या क्षेत्राकडे वळणे आवश्यक आहे. विद्यार्जनाप्रमाणेच विद्यादानही महत्त्वाचे क्षेत्र आहे. यामुळे एक करिअर म्हणूनही युवक-युवतींनी अध्यापन क्षेत्राकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जग दाराशी आले आहे. जग हे वैश्विक खेडे बनले आहे. यापुढील समाजरचना आणि अर्थव्यवस्था ही ज्ञानाधारित असणार आहे. या सर्वांचा डोळसपणे विचार करून आपल्यापैकी प्रत्येकाला जीवनाची दिशा निश्चित करायची आहे. तरुण पिढीने हे आव्हान पेलण्याची तयारी करून तशी क्षमता स्वत:मध्ये निर्माण केली पाहिजे. शासन सदैव त्यांच्या पाठीशी राहील.

**शब्दांकन : सतीश लळीत**, मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी

# दर्जा राखणे बंधनकारक

महाराष्ट्रासारखे राज्य जेव्हा स्वत:स 'ग्लोबल राज्य' म्हणून एका विशिष्ट उंचीवर नेण्याचा निर्धार करते तेव्हा दूरगामी व भविष्याचा वेध घेण्याची क्षमता अंगी बाणवावीच लागते. तशी ती महाराष्ट्रात असल्याने महाराष्ट्राकडे आज देशाचे 'एज्युकेशन हब' म्हणजेच शैक्षणिक केंद्र म्हणून पाहिले जाते.




**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

जगातील प्रमुख विकसित देशांच्या प्रगतीला तंत्रज्ञानाने मोठा हातभार लावला आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील तंत्रज्ञ आणि उच्च श्रेणीचे कौशल्य प्राप्त केलेल्या मनुष्यबळाची निर्मिती यांकडे या देशांनी प्राधान्याने लक्ष पुरविले आहे. उच्च तांत्रिक शिक्षण, संशोधन यासाठी सातत्याने नवी धोरणे, निर्णय, प्रकल्प राबवले आहेत. महाराष्ट्रातील उच्च तंत्रशिक्षणानेदेखील ही दिशा पकडल्याचे दिसून येते.

१८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि त्यातून आधुनिक शिक्षणाचा पाया महाराष्ट्रात रोवला गेला. महाराष्ट्रामध्ये शिक्षणाच्या संधी समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचाव्यात यासाठी अनेक समाजसुधारक, राष्ट्रीय नेते यांनी अथक प्रयत्न केले. महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत नेली. महाराष्ट्राला पुरोगामी, समन्वयवादी, आधुनिक आणि विज्ञानाधिष्ठित करण्यासाठी या महामानवांच्या प्रयत्नांचा मोठाच हातभार लागला आहे.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांनी उच्च तंत्रशिक्षणाच्या महत्तेकडे विशेष लक्ष पुरविले. स्व.वसंतराव नाईक यांच्या काळात कृषी विद्यापीठांची मुहूर्तमेढ रोवली गेली. जेष्ठ केंद्रीय नेते कृषिमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्राला क्रमांक एकचे राज्य बनविण्यासाठी, उच्च तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व अचूक ओळखून; अनेक उपक्रम व योजना राबवण्याचे निर्णय घेतले. माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व दूरदृष्टीने जाणून घेऊन बारामती येथे माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण-प्रशिक्षण देणारी व उत्तम गुणवत्ता असणारी अद्ययावत शिक्षणसंस्था उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. आज या संस्थेतील अनेक विद्यार्थी नामांकित उद्योगांमध्ये 'निर्मिती-विकास-संशोधन' प्रक्रियेत सक्रिय सहभाग देत आहेत. गेल्या १२ ते १३ वर्षात पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या उच्च तांत्रिक शिक्षण विभागाने अनेक महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे.

विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांना विशिष्ट गुणवत्ता व दर्जा राखण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. शैक्षणिक गुणवत्ता जागतिक तोडीची व्हावी यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. संशोधनामुळे विकासाच्या नव्या वाटा उजळत असल्याने संशोधन कार्यास प्राधान्य देऊन इच्छुक विद्यार्थ्यांना दरमहा साडेसहा हजार रुपये शिष्यवृत्ती देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

केंद्रीय सनदी सेवांमध्ये अधिकाधिक महाराष्ट्रीय मुले उत्तीर्ण व्हावीत म्हणून नाशिक, अमरावती येथे अतिरिक्त सनदी परीक्षापूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रमाची अंमलबजावणी यशस्वीपणे होत असून त्यामुळे शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेत व दर्जात तसेच संशोधन कार्यात वाढ झाली आहे. विद्यापीठाच्या आधुनिकीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकेल असा महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याचा नवा मसुदा तयार करण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकण्यात आले आहे.

तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या दृष्टीने सक्षम करून त्यांना कोणतेही आव्हान पेलता येणे शक्य व्हावे म्हणून कौशल्य विकास कार्यक्रमावर आम्ही विशेष लक्ष केंद्रित केले आहे. आधुनिक काळाशी सुसंगत असे 'स्मार्ट क्लासरूम' आम्ही ९५ आयटीआयमध्ये सुरू केले आहे. टाटा समूहाच्या इंडियन हॉटेल्स या कंपनी सोबत सहकार्य करून आतिथ्यसेवा क्षेत्रात 'ई-शिक्षण' उपक्रमाची सुरुवात केली आहे. प्रत्येक तालुक्यात व्यवसायाभिमुख शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या आयटीआयची स्थापना करून स्थानिक गरजा भागविणारे आणि स्थानिक उद्योगांना लागणारे तांत्रिक मनुष्यबळनिर्मितीस साहाय्यभूत ठरणारे असंख्य अभ्यासक्रम सुरू केले आहेत. तरुण -तरुणींनी याचा लाभ घेतला तर त्यांच्यापुढे असंख्य संधी स्वत:हून येऊ शकतात, असे या अभ्यासक्रमांचे महत्त्व आहे.

राज्याने विविध प्रोफेशनल (व्यावसायिक), अभ्यासक्रमांसाठी सीईटी (कॉमन एन्ट्रन्स टेस्ट सामायिक प्रवेश परीक्षा) प्रभावीपणे, अचूकपणे व कौशल्याने राबवून देशात स्वत:चे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. या सीईटीमुळे एकीकडे पारदर्शकता आली असून दुसरीकडे मुलांच्या गुणवत्तेचाही कस लागत आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी गरीब, गरजवंत विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. नवी वसतिगृहे बांधण्यात येत असून जुन्या वसतिगृहांची क्षमता वाढविण्यात येत आहे. आमचे सहकारी उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी खाजगी विद्यापीठांच्या स्थापनेसाठी धडाडीने व सातत्याने पाठपुरावा केल्याने, ही विद्यापीठे आता दृष्टिक्षेपात आली आहेत. खाजगी विद्यापीठे ही महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात नव्या क्रांतीची नांदी ठरणार आहेत. यामुळे आधुनिक काळाशी सुसंगत आणि अत्यावश्यक असणारे अभिनव अभ्यासक्रम आणि संशोधनासाठी जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

❒❒

# खाजगी विद्यापीठांमुळे शिक्षणक्षेत्रात क्रांती



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,
**राजेश टोपे**
यांची विशेष मुलाखत

शिक्षणाचे माहेरघर म्हणून महाराष्ट्र देशात प्रसिद्ध आहे. त्यातच उच्च व तंत्रशिक्षणाची व्याप्ती आणि प्रगतीची कास महाराष्ट्राने सतत धरली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सध्या आधुनिक शिक्षणाचे धोरण आणि अंमलबजावणीत अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतले आहेत. या विभागाचे मंत्री राजेश टोपे यांनी तीन वर्षांपूर्वी कार्यभार सांभाळल्यानंतर या विभागाने कात टाकली आहे. शिक्षणाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राच्या संस्था आणि अभ्यासक्रमांना अग्रस्थान मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्याविषयी त्यांच्याशी संजय मिस्किन यांनी केलेली ही बातचीत.

**प्रश्न :** टोपे सर, राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सद्य:स्थितीबाबत काय सांगाल?

**राजेश टोपे :** ज्या देशात आणि राज्यात उच्च व तंत्रशिक्षणाची प्रगती झाली त्या देशाने आर्थिक, सामाजिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावर आपली छाप पाडली ही वस्तुस्थिती आहे. उच्च व तंत्रशिक्षणामुळेच मानवी विकास निर्देशांक सुधारण्यास मदत होते. मानव विकास निर्देशांक सुधारला की समाजाच्या सर्व क्षेत्रांची नैसर्गिक प्रगती सुरू होते. विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू होते. महाराष्ट्र याबाबतीत अगदी सुदैवी आहे. या राज्यात शिक्षणाचा विकास आणि प्रगती व्हावी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सामाजिक चळवळ उभी राहिली. अनेक दिग्गज शिक्षणमहर्षी महाराष्ट्रात जन्मले याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांनी लावलेल्या शिक्षणाच्या रोपट्याचा वटवृक्ष सध्या बहरला आहे. सध्या महाराष्ट्र उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात देशात अव्वल स्थानी आहे. देश-विदेशातले शिक्षण येथे उपलब्ध आहे. अनेक संस्था आणि विद्यापीठांत रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची सेवा उपलब्ध आहे. जागतिक दर्जाची ज्ञाननिर्मिती करण्यात महाराष्ट्राची भूमी सक्षम बनली आहे. इथल्या शिक्षणसंस्था बळकट झाल्या आहेत.

**प्रश्न :** पण, देशातल्या सर्वोत्तम विद्यापीठात महाराष्ट्र हल्ली मागे पडल्याचा दावा केला जातो....

**राजेश टोपे :** अजिबात नाही. महाराष्ट्र मागे पडला असे नाही. महाराष्ट्रात अभिमत आणि पारंपरिक विद्यापीठे आहेत. अभिमत विद्यापीठांना स्वायत्तता आहे. तर पारंपरिक विद्यापीठात पारंपरिक शिक्षणाची अमंलबजावणी कायम ठेवावीच लागते. सध्या मुंबई, पुणे, कोल्हापूर या पारंपरिक विद्यापीठांनी मागील २० वर्षांत उच्च व तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. महाराष्ट्राने कायम पदवी शिक्षणाचे गुणोत्तर वाढेल यावर भर दिला. मला सांगायला अभिमान वाटतो की, आपल्या राज्यात १८ ते २१ वयोगटातील पदवीधारक तरुणांची संख्या देशाच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. पण अजूनही त्यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे. एकट्या सरकारकडून ही अपेक्षा पूर्ण व्हावी, ही भूमिका तितकीशी उचित नाही असे माझे मत आहे. त्यासाठी खाजगी विद्यापीठांचा मार्ग सरकारने महाराष्ट्रात मोकळा केला आहे.

**प्रश्न :** खाजगी विद्यापीठांना सुरूवातीला विरोध झाला. सध्या काय स्थिती आहे? त्यातून शिक्षणाच्या क्षेत्रात कशाप्रकारे योगदान लाभेल...

**राजेश टोपे :** शिक्षणाच्या क्षेत्रात सरकारी अनुदानित महाविद्यालये व संस्थांना जागतिक स्पर्धेला साजेशी शिक्षणाची प्रगती साध्य करणे तितके सहज नाही. त्यासाठी खासगी विद्यापीठांची जोड मिळायला हवी. त्यामुळेच महाराष्ट्राने खासगी विद्यापीठ कायदा करण्याचा प्रयत्न केला. पण, आरक्षणाच्या निकषात हा कायदा मागे घ्यावा लागला. सध्या मार्गदर्शक सूचनेनुसार खाजगी विद्यापीठे उभारण्याचा मार्ग सरकारने मोकळा केला आहे आणि या विद्यापीठात ५० टक्के आरक्षण कायम राहील असा नियम केला आहे. पण त्याहून अधिक मला खासगी विद्यापीठांकडून खूप मोठ्या अपेक्षा आहेत. ही विद्यापीठे शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती करतील, असा विश्वास आहे. या विद्यापीठातून नवनवीन ज्ञाननिर्मितीची दालने मोठ्या प्रमाणात उघडतील. जगाचे तंत्रज्ञान, शिक्षण, संशोधन आणि रोजगाराभिमुख शिक्षणाला मोठी चालना मिळवून देण्यात खासगी विद्यापीठे अनन्यसाधारण भूमिका पार पाडतील. अनेक उद्योजकांनी खाजगी विद्यापीठाच्या माध्यमातून लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची तयारी केली आहे.

**प्रश्न :** खाजगी विद्यापीठामुळे सरकारला नेमका काय फायदा होईल?

**राजेश टोपे :** खाजगी विद्यापीठामुळे सरकारला काय फायदा होईल त्यापेक्षा राज्यातल्या शिक्षण क्षेत्रात क्रांती नक्कीच होईल. स्पर्धात्मक शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्याने शिक्षणाचा दर्जा उंचावेल. सरकारला खूप मोठा आधार म्हणून ही विद्यापीठे काम करतील. सध्या सरकारी अनुदानातून शिक्षण संस्था उभ्या करणे हे आर्थिकदृष्ट्या अत्यंत जिकिरीचे बनले आहे. त्याला मर्यादाही आहेत. त्यामुळे, खाजगी विद्यापीठांच्या माध्यमातून प्रचंड गुंतवणूक आल्यास मोठी रोजगारनिर्मिती होईल. संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी पार पाडण्यात ही विद्यापीठे योगदान देतील. देशातल्या ११ राज्यांनी खाजगी विद्यापीठाचा कायदा अगोदरच संमत केला आहे. महाराष्ट्रात मात्र त्याला उशीर झाला हे मान्य करावेच लागेल.

**प्रश्न :** प्राध्यापकांच्या संपामुळे अनेक विषयांची चर्चा महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात सुरू झाली... या संपाने सरकारला आव्हानच दिले होते. भविष्यात त्याचे पडसाद उमटतील काय..?

**राजेश टोपे :** अजिबात नाही. प्राध्यापकांचा लांबलेला संप सरकारसमोर आव्हान होता. मात्र, दर्जाच्या बाबतीत काहीही तडजोड करायची नाही. हा निर्धार सरकारने केला. त्यानुसार प्राध्यापकांना एकरकमी १५०० कोटी रुपये देण्याची तयारी सरकारने केली. मात्र, नेटसेट उत्तीर्ण नसलेल्या प्राध्यापकांना पाठीशी घालण्यास सरकारने स्पष्टपणे नकार दिला. सरकारच्या या ठाम भूमिकेमुळेच शिक्षणाच्या दर्जात यापुढे कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश सरकारने प्राध्यापकांना दिला आहे.

**प्रश्न :** तुम्ही उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा कार्यभार सांभाळल्यानंतर कोणत्या प्रमुख बाबींना प्राधान्य दिले?

**राजेश टोपे :** मागील तीन वर्षात राज्यातल्या पदवीधरांचे गुणोत्तर वाढवण्याची मोहीम हाती घेतली. तीन वर्षापूर्वी राज्याचे गुणोत्तर १,३०० होते. ते सध्या २,१०० इतके वाढले आहे. देशात सर्वाधिक पदवीधरांचे गुणोत्तर महाराष्ट्रात आहे. त्याशिवाय, तंत्रशिक्षण महाविद्यालयांची संख्या दुप्पट करण्यात आम्हाला यश आले आहे. रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी देण्यात या विभागाने गेल्या तीन वर्षांत आमूलाग्र प्रगती केली याचा अभिमान आहे. फोरेन्सिक सायन्समधील पदविका, पदवीचे शिक्षण महाराष्ट्रात उपलब्ध करून दिले. मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे या शाखेचे उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये सुरू केली. फोरेन्सिक सायन्स हे जगातल्या आधुनिक शिक्षणाचे क्षेत्र आहे. प्रचंड व्याप्ती आणि मूल्य असलेले हे शिक्षण आहे. त्याशिवाय, राज्यातल्या युवकांना सनदी अधिकारी होण्याची संधी मिळावी यासाठी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्रांची स्थापना केली. त्यामुळे मराठी मुलांचा लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत उत्तीर्ण होण्याचा टक्का वाढला. पदवी, पदविका आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विविध अभ्यासक्रमाच्या शाखा वाढवल्या. ग्रामीण आणि इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या गरीब होतकरू मुलांना तातडीने रोजगार मिळावा, त्यासाठी त्यांना कुशल तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने आटीआयच्या संस्था तीन शिफ्टमध्ये सुरू केल्या. यामुळे, उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीत तिप्पट विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सहज शक्य झाले.




**प्रश्न :** या सर्व पायाभूत सुविधांची निर्मिती करताना, महत्त्वाकांक्षी प्रकल्प अथवा उपक्रम कशाप्रकारे राबवले?

**राजेश टोपे :** तंत्रशिक्षण संस्थांमध्ये कमवा आणि शिका ही योजना सुरू केल्यामुळे अत्यंत होतकरू विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली. उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रम हाती घेतला. सुमारे ३४० कोटी रूपये खर्च करून जागतिक शिक्षणाच्या स्पर्धेत उच्च व तंत्रशिक्षण नेण्याचा यशस्वी प्रयत्न, या दर्जा सुधार कार्यक्रमाच्या माध्यमातून साध्य झाला आहे. संशोधन कार्यात महाराष्ट्र मागे असल्याचे बोलले जात होते. हे काही अंशी खरेही होते. त्यावर उपाय म्हणून आम्ही पीएचडी करणाऱ्यांच्या संख्येत वाढ व्हावी म्हणून, त्यांना अनेक अनुदाने दिली. त्याचा परिणाम महाराष्ट्रातल्या मुलांनी संशोधनात रस घेतला. संशोधनासाठी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अनेक पटीने वाढली.

**प्रश्न :** राज्यामध्ये राबवण्यात येणाऱ्या तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रमाबद्दल आपले काय मत आहे?

**राजेश टोपे :** अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनामध्ये उत्कृष्टता आणण्याकरिता तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रम हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. हा अत्यंत महत्त्वाकांक्षी व प्रभावशाली कार्यक्रम भारत सरकारद्वारे जागतिक बँक अर्थसाहाय्याने हाती घेण्यात आलेला आहे. हा संपूर्ण प्रकल्प एकूण तीन टप्प्यात आहे. पहिला टप्पा राज्यामध्ये एप्रिल २००३ ते जून, २००८ या कालावधीत राबवण्यात आला. तंत्रशिक्षणामध्ये उत्कृष्टता आणून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञ निर्माण करून त्याद्वारे, भारत हा जगात विकसित राष्ट्र म्हणून आत्मविश्वासाने उभा राहण्यासाठी; मदत करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पांतर्गत संस्थांना सुसज्ज ग्रंथालय, शैक्षणिक इमारती, वर्गखोल्या व नवीन प्रयोगशाळा, विविध प्रयोगशाळांचे नूतनीकरण, नेटवर्किंग तसेच अद्ययावत फर्निचर यासाठी खर्च करण्यात आला, यामुळे शैक्षणिक वातावरणामध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आहे. तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रम-टप्पा दुसरा संपूर्ण देशामध्ये ऑगस्ट, २०१० ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत राबवण्यात येत आहे. हा प्रकल्प अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयांकरिता राबवण्यात येणार असून या टप्प्यामध्ये राज्यातील पहिल्या फेरीमध्ये १६ संस्था तसेच दुस-या फेरीमध्ये २ संस्था याप्रमाणे एकूण १८ संस्थांची निवड झाली आहे.

❑ ❑



**सावित्रीबाई फुले पुरस्कार २०१२-१३ आणि 'जागर जाणिवांचा' अभियानांतर्गत पारितोषिक वितरण सोहळ्याच्या प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे, खा. सुप्रिया सुळे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळूकर उपस्थित होते.**

# गुणात्मक वाढ

उच्च शिक्षणामध्ये दर्जात्मक व गुणात्मक वाढ करण्यासाठी, अधिनियम सुधारण्यासाठी व विद्यापीठाचे विभाजन करण्यासाठी अनुक्रमे डॉ. अनिल काकोडकर, डॉ. अरुण निगवेकर व डॉ. राम ताकवले यांच्या समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षणामध्ये दर्जात्मक व गुणात्मक वाढ करण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ अणुतज्ज्ञ व अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीचे गठन केले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या अधिनियमात उदा. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अधिनियम इत्यादीसारखे कालानुरूप नवीन अधिनियम तयार करण्यासाठी; डॉ. अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यकारी समितीचे गठन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यात नवीन विद्यापीठे स्थापन करावी किंवा विद्यापीठांचे विभाजन करावे किंवा पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे व पदव्युत्तर आणि संशोधनाचे कार्य विद्यापीठाकडे ठेवावे याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी डॉ. राम ताकवले माजी कुलगुरू, यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यकारी समितीचे गठन करण्यात आले आहे.

वरील तीनही समित्यांचे अहवाल शासनास प्राप्त झाले असून या समित्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी याबाबत तज्ज्ञ उपसमितीचे गठन करण्यात आले आहे.



डी.पी.सावंत
उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी विभागीय स्तरावर मुस्लीम विद्यार्थ्यांसाठी व तसेच सर्व समाजघटकांसाठी उपलब्ध केंद्रांचे सक्षमीकरण करून त्यांची संख्या वाढवण्यात यावी. राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी केंद्रीय नागरी सेवेमध्ये दाखल व्हावेत, या उद्देशाने मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर या ठिकाणी राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (आयएएस पूर्व प्रशिक्षण केंद्र) सुरू करण्यात आल्या आहेत. मुंबईमध्ये या केंद्राची सुरुवात १९७९-८०मध्ये करण्यात आली होती. भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये (IAS, IPS, IFS) महाराष्ट्रातील होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम व परीक्षापूर्व मार्गदर्शन यांचे इत्थंभूत प्रशिक्षण मिळण्याकरिता व त्यानुसार संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील उमेदवारांचा जास्तीत जास्त सहभाग होऊन, महाराष्ट्रातील उमेदवारांची भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने, या केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राच्या माध्यमातून अर्हताप्राप्त उमेदवारांना संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकरिता प्रशिक्षण व मार्गदर्शन तज्ज्ञांकडून केले जाते. त्यांच्याकरिता वसतिगृह, अभ्यासिका, तज्ज्ञ शिक्षक, संदर्भ पुस्तिका ग्रंथालय, तासिका तत्त्वावर तज्ज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन व प्रशिक्षण तसेच तत्सम सर्व सोयीसुविधा या केंद्रामार्फत पुरवण्यात येतात.

यशस्वी उमेदवारांची आकडेवारी दरवर्षी वाढत असल्याचे आपणांस दिसून येत आहे. त्यामुळे याच धर्तीवर आता नाशिक, अमरावती या दोन ठिकाणी आएएएस पूर्वप्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज या महापुरुषांचे अलिखित, अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याकरिता शासनाने तीन समित्यांची स्थापना केली आहे. प्रत्येक समितीमध्ये एक स्वतंत्र सदस्य सचिव असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीवर श्री. डोळस व उर्वरित दोन समित्यांवर श्री. हरी नरके हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने सन २०१० पर्यंत २२ खंड प्रकाशित केले आहेत.

महात्मा जोतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समितीने आतापर्यंत एकूण १३ ग्रंथांचे संपादन आणि भाषांतर करून घेतले आहे.

**शब्दांकन : सुबोधिनी घरत**

**मागील १० ते १२ वर्षापासून स्पर्धापरीक्षेच्या मार्गदर्शनासाठी असलेल्या राज्य शासनाच्या संस्थांतील प्रशिक्षणामुळे संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन भारतीय प्रशासकीय, पोलीस व वन आणि संलग्न सेवेमध्ये महाराष्ट्रातून पुढीलप्रमाणे उमेदवारांची निवड झाली आहे.**

| वर्ष | भारतीय प्रशासकीय सेवा | भारतीय वन सेवा | भारतीय पोलीस सेवा | संलग्नित सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ३ | १ | ७ | १५ | २६ |
| २००९-१० | ३ | २ | ५ | ११ | २१ |
| २०१०-११ | ५ | ३ | ६ | १४ | २८ |
| २०११-१२ | ३ | ३ | ६ | ८ | २० |

## नवे निर्णय-नवी दिशा

- महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची स्थापना
- स्किल डेव्हलपमेंट मिशनची स्थापना
- राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आयोगाची स्थापना
- तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी स्थापण्याचा निर्णय
- तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम
- अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात व्यावसायिक शिक्षण संस्था कार्यान्वित
- विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय
- ललितकला विद्यापीठ स्थापन्याचे प्रस्तावित
- पर्यावरण हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करणे
- जागतिक स्तरावरील शैक्षणिक कार्यक्रम विद्यापीठात सुरू करणे
- मुलींसाठी वसतिगृह स्थापन करणे

# प्रगतीची नवी शिखरे...

**विविध नावीन्यपूर्ण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षणाने नव्या शिखराकडे झेप घेतली आहे.**

**संजय कुमार**
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

राज्याने ठरविलेल्या आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. गुणवत्तापूर्ण उच्च व तंत्रशिक्षणाची वाढ करणे व त्यासाठी सुयोग्य मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी या विभागावर सोपवण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षांत राज्याने उच्च व तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात उंच झेप घेतली आहे. उच्च व तंत्रशिक्षण यंत्रणेमार्फत विविध विद्याशाखा व व्यावसायिक क्षेत्रातील प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर व डॉक्टरेट स्तरावर राज्यभरातील संस्थातील शिक्षण व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळेच आपले राज्य हे उच्च व तंत्रशिक्षणाबाबतच्या संस्थांची संख्या, विद्यार्थी नोंदणी व प्रवेशाच्या मानांकनानुसार देशातील अग्रगण्य राज्यांपैकी एक ठरले आहे.

२०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यात औरंगाबाद व मुंबई येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय विधी विद्यापीठ नागपूर येथेही स्थापण्यास तत्त्वत: तयार झाले आहे.

१ एप्रिल २०१३ ला घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यातील खाजगी संस्थाना स्वयंअर्थावलंबी विद्यापीठे (सेल्फ फायनान्स्ड युनिव्हर्सिटीज) स्थापन करण्यासाठी आदर्श मार्गदर्शक तत्त्वे अधोरेखित करून जारी केली आहेत.

राज्यात दोन आयआयआयटी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी-भारतीय माहिती प्रोद्योगिकी संस्था) संस्थापित करण्यात येत असून, पुणे व नागपूर येथे त्या स्थापन करण्यात येत आहेत. त्यासाठी खाजगी क्षेत्रातून सहयोगी संस्थांची निवड करण्यात आली आहे.

गरिबी, सामाजिक विषमता इ. कारणांमुळे शालेय गळती झालेल्या विद्यार्थ्यांना पर्यायी शिक्षण प्रणाली म्हणून राज्यात १७ सामूहिक महाविद्यालये कार्यान्वित करण्यात येत आहेत.

शासनाने सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था २ पाळीत चालवण्याचा आदेश दिला आहे. औद्योगिक क्षेत्रातील सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व व्यवसाय प्रशिक्षण प्रोव्हायडर हे कार्यक्रम ३ पाळीत चालवून औद्योगिक परिक्षेत्राचा जास्तीत-जास्त लाभ मिळवून देण्यात येत आहे. राज्यातील तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महिवद्यालयात दुसरी पाळी सुरु करण्यांत आलेली आहे. मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे न्याय साहाय्यक विज्ञान महाविद्यालये स्थापन केली आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग सर्वसमावेशक शिक्षणासाठी बांधील आहे. त्यादृष्टीने अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षणाच्या संधी आयटीआयमधून उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी उच्च शिक्षण सहसंचालनालयाच्या मुख्यालयाच्या जागी विद्यार्थिनी वसतिगृह बांधण्याचे शासनाने



ठरविले आहे. यानुसार राज्यात १२ ठिकाणी विद्यार्थिनींसाठी १४ वसतिगृहे बांधण्याचे प्रस्तावित आहे. दुर्बल घटक, अल्पसंख्याक व वंचित घटकांतील विद्यार्थी व महिलांसाठी विद्यापीठ आवारात वसतीगृहे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. कमवा व शिका योजना राज्यातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांत सुरू करण्यात आलेली आहे.

**गुणवत्ता वाढ**

गुणवत्ता मूल्यांकन व पूनर्मुल्यांकन करणे हे राज्यातील विद्यापिठे व उच्च शिक्षण संस्थांना गुणात्मक दर्जा राखण्यासाठी अनिवार्य करण्यात आले आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी शासनाने शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याबाबत धोरण तयार केले आहे.

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी विभागातर्फे पी.एचडी. विद्यार्थ्यांसाठी मासिक रु.६,५००/- शिष्यवृत्ती प्रस्तावित करण्यात आली आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांचे सनदी सेवा परीक्षेतील प्रमाण वाढावे यासाठी रत्नागिरी, नाशिक, गडचिरोली, नांदेड व अमरावती येथे ५ अतिरिक्त सनदी परीक्षापूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्याचे विभागातर्फे प्रस्तावित करण्यात आले आहे.

मुंबई येथील रसायन प्रोद्योगिकी संस्थेला



उच्च व तंत्रशिक्षणाची व्याप्ती वाढविण्याच्या अनुषंगाने गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे.

अभिजन (Elite) संस्थेचा दर्जा बहाल करण्यात आला असून, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे अंतर्गत प्रतियमान (Virtual) वर्ग खोली तयार करण्यात आली आहे. राज्यातील ३ विद्यापीठे, १ अभिमत विद्यापीठ, १५ अभियांत्रिकी विद्यापीठे हे जागतिक बँकेतर्फे प्रायोजित तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रमामध्ये अंतर्भूत आहेत. या प्रकल्पांतर्गत, १५७ नवीकृत प्रयोगशाळा, १६ ई ग्रंथालये स्थापित करण्यात आली आहेत व या संस्थेतील १४९ प्राध्यापक त्यांच्याशी संबंधित शैक्षणिक व संशोधनात्मक बाबींबद्दल जसे पेटंटिंग, अभ्यासक्रम विकास इ. क्षेत्रात विशेष प्रशिक्षण घेत आहेत.

शासन नव्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याचा मसुदा तयार करत असून, या कायद्यामुळे विद्यापीठाच्या आधुनिकीकरणाचा मार्ग प्रशस्त होणार आहे.

सार्वजनिक वाचनालय / ग्रंथालय अनुदानात ५० टक्केची वाढ करण्यात आली असून, अनुदान देण्यापूर्वी अनुदानित ग्रंथालयांचे परीक्षण करून त्याबाबतची शासनाची मंजुरी घेण्यात आली आहे.

**कौशल्य विकास**

व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी रोजगार कौशल्ये विकासाचा कार्यक्रम राबवला जाणार आहे. राष्ट्रीय आराखड्यानुसार, कौशल्ये विकासाच्या त्रिस्तरीय रचनेनुसार विकासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च परिषद, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती व राज्य कौशल्ये विकास संस्था या मध्यवर्ती संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

९५७ व्यवसाय प्रशिक्षण प्रवर्तकांमार्फत रोजगार सुलभ कौशल्य कार्यक्रम राबवण्यात येत आहे. याव्यतिरिक्त स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, हुन्नर ते रोजगार योजना या अंतर्गत अनेक अल्पकालीन अभ्यासक्रम चालविण्यांत येत आहेत.

१५ डिसेंबर, २०१२ रोजी गडचिरोली येथे पहिले पथदर्शी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले. ही योजना सर्व जिल्हे व ४१६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी २०१२-२०१३ दरम्यान वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील २८ शासकीय निवासी शाळा या निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रम शाळात रूपांतरित करण्यात येणार आहेत. राज्यात ४१६ शासकीय व ३५० खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेशक्षमता १,५०,००० असून, आर्थिकदृष्टया महत्त्वाचे ८० अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. १०० पेक्षा अधिक उत्कृष्टता केंद्र (Centres of Excellence) शोधित क्षेत्रात कार्यरत आहेत. राज्यात २५० पेक्षा जास्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासन खाजगी सहयोग पध्दतीने कार्यरत आहेत. प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यातील ५,५०० आस्थापना, ७५,००० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करीत आहेत.

राज्यातील ९५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांत माहिती तंत्रज्ञान साक्षरता वाढावी म्हणून स्मार्ट क्लास रूम तयार करण्यात आल्या आहेत. विभागांतर्गत टाटा समूहाच्या इंडियन हॉटेल्स सोबतच्या सहयोगातून हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात (अतिथ्य सेवा क्षेत्र ) इ-शिक्षण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

**प्रशासकीय सुधारणा**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने क्रमबध्द व प्रशासकीय सुधारणांच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी धोरणात्मक बदल, कार्यकारी आदेश तसेच वैधानिक बदलांना सुरूवात केली आहे. विद्यापीठीय परीक्षा पद्धतीत सुधारणा सुचविण्यासाठी समिती गठित करण्यात आलेल्या समितीचा अंतिम अहवाल शासनाला सादर करण्यात आला. सर्व कुलगुरूंनी समितीच्या शिफारशीची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे अभिवचन राज्यपालांना दिले.



राज्यातील तंत्रशिक्षणाचे सर्व स्तरावतील प्रवेश केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे. मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ऑनलाइन घेण्यात येते.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीची शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. त्यामुळे केंद्र शासनाने दिलेले उद्दिष्ट राज्याने १०० टक्के प्राप्त केले आहे. केंद्रीय शिष्यवृत्ती योजना ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत असल्याने अर्ज प्राप्ती व छाननी, अर्जांची मान्यता व शिष्यवृत्तीची संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अदायगी या बाबी सुलभ झाल्या आहेत.

नामवंत उद्योजक/वैज्ञानिक स्वायत्त, शासकीय व अनुदानित संस्थांच्या व्यवस्थापक मंडळाच्या अध्यक्षस्थानी आहेत. सर्व शासकीय, अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनात संस्था -उद्योग समन्वय कक्ष (Institute Industry Co-ordination Cell) कार्यान्वित आहेत. शैक्षणिक संस्थांत औद्योगिक विशेषज्ञांचा शैक्षणिक सहभाग असतो.

राज्याच्या विकासाची ध्येय व प्राधान्यतेनुसार राज्यात गुणवत्तापूर्ण दर्जाचे व सर्वसमावेशक अशा उच्च व तंत्रशिक्षणाला प्रोत्साहन मिळेल यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग प्रयत्नशील आहे.

❐ ❐



राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, जालना, बुलढाणा व गडचिरोली हे जिल्हे विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे मुलींच्या शिक्षणाच्या कमी गुणोत्तराचे जिल्हे म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या सातही जिल्ह्यांत आदर्श महाविद्यालये स्थापित करण्यात येत आहेत.

जिल्हानिहाय व औद्योगिक क्षेत्रनिहाय कौशल्याची मागणी व उपलब्धता यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, यास राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे साहाय्य मिळाले आहे.

**भारत हा तरुणांचा देश असून, उच्च शिक्षणाद्वारे विकास आणि प्रगतीचा नवा टप्पा गाठता येणे शक्य आहे.**

सुबत्ता ही खऱ्या अर्थाने ज्ञान व कौशल्यात दडलेली असते. सर्वांगीण आणि शाश्वत विकासाचा पाया शिक्षण हाच असतो. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व शिक्षणामुळे घडते. शाळेतून मिळालेले संस्कार म्हणजे भविष्याच्या दृष्टीने शिदोरी असते. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षण अधिकार अधिनियम २००९ मध्ये संमत करण्यात आला. ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे अनिवार्य झाले.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक, पदवी आणि उच्चशिक्षण देण्यासाठी आपण विविध आघाड्यांवर प्रयत्न करीत आहोत. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा गावोगावी पोहचविण्यात आपल्याला यश मिळाले आहे. १९६६ मध्ये शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी नेमलेल्या कोठारी आयोगाने शिक्षणावर राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च करावा, अशी शिफारस केली होती. दुर्दैवाने अद्यापही ४ टक्क्यांपलीकडे आपण पोहोचलेलो नाही.

**समाधानकारक स्थिती नाही**

प्राथमिक शिक्षणात मोठ्या प्रमाणात होणारी गळती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक समाज व महिला यांच्या शिक्षणाच्या प्रमाणाकडे मागे वळून पाहिले तर समाधानकारक स्थिती दिसत नाही. उच्च शिक्षणाकडे दृष्टिक्षेप टाकला तर सकल नोंदणी प्रमाण (ग्रॉस एन्रॉलमेंट रेशो) चे आपल्या देशात प्रमाण १८.१ टक्के आहे. तर विकसित देशात तेच सरासरी प्रमाण ४० टक्क्यांवर आहे. जागतिक स्तरावर याची सरासरी २६ टक्के आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय व

**डॉ. नरेंद्र जाधव**

अल्पसंख्याक वर्गाची उच्च शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत शोचनीय परिस्थिती जाणवते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास कित्येक राज्यात अनुसूचित जमाती संवर्गातील केवळ २ टक्के ग्रामीण महिलांनी उच्च शिक्षण घेतले आहे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेत जरी आपल्या देशातील शिक्षण क्षेत्रात बऱ्याच सुधारणा बघायला मिळाल्या असल्या तरी त्या पुरेशा नाहीत. अजूनही आपल्या देशात शिक्षणावर पुरेसा खर्च होत नाही. जो होतो तो जगातील इतर विकसनशील देशांच्या शिक्षणावरील खर्चापेक्षा बराच कमी आहे. आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येत असणाऱ्या चीनमध्ये शिक्षणावरील खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८.१७ टक्के तर ब्राझीलमध्ये ७.५४ टक्के एवढा तर विकसनशील देशांमध्ये सरासरी ७.०९ टक्के खर्च शिक्षणावर केला जातो. अर्थात आपल्या देशात शिक्षणावर होणारा खर्च तुलनेने कमी आहे. तो वाढवणे हे आपल्या समोरील मोठे आव्हान असणार आहे.

प्राथमिक शिक्षणात मोठ्या प्रमाणात होणारी गळती रोखण्याचे आव्हानही देशासमोर आहे. मुख्यत्वेकरून अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. प्राथमिक शिक्षणात पटसंख्येवर असणारे विद्यार्थी आणि त्यांची शाळेतील उपस्थिती यात बरेच अंतर दिसून येते. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, झारखंड यासारख्या शिक्षणाच्या दृष्टीने मागास राज्यांमध्ये प्राथमिक शाळांमध्ये हजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६० टक्क्यांच्याही खाली आहे, ही नक्कीच चिंतेची बाब आहे. आपल्या देशातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता फारशी चांगली नसल्याचे दिसून आले आहे. इतर विकसनशील देशातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणापेक्षा आपल्या देशातील शालेय शिक्षणाची गुणवत्ता कमी असल्याचे पाहणीत आढळून आले आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवादात मोठे अंतर दिसून येते. विद्यार्थ्यांची क्षमता वृद्धी करणे तसेच, त्यांना प्रोत्साहन देण्याचे व शिक्षणाप्रती जबाबदार बनवण्यास शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे मोठे आव्हान आपल्या समोर आहे.

११ व्या योजनेत शिक्षण आणि आरोग्य यावर विशेष भर देण्यात आला होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ टक्केपर्यंत आपण पोहचलो. ही टक्केवारी समाधानकारक म्हणता येणार नाही, परंतु आधीच्या पन्नास वर्षांत ३.५ टक्क्यांपर्यंत आपण पोहचलो, त्याउलट गेल्या केवळ पाच वर्षांत ४ टक्क्यांपर्यंत पोहचलो. म्हणजे शिक्षणाच्या दृष्टीने आता आपण जागरूक होऊ लागलो आहोत. १२ व्या योजनेमध्ये शिक्षण आणि आरोग्यावर विशेष भर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०१७ पर्यंत आपण ६ टक्क्याच्या दिशेने अधिक वाटचाल करू शकू.

# संपूर्ण बदलाच्या दिशेने...



**गळतीचे प्रमाण**

शालेय विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे, विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे आणि माध्यमिक शिक्षणात विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्याचे आव्हान समर्थपणे पेलण्यासाठी बहुआयामी रणनीती आखण्याची गरज आहे. त्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणस्तरापासून परिणामकारक प्रारूपाची आवश्यकता आहे. आता यापुढे तीन बाबींकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. समानता म्हणजे सर्व समाजघटकास शिक्षणात समान संधी देणे; गुणवत्ता सुधार म्हणजे शाळा परिसर सुसज्ज वर्ग-खोल्या, शिक्षकांची गुणवत्ता आणि समाजाचा सहभाग सुनिश्चित करणे, तर विस्तारीकरण करणे म्हणजे मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि किमान कौशल्यावर आधारित शिक्षणाला चालना देणे होय.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर करून प्राथमिक शाळांमध्ये आता संगणक साहित्याचा शिक्षणपूरक वापर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये शाळांना योग्य नेटवर्किंग सुविधा, इंटरनेट कनेक्शन देण्यात येणार आहे. स्थानिक भाषांमधील सॉफ्टवेअरचा वापर करून हा कार्यक्रम अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शिक्षणाच्या अधिकाराच्या कायद्यानुसार शाळांमध्ये प्रयोगशाळा असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हजेरीचा दर, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, क्रमिक अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे प्रभावी स्वरूप, गट स्तरापासून गुणवत्तापूर्ण निरीक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी, जिल्हा शैक्षणिक व प्रशिक्षण केंद्रवर्गात शिकवणी व शिकण्याचा प्रभावी कार्यक्रम राबवणे, शालेय व्यवस्थापनात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका या बाबींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**निवासी शाळा प्रभावी माध्यम**

निवासी शाळा हे समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहचण्याचे प्रभावी माध्यम आहे. शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये तसेच भटके जीवन जगणारे आणि आदिवासी मुलां-मुलींसाठी, शिक्षणाचा अधिकार कायदा आणि सर्व शिक्षा अभियानांतर्गत निवासी शाळांची तरतूद करण्यात आली आहे. निराधार, घरातून पळून गेलेले, एचआयव्हीग्रस्त, देहव्यापार करणाऱ्यांची मुले-मुली तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या अतिमागास मुला-मुलींना अशा शाळांची खरी गरज असते.



जगामध्ये भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जात आहे. आजच्या घडीला आपले सरासरी वय २४ वर्षे आहे. २०२० सालापर्यंत ते केवळ २९ वर्षे एवढेच असणार आहे. त्या उलट, २०२० साली इतर देशांचे सरासरी वय खालील प्रमाणे असणार आहे : चीन ३७, अमेरिका ३८, पश्चिम युरोप ४२ व जपान ४८ वर्षे ! ही आपल्याला एक संधी आहे. प्रत्येक देशाच्या आयुष्यात एकदाच येते. अशी संधी आपल्या देशासाठी आता चालून आलेली आहे. विकसित देशांमध्ये ही संधी आली होती. त्यांनी त्यावेळी त्या संधीचा उपयोग करून घेतला म्हणून ते विकसित बनले.

शासनाच्या एकूणातील ५ टक्के प्राथमिक शाळा, ५० टक्क्यांवरील आदिवासी लोकसंख्येच्या ठिकाणी पूर्व प्राथमिक (अनिवासी), प्राथमिक आणि माध्यामिक शिक्षणाची सोय असणाऱ्या निवासी शाळा संकुलामध्ये परावर्तित करण्यात याव्यात. यात शहरी व ग्रामीण भागात भटक्या मुलांसाठी त्यांच्या मूळ गावी आणि भटकंतीच्या ठिकाणी तात्पुरते वसतिगृह स्थापन करण्याची तरतूद करण्यात यावी. आंध्र प्रदेशात शिक्षणाचा अधिकार कायदा आणि सर्व शिक्षा अभियानांतर्गत अशा प्रकारच्या एकात्मिक शाळा (नियमित निवासी शाळा) उभारण्यात आल्या आहेत. ही भूमिका अन्य राज्यांनीही अवलंबण्याची गरज आहे.

शिक्षकांसाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे व त्यांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी पुढील उपक्रम राबवण्याची गरज आहे. १) शिक्षकांची कमतरता दूर करणे २) शिक्षकांच्या सेवापूर्व शिक्षण प्रक्रियेच्या गुणवत्तेत सुधार, ३) सेवेत समाविष्ट शिक्षकांच्या व्यावसायिक गुणवत्तेत सुधार.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणातील सकल नोंदणी प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. सध्या साधारणत: देशात उच्च शिक्षण देणारी ६३० विद्यापीठे आहेत. येत्या १० वर्षात ही संख्या १५०० पर्यंत पोहचेल. आपल्या देशात केंद्र, राज्य, अभिमत व खासगी विद्यापीठे अशा स्वरूपाचे शिक्षण देणारी विद्यापीठे आहेत. केंद्रीय विद्यापीठांच्या तुलनेत राज्य शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठांना पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. त्यावर उपाय म्हणून १२ व्या योजनेत विशेष नियोजन करण्यात आले आहे. जी विद्यापीठे परिवर्तनशील असतील त्यांना वाढीव निधी उपलब्ध करण्यात येईल. याशिवाय, किमान २० विद्यापीठांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करून गुणवत्तापूर्ण जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न असणार आहे. जागतिक क्रमवारीत पहिल्या २०० संस्थांमध्ये भारतातील एकाही उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेचा समावेश नसला तरी २०२० पर्यंत काही भारतीय संस्थांचा तरी जागतिक क्रमवारीत समावेश व्हावा म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. त्यादृष्टीने केंद्र सरकार पावले उचलित आहे.

**(शब्दांकन : मोहन राठोड,**
उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र,
नवी दिल्ली.)

# सर्वसमावेशक आणि समान शिक्षण हवे



सुखदेव थोरात
अध्यक्ष, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली

**शिक्षण ही प्रत्येक समाजघटकाची गरज आहे. मानवी क्षमतांचा विकास होण्यासाठी बहुतांश देशांमध्ये खाजगी व सरकारी शिक्षण संस्थांमधून उत्तमोत्तम दर्जाचे शिक्षण देण्याकडे कल दिसून येतो. त्यामुळेच ते आर्थिक विकासात सहभागी होऊन लाभ घेऊ शकतात. स्रोतांची उपलब्धता आणि उत्पन्न आदींसारख्या आर्थिक संधी असमान असतात, परंतु गरीब व श्रीमंतांसह सर्वांना उच्च शिक्षण आणि कौशल्याच्या समान संधी दिल्याने सर्वांनाच आर्थिक समानतेचा आवश्यक लाभ प्राप्त होतो. या अनुषंगाने विचार करता असमान मानवी समूहसुद्धा शिक्षणाच्या माध्यमातून विविध संधी मिळवत समान दर्जा प्राप्त करून आपला विकास साधू शकतात.**

महाराष्ट्रातील उपेक्षित घटकांना उच्च शिक्षणामध्ये समान संधी मिळावी यासाठी असणाऱ्या सर्वसमावेशक शिक्षणाच्या मुद्यावर मला भूमिका मांडायची आहे. याबाबतचे धोरण, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा, विविधता, उच्च शिक्षणातील असमान संधी, शैक्षणिक तफावत आणि सामाजिक दुरावा, यावरही मला ऊहापोह करायचा आहे.

### सर्वसमावेशक शिक्षण

उच्च शैक्षणिक पातळीवर सर्वसमावेशक शिक्षणाच्या संदर्भातील प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे शैक्षणिक विस्तार होय. सर्वसमावेशकतेसोबतच विस्तार (सर्वांना समान संधी), दर्जा आणि आनुषंगिक शिक्षण असा हा विषय आहे. सुरुवातीला ११ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्रात सर्वसमावेशक शिक्षणाचा मुद्दा पुढे आला. १२ व्या योजनेतही या विषयावर लक्ष केंद्रित होते. सर्वांना समान संधी मिळावी आणि आपल्या क्षमता व अस्तित्वाची जाण समाजातील सर्व स्तरातील घटकांना व्हावी, ही यामागची मूळ भूमिका होती. याचा लाभ उपेक्षित व मागास घटकांनाही मिळावा, हा यामागचा उद्देश होता.

ज्या बहुसंख्य सामाजिक घटकांना उच्च शिक्षणामध्ये संधीच नाही त्यांना त्यांची ओळख पटविणे आणि सर्वसमावेशक शिक्षणाच्या विकसित प्रवाहात त्याचा सहभाग वाढविणे, हे जिकिरीचे काम होते. कारण उपेक्षित वर्ग दर्जेदार उच्च शिक्षणापासून वंचित राहण्यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरतात...यामध्ये केवळ गरीब-श्रीमंत हा भेदच नाही, तर जात, परंपरा, धर्म आणि लिंगभेद सारेच घटक असतात.

उच्च शिक्षणापर्यंत उपेक्षित घटकांना पोहचण्यात येणाऱ्या अडचणींबद्दल या ठिकाणी ऊहापोह करता येईल. या अडचणी सार्वत्रिक आहेत. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, जैन, आणि बौद्ध या साऱ्याच धर्मांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागास वर्गाला याचा फटका बसला आहे. या संदर्भातील माहिती २००४-२००५ या वर्षात करण्यात आलेल्या रोजगार आणि बेरोजगार या विषयावरील नॅशनल सॅम्पल सर्वेक्षणातही नमूद करण्यात आली आहे. याशिवाय ही आकडेवारी शिक्षण या विषयावर २००७-०८ या साली करण्यात आलेल्या नॅशनल सॅम्पल सर्वेक्षणातही पुढे आली आहे.

उच्च शिक्षणातील उपलब्धी ही सामान्यत: दाखल्यांच्या प्रमाणावरून लक्षात घेतली जाते. यासाठी तीन मोजणी पद्धतीचा वापर केला जातो. यापैकी एकूण दाखला प्रमाण याचा वापर उच्च शिक्षण किती लोकांपर्यंत पोहचले यासाठी केला जातो. सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणात १८ ते २३ या वयोगटातील प्रमाण या पद्धतीतून काढले जाते.


### धोरणात्मक अडचणी

शहरी आणि ग्रामीण भागातील उच्च शिक्षणातील प्रमाणाबाबत एकूण दाखला प्रमाणानुसार प्रचंड तफावत आढळून आली असून हे प्रमाण शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात तिप्पट कमी असल्याचे दिसून आले आहे. जातीनिहायदेखील उच्च शिक्षणातील तफावत मोठ्या प्रमाणात आढळून आली आहे. उच्च जातीमध्ये हे प्रमाण २९ टक्के आहे तर अनुसूचित जातीमध्ये २२ टक्के , इतर मागासवर्गीयांमध्ये १८ टक्के तर अनुसूचित जमातीमध्ये ही टक्केवारी केवळ ९ टक्केच आहे. त्यामुळे एकसंघ समाज व समान आर्थिक पातळीवरचा समाज निर्माण करण्यासाठी या आघाडीवरही समानता आणणे गरजेचे आहे.

२००७-०८ च्या अहवालानुसार उच्च शिक्षणाच्या संधींमध्ये मुला-मुलींचे प्रमाण हे देखील धर्मानुसार कमी-अधिक आहे. यासंदर्भातील 'जीईआर' नुसार हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. ख्रिश्चन आणि बौद्ध यांच्यामध्ये उच्च शिक्षणात महिला आघाडीवर आहेत.

आर्थिक स्थैर्य आणि उच्च शिक्षणाची संधी यांचा जवळचा संबंध आहे. आर्थिक स्थैर्याची शाश्वती नसणारा रोजंदारीवरील कामगारवर्ग, शेतातील मजूर, शहरी भागातील हातमजूर यांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी अत्यंत कमी असून ही टक्केवारी ५ टक्क्यांपर्यंत खाली घसरल्याचे चित्र आहे.

याबाबतचे आणखी एक सत्य याठिकाणी विशद करणे क्रमप्राप्त ठरेल, ते म्हणजे शिक्षणाचे खाजगीकरण व त्याचा वंचित



घटकांवर पडणारा प्रभाव. शासनाचा उच्च शिक्षणामध्ये खाजगीकरणाचा प्रयत्न राहिला आहे. मात्र, काही नाममात्र अपवाद वगळता पुढे खाजगीकरणातील संस्था स्वायत्त आर्थिक संस्था बनते. अशा संस्थांच्या संख्येत वाढ होण्याची किंमत राज्याला भोगावी लागत आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक दर्जावाढीसाठी कधीकाळी पुढाकार घेणाऱ्या चांगल्या संस्थांना याचा फटका बसला आहे. नव्या खासगी संस्थांचा फायदा आर्थिक सक्षम गट किंवा नियमित आर्थिक आवक असणारा मध्यमवर्ग घेतो. आर्थिक दुर्बल असणाऱ्यांना याचा लाभ नाही. खरे तर आर्थिक दुर्बल घटक आजही उच्च शिक्षण देणाऱ्या सरकारी यंत्रणेवरच अवलंबून आहे.

वरील सर्व तथ्यांवरून असे लक्षात येते की, उच्च शिक्षणाला सर्वसमावेशक शिक्षण करण्यामध्ये बहुस्तरीय अडचणी आहेत. महाराष्ट्राचा उच्च शिक्षणातील वाटा सध्या २३ टक्के आहे. देशातील उच्च शिक्षणाच्या तुलनेत ही आकडेवारी अधिक आहे. असे असले तरी पुरोगामी महाराष्ट्रासाठी उच्च शिक्षण घेण्यामध्ये सामाजिक, आर्थिकदृष्ट्या धार्मिक आणि पारंपरिक अडचणी असणे फारसे चांगले नाही. किंबहुना, हे अडथळे दूर करणे गरजेचे आहे. यासोबतच नियमित आर्थिक स्थैर्य नसणारे अस्थाई कामगार, शेतमजूर आणि अस्थायी शहरी मजूर आदी आर्थिक घटकांचा उच्च शिक्षणातील सहभाग हा नाममात्र आहे. नियमित व सुरक्षित आर्थिक आवक असणाऱ्या अन्य घटकांपेक्षा हे प्रमाण नाहीच्या बरोबर असून यामुळे सर्वसमावेशक शिक्षणाच्या मूळ उद्देशाला फाटा बसत आहे.



अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय समाज, मुस्लीम, कामगार, महिला आणि गरीब (सामाजिक/धार्मिक/ लिंगभेदावर) यांच्यापर्यंत उच्च शिक्षण कमी प्रमाणात पोचलेले दिसून येते, ज्यामुळे आर्थिक क्षेत्रात संधी मिळून व्हावयाच्या मानवी विकासात ते मागे राहिले. त्यामुळे सामाजिक/ धार्मिक/ लिंगभेदविरहित आधारावर योजना तयार करण्याची गरज आहे.

**गोरगरिबांना प्रासंगिक आणि सर्वसमावेशक शिक्षण देण्यासाठी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे लागेल. ग्रामीण भागातील तसेच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित समाजाचा उच्च शिक्षण पद्धतीत प्रवेश होणे अत्यंत गरजेचे आहे. वंचित समाजातील व्यक्ती ज्या प्रथमच उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांच्या गटातील १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती आकड्यांसहित उपलब्धही आहे. जवळपास ५७ % मुले विविध क्षेत्रात उच्च शिक्षण घेत आहेत. याचाच अर्थ उर्वरीत ४३% मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. यातही अनुसूचित जाती, इतर मागास वर्गीय, आणि मुस्लीम यांचा या ४३ टक्के वंचित मुलांमध्ये सहभाग आहे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे लागेल. शासनाने कोणत्या भागात कोणत्या व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता आहे याचा शोध घेऊन शेती व पारंपरिक व्यवसायाशी निगडित तत्काळ रोजगार उपलब्ध करणाऱ्या अभ्यासक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.**

व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतानाच आम्ही आणखी एका प्रमुख मुद्यावर गंभीरतेने विचार करायला हवा, तो म्हणजे शिक्षणाच्या प्रवाहात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांनादेखील गुणवत्तापूर्ण बनविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. अनेक कारणांमुळे मुले शैक्षणिक दर्जा राखण्यात कमी पडतात. त्यामुळे अशा मागे राहिलेल्या मुलांना कुठलीच संधी न मिळणे ही सर्वसमावेशक शिक्षणातील बाधा ठरेल. त्यामुळे शालेय किंवा अन्य वरिष्ठ स्तरावर मागे पडलेल्या मुलांना विशेष प्रशिक्षण देण्याचे कार्यदेखील विशेष मोहिमेद्वारे झाले पाहिजे.

सामाजिक एकोपा, परस्परांच्या समाजाबद्दल, रूढी-परंपरेबद्दल, आर्थिक, सामाजिक स्थित्यंतराबद्दल माहिती असली की, त्यातून एका सुदृढ, परस्पर सामंजस्य असणाऱ्या समाजाची निर्मिती होते. बदलाच्या प्रक्रियेला चालना मिळते. त्यामुळे पाश्चात्य प्रगत देशांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाचे धोरण



अवलंबिले आहे. भारतासारख्या विविध जाती-धर्म-पंथ असणाऱ्या विविधतेच्या देशात परस्पर संस्कृतीच्या जाणिवा दृढ करून त्या माध्यमातून समान संधी उपलब्ध करण्यासाठी बहुसांस्कृतिक शिक्षणाचे धोरण अंगीकारणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने देशाला अनेक नवनवीन शैक्षणिक उपक्रम दिले आहेत. देशाला एकसूत्री करणाऱ्या बहुसांस्कृतिक शिक्षणाचे धोरणदेखील राज्याने राबवून देशापुढे पथदर्शी आदर्श निर्माण करावा. सर्वसमावेशक शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्ण वाटचालीतील हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

❒ ❒

**शब्दांकन - प्रवीण टाके**, जनसंपर्क अधिकारी, नवी दिल्ली

# गुणवत्ता आणि दर्जा

## तंत्रशिक्षण संचालनालयाने विविध कार्यात घेतलेला पुढाकार

**राज्यातील तंत्रशिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता यात वाढ होण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विविध योजना, उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामुळे देशपातळीवर आपला आगळावेगळा ठसा उमटवण्यात राज्य यशस्वी झाले आहे.**

तंत्रशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात येत आहेत...

**■ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेची स्थापना**

केंद्र शासन, राज्य शासन व संबंधित भागीदार यांच्या साहाय्याने पुणे व नागपूर या ठिकाणी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी भागीदार निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**■ तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना**

पदवी अभ्यासक्रमांना व्यवसायाभिमुख दिशा देणे, या अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविणे, उद्योगधंद्यांशी समन्वय साधणे तसेच तंत्रशिक्षणाच्या दर्जात एकसूत्रता व एकजिनसीपणा आणणे, यासाठी हे विद्यापीठ उपयुक्त ठरेल.

**■ अस्तित्वात असलेल्या तंत्रनिकेतनाचा दर्जा वाढविणे**

**■ तंत्रशिक्षण संचालनालयामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर**

सर्व शासकीय संस्था, विभागीय कार्यालये, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ इ. कार्यालयामध्ये व्हिडीओ कॉन्फरसिंग ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**■ तंत्रनिकेतनाचा सामूहिक विकास कार्यक्रम**

या योजनेंतर्गत शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये विविध प्रकारचे अभ्यासक्रम संस्थेत किंवा संस्थेने सुरू केलेल्या विस्तारित केंद्रांवर चालविले जातात. प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी साधारणपणे ३ ते ६ महिन्यांचा असून यामध्ये वायरिंग, टेलरिंग, फुड प्रोसेसिंग, वेल्डिंग, कारपेंटरी, टी.व्ही. व रेडिओ मेकॅनिक, ड्रेस डिझायनिंग, स्क्रिन प्रिंटिंग, मेणबत्त्या बनविणे, अगरबत्ती बनविणे, ब्युटिपार्लर, टॅली अकाऊंटिंग या अभ्यासक्रमांचा समावेश करून प्रत्येक वर्गात १५-२० प्रशिक्षणार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणार्थी स्वत:चा स्वयंरोजगारही सुरू करू शकतात.

**■ तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम**

तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे हा आहे.

**■ अभियांत्रिकी महाविद्यालयात सेंटर ऑफ एक्सलेन्स स्थापन करणे**

विविध क्षेत्रात संशोधन वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या साहाय्याने चार अभियांत्रिकी महाविद्यालयात सेंटर ऑफ एक्सलेन्स सुरू करण्यात आले आहे.

**■ सामायिक प्रवेश परीक्षा**

प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या



प्रवेशाकरिता राज्यात यावर्षी एमटीसीईटी २०१३ ही प्रवेश परीक्षा तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात आली आहे.

**■ एमसीए प्रवेश परीक्षा**

२०१३-१४ च्या एमसीए प्रथम वर्ष प्रवेशाकरिता परीक्षा ऑनलाइन पध्दतीने घेण्यात आलेली आहे.

**■ प्रवेश क्षमता बदल**

२०१३-१४ करिता प्रवेश क्षमतेतील बदल करण्याबाबतचे प्रस्ताव संगणकीय प्रणाली विकसित करून ऑनलाइन पध्दतीने मागविण्यात आले.

**■ २०१३-१४पासून अभियांत्रिकी व आर्किटेक्चर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया**

**■ नवीन अभ्यासक्रमनिर्मिती व सुधार**


स्वायत्त संस्थांनी नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती जसे मेकॅट्रॉनिक्स, एम्बेडेड सिस्टिम्स, बायोटेक्नॉलॉजी, प्लॅनिंग, थ्री-डी ॲनिमेशन व ग्रॅफिक्स, ॲडव्हान्स्ड कम्युनिकेशन ॲण्ड इन्फर्मेशन सिस्टिम इ. करून पूर्वीच्या अभ्यासक्रमांमध्ये काळाच्या गरजेनुरूप सुधारणा केल्या आहेत. काही पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नावाजलेल्या औद्योगिक संस्थांच्या सहकार्यातून अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**■ तंत्रशिक्षण बृहत आराखडा**

जिल्हानिहाय माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या सांख्यिकी माहितीच्या आधारे हा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये रिक्त जागा, गळती, विभागीय असमतोल, इ. लक्षात घेण्यात आले आहे. जिल्हा हा केंद्र मानून त्या भागातील भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक सुधारणा, सामाजिक मागासलेपणा याचा विचार करून पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवीकरिता एकूण नोंदणी वाढावी यावर या आराखड्यात भर देण्यात आला आहे.

**■ लोककल्याणकारी योजना**

अ) शासनाने खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना २००६-०७ व २००७-०८ या



## फी सवलत व माफी

अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी शिक्षण फी माफ योजना (ट्यूशन फी वेव्हर स्किम) ही योजना राबवली जाते. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये ४.५ लाखाच्या मर्यादेत आहे अशाच विद्यार्थ्यांना या योजनेमार्फत प्रवेश घेता येऊ शकतो. या योजनेतून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेचे शिक्षण शुल्क भरावे लागत नाही. थोडक्यात शिक्षण शुल्क माफ होते. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के शुल्क माफीची योजनाही अमलात आहे. मात्र यासाठी या विद्यार्थ्यांचा प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून होणे आवश्यक असते. अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना समाजकल्याण आणि आदिवासी विकास विभागामार्फत १०० टक्के शैक्षणिक शुल्काचा परतावा आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के शैक्षणिक शुल्काचा परतावा मिळतो. मात्र त्यासाठी हे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत होणे अनिवार्य असते.

शैक्षणिक वर्षात भरलेल्या शिक्षण शुल्कामधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याबाबतची योजना लागू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापेक्षा कमी आहे व ज्यांनी तंत्रशिक्षणाशी निगडित पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा (कॅप) प्रवेश घेतला आहे त्यांनाच या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच ज्यांनी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच ज्यांनी औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकद्वारा प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांनासुद्धा या योजनेचा लाभ घेता येईल. अभिमत विद्यापीठांना ही सवलत लागू नाही तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही सवलत लागू नाही.

२६ फेब्रुवारी, २०१० च्या निर्णयाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय तसेच शासकीय अनुदानित संस्थांमध्ये शिकणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. १५,००० वरुन १,००,००० एवढी वाढविण्यास मान्यता दिली आहे. या योजनेचा लाभ खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता मिळेल.

■ **पदविका व पदवी अभ्यासक्रम**

अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र/वास्तुकला शास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी

■ **पदव्युत्तर पदवी**

एमबीए/एमएमएस/एमसीए,

■ **केंद्र शासनाची योजना**

**१) गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना (Merit-Cum-Means )**

केंद्र शासनाने अल्पसंख्यांक विद्यर्थ्यांसाठी गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना २००७-०८ पासून सुरू केली आहे.

**२) केंद्र शासनाची मोफत प्रशिक्षण योजना**

केंद्र शासनाने अल्पसंख्याक विद्यर्थ्यांसाठी शासनाची मोफत प्रशिक्षण योजना २००७-०८ पासून मंजूर केली आहे.

■ **राज्य शासनाची योजना**

**रोजगारभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम**

अल्पसंख्याक उमेदवारांकरिता २००८-०९ या वर्षासाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला आहे. हा कार्यक्रम २००९-१० या वर्षापासून अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार युवक/युवतीसाठी निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या ५००० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना म्हणून कार्यान्वित करण्यात आली आहे.

उच्च व्यावसायिक व बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील २००० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये मुस्लीम-१०९०, शिख-२०, बौद्ध-६१०, ख्रिश्चन-१२०, पारशी-२०, जैन -१४० अशा शिष्यवृत्तींचा समावेश आहे.

राज्य शासनाने अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता २००८-०९ या वर्षात शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली आहे. (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम)

तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठीसुध्दा शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येते.

संबधित अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्याकरिता आकारण्यात येणारे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु .२५,०००/- या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते.

■ **प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमातील नवीन अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता वाढ/घट व नवीन तंत्रनिकेतन सुरू करणे.**

शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील नवीन अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता वाढ/घट व नवीन तंत्रनिकेतन सुरू करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. संचालनालय स्तरावर यासाठी बृहत आराखडा व संस्थेची शैक्षणिक कामगिरी विचारात घेऊन शासनाकडे शिफारशी

करण्याची कार्यपद्धत सध्या अनुसरली जात आहे.

■ **प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाची ऑनलाइन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया**

पदविका अभ्यासक्रमातील प्रवेश केंद्रीभूत प्रक्रियेमार्फत राबवण्यात येतात. त्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून केंद्रीभूत प्रक्रियेमार्फत ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर गुणवत्ता व त्यांनी भरलेले पर्याय व पसंतीनुसार संबंधित संस्थेत प्रवेश घेण्यासाठी पात्र करण्यात येते. पूर्वी प्रथम व द्वितीय वर्ष पदविकेच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अर्ज स्वीकृती केंद्रावर जावे लागत असल्याने वेळ व पैसा वाया जात होता. ते टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणाहून पर्याय स्वीकृती (ऑप्शन कॅन्फर्म) करण्यासाठी मुभा देण्यात येत आहे.

■ अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी २०११-१२ पासून शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे, सोलापूर, यवतमाळ, नांदेड, जळगाव, मुंबई व शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई अशा एकूण ७ शासकीय तंत्रनिकेतनात दुसरी पाळी सुरू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी, कराड, ब्रम्हपुरी, जालना, अंबड अशा ५ शासकीय तंत्रनिकेतनात दुसरी पाळी सुरु करण्यात आली आहे.

२०१३-१४ करिता १२ शासकीय तंत्रनिकेतनात व ४ शासकीय औषधनिर्माणशास्र संस्थेत दुसरी पाळी सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

■ **थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम प्रवेश**

सध्या हे प्रवेश संस्थास्तरावर स्वतंत्रपणे केले जातात. याबाबत विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे वाया जाणारे श्रम व वेळ हया बाबी टाळण्यासाठी थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीभूत गुणवत्तेनुसार देण्यात येतील.

■ **विविध अभ्यासक्रमातील प्रवेश**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश होतो - एम.बी.ए./एम.एम.एस., एम.सी.ए., अभियांत्रिकी (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम), औषधनिर्माणशास्त्र (पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम), वास्तुकला शास्त्र (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम), हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (पदविका व पदवी अभ्यासक्रम).

वरील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत पद्धतीने ऑनलाइन राबविल्या जातात.

प्रवेश प्रक्रियेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे शासकीय,शासकीय अनुदानित, स्वायत्त व खाजगी विनाअनुदानित संस्थांची प्रवेश प्रक्रिया एकत्रितरीत्या राबवण्यात येते.

या प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांनी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) देणे आवश्यक असते जेणेकरून त्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेता येऊ शकतो.

संचालनालयाकडून राबवण्यात येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांची पध्दती ऑनलाइन आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संस्थेत जाणे, रांगेत तिष्ठत उभे राहणे, गर्दी इत्यादी त्रासदायक गोष्टींपासून सुटका होते. सर्व माहिती आणि प्रवेशाची माहिती ऑनलाइन उपलब्ध होत असल्यामुळे क्रमांक लागलेल्या संस्थेत आवश्यक शिक्षण शुल्काचा धनादेश आणि मूळ कागदपत्र सादर करण्याचे काम राहते. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्वीकृती केंद्रांवर इंटरनेटसह संगणकाची सोय करण्यात आली आहे व नाममात्र फीमध्ये या सुविधांचा वापर विद्यार्थी करू शकतात.


**आवश्यक प्रमाणपत्रे**

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक असतात. - जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र.

❐ ❐

www.dte.org.in या संकेतस्थळाला भेट द्या आणि विस्तृत माहिती जाणून घ्या.

# कष्ट करून शिका



कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्व जातिधर्माच्या गरीब ग्रामीण रयतेला आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. कुंभोज (जि. कोल्हापूर) या खेड्यात जैन दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. एतवडे बुद्रुक (जि. सांगली) येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे ते कोल्हापुरात इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. शाहू महाराजांच्या प्रभावाखाली त्यांच्यावर समाजसेवेचे संस्कार झाले.

ओगले काच कारखान्याचे व पुढे किर्लोस्कर नांगराचे १९१४ ते १९२२ यादरम्यान ते विक्रेते होते. या काळात ठिकठिकाणी खेड्यात हिंडल्या मुळे जनतेचे दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव यांची जाणीव त्यांना झाली. त्यातून दुधगाव (जि. सांगली) येथे विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आश्रम काढला. कराडजवळील काले या गावी त्यांनी पहिले वसतिगृह काढले (१९१९). तोच रयत शिक्षण संस्थेचा शुभारंभ होता. पुढे १९२४ मध्ये सातारा येथे अस्पृश्यांसह सर्व जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृह काढले. शिक्षणाच्या कार्यास त्यांनी पूर्णत: वाहून घेतले. गोरगरीब पण हुशार मुले जेथे जेथे दिसतील, तेथून त्यांना आणून वसतिगृहात ठेवले. त्यातील काही विद्यार्थांच्या परदेशी शिक्षणाची सोय पालक या नात्याने केली. स्वावलंबनाने कष्ट करून शिका, हा त्यांचा मंत्र होता.

भाऊरावांनी शिक्षणकार्य पत्करून अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. यामुळे सनातनी मंडळींचा जाच त्यांना सहन करावा लागला. सर्व जातिधर्मांचे आजन्म कार्यकर्ते व सेवक या संस्थेत तयार झाले. वटवृक्ष हे बोधचिन्ह व स्वावलंबी शिक्षण हे संस्थेचे बोधवाक्य ठरले. भाऊरावांची पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या कार्यात मन:पूर्वक साथ दिली. गरीब, पददलितांचा अंतर्यामी जिव्हाळा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत. महात्मा फुले व राजर्षी शाहू यांची शिक्षणप्रसाराची इच्छा त्यांनी पूर्ण केली. कर्मवीरांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेने लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरवला आहे. स्वावलंबी होऊन शिक्षण घेण्याचा त्यांनी दिलेला मूलमंत्र महाराष्ट्रासाठी नेहमीच दिशादर्शक राहिला आहे.

❐ ❐

# आम्ही बदलू जगासोबत

शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करताना व राबवताना उद्योगसमूहांच्या गरजांनुसार त्यात लवचीकता आणता यावी यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाला स्वायत्त दर्जा प्रदान केला आहे. मंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे तर पुणे, औरंगाबाद, नागपूर व मुंबई अशी चार विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

मंडळ प्रॉफिट मेकिंग ऑर्गनायझेशन नसतानासुद्धा नियोजनबद्ध पद्धतीमुळे व बाहेरील प्रकल्पांपासून मिळणाऱ्या महसुलामुळे मंडळाने त्यांचे कार्यक्षेत्र केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता इतर विविध शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत. मंडळाच्या वित्त समिती, विद्वत समिती, समतुल्यता समिती, अभ्यासक्रम समिती अशा विविध समित्यांवर उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचा जास्तीत जास्त प्रमाणात अंतर्भाव केला गेला आहे. या तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा मंडळाच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्रातील १११२ तंत्रनिकेतने व इतर तांत्रिक संस्था मंडळाशी संलग्न असून मंडळातर्फे १८० पदविका अभ्यासक्रम राबविले जातात. दरवर्षी सहा लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंडळ घेते व ४० दिवसांत संगणकीय तंत्रज्ञानाच्या आधारे निकाल घोषित करते. यासोबतच मंडळ दरवर्षी १०-१२ लाख विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन एम.एस.सी.आय.टी परीक्षा घेते व त्वरित निकाल देते.

मंडळाने दर्जेदार शैक्षणिक साहित्यनिर्मितीसुद्धा केली आहे. उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार रोजगारनिर्मितीला पोषक अनेक नवीन अभ्यासक्रम दरवर्षी तयार केले जातात.

## मंडळाचे विविध उपक्रम

### ■ विद्यमान अभ्यासक्रम सुधारणा

> आजच्या आधुनिक उद्योग व्यवसायांना लागणाऱ्या कुशल तांत्रिक मनुष्यबळाची निर्मिती व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ कार्यरत आहे. या मंडळाने १८० विषयात तांत्रिक पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनात मूलगामी बदल घडविणारे अभ्यासक्रम मंडळाने तयार केले आहेत. हे महाराष्ट्र शासनाचे स्वायत्त मंडळ आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन संगणक परीक्षा घेणारे हे देशातील पहिलेच मंडळ आहे हे विशेष.



अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील जवळपास सर्व अभ्यासक्रम २०१२-१३ पासून सुधारित केले आहेत. यासाठी औद्योगिक क्षेत्रातील नामांकित व्यक्ती व शिक्षण तज्ज्ञ यांच्या शोध सभा घेतल्या जातात. यामधून आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगधंद्यांच्या कालानुरूप बदलत्या गरजा, मार्केट सर्व्हे, जॉब ॲनालिसिस, नवीन सॉफ्टवेअर्स, शिक्षकांचे प्रशिक्षण यावर माहिती संकलित केली जाते. या माहितीद्वारे शैक्षणिक सल्लागारांच्या मदतीने प्रोजेक्ट इन्स्टिट्यूटमध्ये कार्यशाळा घेऊन अभ्यासक्रमांना अंतिम स्वरूप दिले जाते. अभ्यासक्रम तयार करताना प्रात्यक्षिकांवर भर दिला जातो. प्रोफेशनल प्रॅक्टिस हा विषय मंडळाने सर्व सत्रांत नव्याने अनिवार्य केला असून या विषयातून विद्यार्थ्यांना मेन्टेनन्स स्किल्स, प्रकल्प अहवाल तयार करणे, सेल्फ स्टडी, सेमिनार, पेपर प्रेझेन्टेशन, विशिष्ट सॉफ्टवेअर, विशिष्ट यंत्रसामग्री, औद्योगिक भेटींचा उद्देश इत्यांदीबाबत ज्ञान दिले जाते.

### ■ नवीन अभ्यासक्रम तयार करणे

विविध क्षेत्रांमध्ये काही संस्थांमध्ये विशिष्ट परंतु मान्यताप्राप्त नसलेले कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम राबवले जात असतात. या संस्थांशी संपर्क साधून अभ्यासक्रमांना शास्त्रोक्त पद्धतीने मंडळाच्या पॅटर्नमध्ये साचेबद्ध करून मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात रूपांतरित केले जाते. हे करताना तयार होणारे कुशल तांत्रिक मनुष्यबळ हे उद्योगधंद्यांना आवश्यक असे तयार होईल यावर भर दिला जातो. दिवसेंदिवस अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांची मागणी अधिकाधिक वाढत आहे. सध्या एकूण ९० अभ्यासक्रम मंडळ राबवते व दरवर्षी मंडळ अंदाजे १० नवीन अभ्यासक्रम व तयार करते.

### ■ लॅब मॅन्युअल्स

मंडळाने ९० अभ्यासक्रमांचे विषयनिहाय लॅब मॅन्युअल्स तयार केले आहेत. लॅब मॅन्युअल्समुळे प्रयोगशाळेत व कार्यशाळेत करावयाच्या कामामध्ये एकसूत्रता आली आहे, शिवाय लॅब मॅन्युअल्समुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये काय शिकवायचे व काय शिकायचे याबद्दल एक पारदर्शकता आलेली आहे. लॅब मॅन्युअलमध्ये अनिवार्य औद्योगिक भेटी, डेमॉन्स्ट्रेशन, प्रयोग, सॉफ्टवेअर ह्यांचा उल्लेख केलेला असून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला

चालना मिळावी यासाठी भरपूर प्रमाणात प्रश्नांचा अंतर्भाव केला आहे. लॅब मॅन्युअलमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे दिसून आले आहे.

**प्रश्नपेढ्या**

अनेक विषयांच्या दर्जेदार व अचूक प्रश्नपत्रिकांसाठी संगणकीकृत प्रश्नपेढ्या तयार केल्या आहेत. संगणकीय प्रणालीचा वापर करून या प्रश्नपत्रिकांत संगणकाद्वारे बदलसुद्धा केले जाऊ शकतात. प्रत्येक प्रश्नाची चाचणी केल्यानंतरच प्रश्न प्रश्नपेढीमध्ये जमा होतो. प्रश्नपेढीमध्ये दरवर्षी काही नवीन प्रश्न अंतर्भूत केले जातात. मंडळाच्या प्रश्नपेढी योजनेचे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी स्वागत केले आहे. मंडळातर्फे सध्या ३ विषयांमध्ये ऑनलाइन परीक्षा घेतल्या जातात व यामध्ये वाढ करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ऑनलाइन परीक्षांमुळे उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामामध्ये सुलभता येते.

**अंदमान-निकोबार कंट्रोल्ड ॲकेडेमिक ॲटोनॉमी प्रकल्प**

अंदमान-निकोबार येथील पोर्ट ब्लेअरस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉलिटेक्निक या संस्थेला शैक्षणिक स्वायत्तता प्रदान झाल्यानंतर, संस्थेने पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबईची निवड केली. या तंत्रनिकेतनाच्या प्रादेशिक गरजेनुसार मंडळाने अभ्यासक्रम तयार करून दिले व त्यांना मंडळाने समतुल्यता दिली आहे. या अभ्यासक्रमाच्या परीक्षांची संपूर्ण जबाबदारी मंडळाने स्वीकारली असून, प्रमाणपत्रसुद्धा मंडळातर्फे दिले जातात. विद्यार्थ्यांचे निकाल १५ ते २० दिवसात जाहीर केले जातात. पोर्ट ब्लेअर येथे जाऊन संस्थेचे ॲकेडेमिक मॉनिटरींग केले जाते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या प्रमाणपत्रामुळे पोर्ट ब्लेअर येथील विद्यार्थ्यांना अधिकचा लाभ मिळत आहे. पोर्ट ब्लेअर येथील शिक्षकांसाठी प्रशिक्षणविषयक विशेष योजना राबवण्यात येत आहे.

**व्यवसाय मार्गदर्शन शिबिर**

तंत्रशिक्षण व व्यवसाय शिक्षण शहरांपुरते मर्यादित न राहता, विशेषकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची माहिती व्हावी; त्यांना रुची असणारे अभ्यासक्रम निवडता यावे, जेणेकरून नैराश्य येणार नाही यासाठी गावोगावी तंत्रशिक्षण व व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन मेळावे आयोजित केले जातात. ह्या मेळाव्यांमध्ये संस्थांचे स्टॉल्स लावणे, तज्ज्ञ व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्याने, शैक्षणिक कर्जाबाबतची माहिती, ॲप्टिट्यूड टेस्टिंग, करिअर प्लानिंग व त्याचे महत्त्व, व्हिडिओ प्रेझेन्टेशन इत्यादी उपक्रम राबविले जातात. तसेच इन्फरमेटिव्ह फिल्मद्वारे वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची माहिती दिली जाते. मंडळाने आजपर्यंत अनेक ठिकाणी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित केले असून त्याला हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**शिक्षकांचे प्रशिक्षण**

१. शिक्षकांसाठी औद्योगिक प्रशिक्षण : केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता शिक्षकांना प्रत्यक्ष कारखान्यामध्ये एक आठवड्याच्या औद्योगिक प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. यामुळे शिक्षकांना औद्योगिक कार्यशैलीची माहिती मिळते. अभ्यासक्रमात करण्यात आलेले तंत्रज्ञानातील बदल, त्यांना कारखान्यामध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळतात. सीमेन्स, क्रॉम्प्टन ग्रीव्हज्, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, जर्मन रेमेडीज, एच.पी.सी.एल., एच.ए.एल., अंबुजा सिमेन्ट, जैन इरिगेशन, गरवारे, टाटा पॉवर, एल ॲण्ड टी, रिलायन्स, ग्लॅक्सो इत्यादी ७० ते ८० उद्योगधंद्यांमार्फत शिक्षकांसाठी औद्योगिक प्रशिक्षणाचे महत्त्व ओळखून मंडळाला तंत्रशिक्षणाच्या गुणवत्तेसाठी मदत केली जाते. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या सहकार्याने ही योजना राबवली जात आहे. आतापर्यंत सुमारे ४,५०० शिक्षकांना औद्योगिक प्रशिक्षण संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**२. आशय नूतनीकरण प्रशिक्षण (कंटेन्ट अपडेटिंग ट्रेनिंग्ज) :** अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रमामध्ये उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार वेळोवेळी बदल करण्यात येत असतात. शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत असल्याशिवाय ते विद्यार्थ्यांपर्यंत पोचणार नाही, याची मंडळाने दखल घेऊन शिक्षकांसाठी आशय नूतनीकरण प्रशिक्षण आयोजित केले आहे. हे प्रशिक्षण एक ते दोन आठवडयाचे असून लिनेक्स सिस्टीम, अर्थक्वेक इंजिनिअरिंग, स्टॅडप्रो, न्यू ट्रेंड्स इन ऑटोमोबाईल सेक्टर, डिजिटल कम्युनिकेशन, जिओ-इन्फॉरमॅटिक्स, इंडस्ट्रीअल ड्राइव्ह, क्लिनिकल फार्मसी, कम्युनिटी फार्मसी, एम्बेडेड सिस्टीम डिझाइन, सीएनसी प्रोग्रॅमिंग, सॉलिड वर्क्स, मायक्रो इरिगेशन अशासारख्या अनेक अद्ययावत विषयांवर शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. आतापर्यंत सुमारे ५२६९ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.



२०१२-१३ मध्ये एकूण ६० व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येऊन २१६ खेडी व ३६ शहरांमध्ये एकूण ६ लक्ष विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. २०१३-१४ मध्ये एकूण ७ लक्ष विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे व जास्तीत जास्त ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्याचे मंडळाने ठरविले आहे.

**३. जीवन कौशल्य (लाइफ स्किल्स) :** अभियंते हे केवळ तांत्रिक कौशल्यामध्येच पारंगत नसावेत तर मार्केटिंग, कम्युनिकेशन, प्रोजेक्ट प्लानिंग, गोल सेटिंग, टाइम मॅनेजमेन्ट, डिसिजन मेकिंग, प्रॉब्लेम सॉल्विग, एथिक्स, इमोशन्स, स्ट्रेस मॅनेजमेन्ट, फायनान्स, बँकिंग, ऑर्गनायझेशनल स्किल्स, टेक्निकल रायटिंग अशा विविध क्षेत्रात पारंगत असावेत, अशी उद्योगधंद्यांची अपेक्षा असल्यामुळे जीवन कौशल्य हा विषय प्रत्येक सत्रामध्ये मंडळाने अनिवार्य केला आहे. जीवन

कौशल्य या विषयाची परीक्षा प्रात्यक्षिकाद्वारे घेतली जाते हे विशेष. लाईफ स्किलचे महत्त्व ओळखून अभ्यासक्रमात त्याचा व्यापक प्रमाणात अंतर्भाव करणारे देशातील हे एकमेव मंडळ आहे. ह्यासाठी शिक्षकांचे व्यावसायिक संस्थांच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते. केले जाते. जीवन कौशल्य या विषयामुळे विद्यार्थ्यांमध्ये जीवन विषयक सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

**४. हॅण्डस् ऑन स्किल्स :** तांत्रिक साहाय्यक कर्मचारी व विषयांची गरज असणाऱ्या संबंधित प्राध्यापकांसाठी गरजाधिष्ठित कौशल्य (हॅण्डस् ऑन स्किल्स)च्या प्रशिक्षणाचीसुद्धा योजना केली आहे.

**५. विविध कार्यशाळांना अर्थसाहाय्य :** तंत्रनिकेतनांतील शिक्षकांना तांत्रिक पेपर सादरीकरणासाठी राज्यस्तरीय किंवा राष्ट्रीय स्तरापर्यंत तांत्रिक पेपर सादर करण्यासाठी जाता यावे यासाठी मंडळातर्फे १०,०००/- रुपयेपर्यंत अर्थसाहाय्य दिले जाते.

## एम.एस.-सी.आय.टी.

संगणक साक्षरता वेगाने व प्रभावीरीत्या तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या एम.एस.सी.आय.टी. अभ्यासक्रमाची ऑनलाइन परीक्षा घेण्याचे काम मंडळ करीत आहे. ५० लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची एम.एस.सी.आय.टी ऑनलाइन परीक्षा मंडळाने महाराष्ट्रात १००० केंद्रांवर घेतली आहे. परीक्षा केंद्र तालुक्याच्या ठिकाणी किंवा त्याहीपेक्षा लहान गावी प्रस्थापित केली जातात. इंग्रजीशिवाय मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध असून गुजराती व हिंदी भाषेतून परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. अपंग व अंध विद्यार्थ्यांच्या एम.एस.सी.आय.टी. ऑनलाइन परीक्षा घेण्याची सोय जिल्ह्यातील किमान एका केंद्रावर केली गेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना कमीत कमी अंतरावरच्या परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे शक्य होते.

## विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

१. शिष्यवृत्ती : होतकरू व गरजू, हुशार विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक परिस्थितीमुळे अर्धवट राहू नये किंवा एखाद्या विद्यार्थ्याच्या वडलांचे दुर्दैवी निधन झाल्यास त्याच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता दरवर्षी शिष्यवृत्त्या देण्याचा मंडळाने नुकताच निर्णय घेतला आहे. निवड झालेला विद्यार्थी प्रथम श्रेणीमधून दरवर्षी उत्तीर्ण झाला तर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत दरवर्षी २,५५९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी अंदाजे ७,५००/- रुपये शिष्यवृत्ती मिळेल. अशा पद्धतीने २००७-०८ पासून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्ती देऊन विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

**२. राज्यस्तरीय विद्यार्थी शोधनिबंध सादरीकरण (स्टुडन्टस् पेपर प्रेझेन्टेशन)**

विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेतच तांत्रिक पेपर लिहिण्याचे कौशल्य जोपासावे या दृष्टीने मंडळ राज्यस्तरीय स्टुडन्ट पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धा आयोजित करते. राज्यातील सर्व तंत्रनिकेतने या स्पर्धेत भाग घेतात. वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या स्पर्धा वेगवेगळ्या गावी



घेतल्या जातात. विद्यार्थ्यांना संपूर्ण खर्च, आकर्षक पारितोषिके व मंडळाची प्रमाणपत्रे दिली जातात. या वर्षी पाच तंत्रनिकेतन संस्थांमध्ये कॉम्प्युटर, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व फार्मसी या अभ्यासक्रमांवर आधारित स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

**३. तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धा (टेक्निकल क्विज कॉम्पिटिशन) :** मंडळातर्फे टेक्निकल क्विज कॉम्पिटेशन दरवर्षी वेगवेगळ्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या गावी घेतल्या जातात. विद्यार्थ्यांनी आनुषंगिक ज्ञान मिळवावे तसेच उद्योगधंद्यांच्या अपेक्षेप्रमाणे तांत्रिक मनुष्यबळ तयार व्हावे याकरिता टेक्निकल क्विज कॉम्पिटिशनचे आयोजन केले जाते. यावर्षी इलेक्ट्रॉनिक्स, हॉटेल मॅनेजमेंट, कॉम्प्युटर, आय. टी. मेकॅनिकल इंजिनिअरिंग व फार्मसी या अभ्यासक्रमांवर आधारित क्विज् कॉम्पिटिशन्स् पाच संस्थांमधून आयोजित करण्यात आल्या होत्या.

**४. प्रकल्प स्पर्धा (प्रोजेक्ट स्पर्धा व पेटंटिंग) :** अंतिम वर्ष पदविका विद्यार्थ्यांना समाजास उपयुक्त अशा विषयावर प्रोजेक्ट (प्रकल्प) तयार करणे अभ्यासक्रमानुसार आवश्यक आहे. तथापि सध्याच्या परीक्षेच्या युगामध्ये अशा प्रकल्पांची गुणवत्ता कमी होत असल्याचे निदर्शनास आल्याने, मंडळाने मागील दोन वर्षांपासून प्रकल्प स्पर्धा आयोजित करून संशोधनात्मक व उपयुक्त प्रकल्पाला पारितोषिके जाहीर केली. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना पेटंट करण्याकरिता प्रोत्साहित केले. आतापावेतो मंडळाने या योजनेंतर्गत ८ पेटंट्स मिळविले असून यावर्षी ४९ अर्ज पेटंट्साठी दाखल केले आहेत.

**५. रोजगार क्षमता विकास योजना :** विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमतेविषयी आकर्षण निर्माण व्हावे व त्यांनी त्याकरिता यथोचित तयारी करावी याकरिता मंडळाने रोजगार क्षमता विकास योजना मागील वर्षीपासून सुरू केली असून त्याअंतर्गत सध्याच्या ३० टक्के रोजगार क्षमतेमध्ये वाढ करून प्रतिवर्षी १५ टक्के वाढ करण्याचे ठरविले आहे. या योजनेमार्फत विद्यार्थ्यांना त्यांचा रोजगार क्षमता गुणांक प्राप्त होणार असून हा गुणांक वाढविण्याकरिता त्यांना मार्गदर्शनही प्राप्त होत आहे.

## ई-लर्निंग

दुर्गम भागातील अनेक संस्थातील विद्यार्थ्यांना एकाच वेळी, तज्ज्ञ व्याख्यांनाचा फायदा मिळावा यासाठी प्रायोगिक तत्त्वावर १७ संस्थांमध्ये, मंडळाने व्हर्च्युअल लर्निंग सेंटर ची स्थापना केली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला असून विद्यापीठाशी संलग्न स्टुडिओमधून एज्युसॅट उपग्रहाद्वारे ही व्याख्याने प्रक्षेपित करण्यात येत आहेत. ज्या खाजगी संस्था स्वत: व्हर्च्युअल लर्निंग सेंटरसाठी लागणारी यंत्रसामग्री स्थापित करतील, त्या संस्थांतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना या योजनेचा विनामूल्य लाभ मिळेल. ई-लर्निंगद्वारे शिक्षकांचे प्रशिक्षणसुद्धा आयोजित केले जातील. तसेच कॉरस्पॉन्डन्सचे काही ऑनलाइन अभ्यासक्रमसुद्धा सुरू करण्यात येतील.

**(पान ४३ वर)**

# महा-कौशल्यनिर्मिती

## रोजगार-स्वयंरोजगार निर्मितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था बजावत असलेली अप्रतिम भूमिका



राज्यात ४१६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) असून साधारणपणे प्रत्येक तालुक्यात एक संस्था आहे. महिलांसाठी १५ स्वतंत्र आय.टी.आय. आहेत. राज्यातील कोणत्याही तालुक्यातील महिलांना या १५ संस्थेत प्रवेशासाठी अर्ज करता येतो. इतर सर्वसाधारण आय.टी.आय.मध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहेत.

**प्रवेश प्रक्रिया :** १० वीचा निकाल घोषित झाल्यानंतर आय.टी.आय.मधील प्रवेश प्रक्रिया सुरू होते. प्रवेशाचे वेळापत्रक संचालनालयाकडून घोषित केले जाते. प्रवेश अर्ज व माहितीपुस्तिका राज्यातील सर्व संस्थांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध असतात.

**शैक्षणिक अर्हता :** व्यवसाय अभ्यासक्रम ८ वी, १० वी व १२वी अशा वेगवेगळ्या शैक्षणिक अर्हता आहेत. प्रत्येक शैक्षणिक अर्हतेसाठी वेगळे अर्ज करावे लागतात. यामुळे सर्व व्यवसायांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध होते. कमी शैक्षणिक अर्हतेच्या व्यवसाय अभ्यासक्रमासाठी जास्त शैक्षणिक अर्हता असलेले उमेदवार अर्ज करू शकतात. मात्र अर्जासोबत आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेले गुणपत्रक जोडावे लागते.

**प्रवेशाबाबत महत्त्वाच्या सूचना**

- अर्ज विकत घेताना अर्जासोबत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक मिळते ते जपून ठेवा व प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत त्याचा वापर करा.
- गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यावर आपल्या गुणवत्ता क्रमांकाची खात्री करून त्याची नोंद करून घ्या. हाच क्रमांक प्रवेश प्रक्रियेदरम्यान वापरला जातो.
- वेळापत्रकानुसार होणाऱ्या प्रवेश फेऱ्यांना उपस्थित राहा. पहिल्या प्रवेशफेरीत प्रवेश न मिळाल्यास अंतिम व महाअंतिम फेरीपर्यंत प्रत्येक फेरीस उपस्थित राहा. त्यामुळे आपली संधी हुकणार नाही.
- अर्जासोबत त्या संस्थेत त्या प्रवेश वर्षात कोणत्या व्यवसायात प्रवेश उपलब्ध आहेत याची माहिती दिलेली असते. जे व्यवसाय तालुका स्तरावर उपलब्ध नसतील अशा व्यवसायांसाठी जिल्ह्यातील इतर संस्थांत अर्ज करता येतो, जिल्ह्यात जे व्यवसाय उपलब्ध नसतील त्या व्यवसायांसाठी विभागात अर्ज करता येतो.



- सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत उपलब्ध असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात ज्या उमेदवारांना प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांनी ज्या संस्थेत ते व्यवसाय उपलब्ध आहेत. त्या संस्थेत स्वतंत्ररीत्या प्रवेश अर्ज सादर करावेत.

**प्रवेशासाठी वयोमर्यादा :** किमान वय १४ वर्ष पूर्ण असावे. कमाल वयोमर्यादेची कोणतीही अट नाही.

**प्रशिक्षणादरम्यान मिळणाऱ्या सुविधा –** ५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्येकी दरमहा रु ४०/- प्रमाणे विद्यावेतन, इ.बी. सी. सवलतीचा लाभ, अनुसूचित जाती / जमाती विमुक्त व भटक्या जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या नियमानुसार विद्यावेतन, एस.टी., रेल्वे प्रवास सवलत, अनुसूचित जातीच्या अल्पसंख्याक समाजातील प्रशिक्षणार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती., अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु ५००/- व वसतिगृहात राहणाऱ्यांना रु ६००/- निर्वाह भत्ता.

**रोजगार व स्वयंरोजगारासाठी साहाय्य**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांचा कालावधी सहा महिने ते तीन वर्षांपर्यंत असतो. यादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी असतात. प्रशिक्षणानंतर रोजगार, स्वयंरोजगाराच्या मार्गदर्शनासाठी प्रत्येक संस्थेत ट्रेनिंग, करिअर ॲण्ड प्लेसमेंट सेल स्थापन करण्यात आले असून, प्रशिक्षणादरम्यान अनेक कंपन्या मुलाखती घेण्यासाठी येतात. बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांची प्रशिक्षण पूर्ण होण्याआधीच निवड झालेली असते. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर कारखान्यातील दोन/तीन वर्षांचा अनुभव घेऊन चांगल्या प्रकारे करिअर घडवता येऊ शकते.

**उज्ज्वल भविष्य :** पुढील दोन दशकात २३ कोटी भारतीयांना जगभरातल्या नोकरी-व्यवसायांच्या संधी उपलब्ध आहेत. यापैकी ९० टक्के नोकरी व्यवसायांच्या संधी तंत्राधारित कौशल्य असलेल्या उमेदवारांसाठी आहेत. आय.टी.आय.मधील व्यवसाय अभ्यासक्रमात ही कौशल्ये आत्मसात करून आपले भवितव्य घडविणे आपल्याच हातात आहे.


**विजयकुमार गौतम**

(संचालक, प्रशिक्षण आयुक्त, कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय)


## कमवा आणि शिका

(शिकाऊ उमेदवारी योजना)

औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करून विद्यार्थी सर्वदृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली.

**योजनेचे स्वरूप :** देशातील खाजगी, निमशासकीय व शासकीय उद्योगधंद्याच्या गरजेप्रमाणे राज्यात एकूण १८१ व्यवसायात

कालमानाप्रमाणे आवश्यकतेनुसार नवीन व्यवसाय सुरू करण्यात येतात व कालबाह्य व्यवसाय वगळण्यात येतात.

**योजनेची वैशिष्ट्ये**

❍ या योजनेमुळे चांगल्या दर्जाचे कुशल कारागीर तयार होतात. त्यामुळे उत्पादन चांगल्या दर्जाचे होऊन उद्योगात भरभराट होते, ❍ यंत्रसामग्रीला हानी पोहोचत नाही, ❍ अपघात कमी होतात, ❍ कामगारांमध्ये योग्य पद्धतीने विचार करण्याची तसेच पुढाकार घेण्याची क्षमता निर्माण होते. नियोजनाप्रमाणे काम करण्याची क्षमता निर्माण झाल्याने त्यांच्यावर विशेष पर्यवेक्षण करण्याची आवश्यकता भासत नाही, ❍ या योजनेंतर्गत प्रशिक्षित झालेला उमेदवार पुढे कारखान्यांमध्ये पर्यवेक्षीय कामासाठी उपयुक्त



ठरू शकतो., ❍ असा युवक त्याने प्राप्त केलेल्या कौशल्याबाबत स्वाभिमानी असतो आणि कारखान्यामध्ये कामगार संबंध चांगले ठेवण्यासाठी सहकार्य करतो.


औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या योजनेखाली निर्देशित संस्थेतून व्यवसायामध्ये प्रशिक्षण कालावधीमध्ये सूट मिळते. अशी सूट मिळालेल्या उमेदवारांना मूलभूत प्रशिक्षण घ्यावे लागत नाही. त्यांना कार्यशाळा प्रशिक्षण सैद्धांतिक विषयाचे प्रशिक्षण द्यावे लागते. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांची परीक्षा, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून दरवर्षी एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात घेण्यात येते. उत्तीर्ण उमेदवारांना या परिषदेकडून प्रमाणपत्र देण्यात येते.

**शिकाऊ उमेदवारांच्या भरतीसाठी संपर्क**

या योजनेखाली विहीत अर्हताधारक शिकाऊ उमेदवार नेमण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित आस्थापनेची आहे. आस्थापनेचे प्रतिनिधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जाऊन मुलाखत/लेखी परीक्षेद्वारे उमेदवारांची निवड करतात. आस्थापना / सेवायोजन कार्यालय जाहिरात किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी मागवून उमेदवारांची निवड करतात. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण इच्छुक उमेदवारांना शासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक सूचना; केंद्रातून मुलाखत पत्र देऊन त्यांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी त्या त्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संपर्क साधणे आवश्यक आहे.

**भरतीचा कालावधी :** शिकाऊ उमेदवारांची भरती फेब्रुवारी/ऑगस्ट या सत्रात करण्यात येते. फेब्रुवारी सत्रासाठी १६ जानेवारी ते १५ एप्रिल व ऑगस्ट सत्रासाठी १६ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत भरती करण्यात येते. (वय व शारीरिक पात्रता- वय : १४ वर्षे पूर्ण, वजन : किमान २५.४ किलो उंची : किमान १३७ सें.मि, दृष्टी : चांगली.) शारीरिकदृष्ट्या अपंग उमेदवारांचा ठरावीक व्यवसायासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार विचार करण्यात येतो.

**विद्यावेतन :** दरमहा-प्रथम वर्ष- रु. १४९०/-, द्वितीय वर्ष-रु. १७००, तृतीय वर्ष-रु., १९७०, चतुर्थ वर्ष-रु.२२२०/- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत प्रशिक्षण कालावधीत अनुज्ञेय असलेली सूट विचारात घेऊन प्रवेश दिला जातो. ही सूट लक्षात घेऊन त्यांना विद्यावेतन देय असते. उदा. जोडारी व्यवसायामध्ये दोन वर्षांचे प्रशिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत घेऊन उत्तीर्ण झालेल्या व जोडारी व्यवसायात शिकाऊ उमेदवारी करत असलेल्या उमेदवारांस दोन वर्षाची सूट मिळते व तो तिसऱ्या वर्षाचे रु. १९७०/- दरमहा विद्यावेतन मिळण्यास पात्र असतो.



**सद्य:स्थिती**

या योजनेंतर्गत एकूण ४६,५७६ जागा भरलेल्या आहेत.

'कमवा व शिका' अशा स्वरूपाची योजना असून कुशल मनुष्यबळ निर्मितीला चालना देणारी आहे व युवकांना कारखान्यातील कामाचा अनुभव देऊन त्यांची दृष्टी विशाल करणारी आहे.

## कुशल मनुष्यबळ निर्मिती

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी देण्यात येणारे प्रशिक्षण हे खाजगी



आस्थापनांच्या कौशल्य गरजानुसार असण्यासाठी; पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (सार्वजनिक खासगी सहभाग) अंतर्गत या संस्थांचा दर्जा वाढवण्याचा निर्णय देश पातळीवर घेण्यात आला. या योजनेंतर्गत १,३९६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यात आला आहे.

या योजनेसाठी महाराष्ट्राकरिता २२% वाटा केंद्रशासनाकडून मिळाला आहे. राज्यात २००७-०८ पासून ही योजना राबवण्यात येत आहे. आतापर्यंत २५० संस्थांना प्रत्येकी रु. २.५ कोटी बिनव्याजी कर्ज स्वरूपात प्राप्त झालेले आहे.

**योजनेची उद्दिष्टे :** या योजनेंतर्गत संस्थांची दर्जा वाढ करणे, संस्थांचे आधुनिकीकरण करणे, गुणवत्तायुक्त प्रशिक्षण देण्यासाठी शिल्पनिर्देशकांना खाजगी आस्थापनात प्रशिक्षित करणे., संस्थेतील प्रवेशक्षमता खाजगी आस्थापनांचे कौशल्य गरजेनुसार वाढविणे आस्थापनांच्या कौशल्यांची निकड लक्षात घेऊन व आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालून प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणे.

**योजनेची वैशिष्ट्ये :** संस्थेकरिता एका उद्योजकाची सहयोगी उद्योग म्हणून निवड करून त्यांच्या अध्यक्षतेखाली संस्था व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येते. समितीत परिसरातील अन्य चार उद्योजक व शासनाचे सहा प्रतिनिधी असतात. संस्थेचे


प्राचार्य हे सदस्य सचिव असतात. संबंधित सहयोगी उदोग राज्य व केंद्रशासन यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार केला जातो.

संस्था व्यवस्थापन समितीला मर्यादित आर्थिक व शैक्षणिक स्वायतत्ता देण्यात आली आहे.

संस्था व्यवस्थापन समितीला राज्यशासनाने ठरवून दिलेले प्रवेश शुल्क आकारून २०% प्रवेश करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**संस्थांच्या विकासातील सहभाग**

संस्था विकास आराखडा तयार करणे, परिसरातील खाजगी आस्थापनांचे सर्वेक्षण करणे, कौशल्य निकड लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, प्रशिक्षणांच्या गरजा लक्षात घेऊन इतर औद्योगिक आस्थापनेत प्रशिक्षणासाठी नियुक्त करणे, प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी संस्थेतील उणिवा शोधून प्रशिक्षकांना मार्गदर्शन करणे, प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी संस्था व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने खाजगी औद्योगिक आस्थापनांना भेटी, प्रत्यक्ष आस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, इ. बाबी आयोजित करणे, प्रशिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याकरिता प्रशिक्षकांना आधुनिक यंत्रसामग्री तसेच कार्यात्मक कौशल्य विषयक प्रशिक्षण देणे, प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी मिळविण्यासाठी मदत करणे, प्रशिक्षणार्थ्यांकरिता औद्योगिक आस्थापनात असलेल्या वातावरणाची ओळख व निर्मिती संस्थेत करणे, जागतिक दर्जाचे कारागीर निर्माण करणे, कारखान्याप्रमाणे संस्था व्यावसायिक तत्त्वावर चालविण्याची समज निर्माण करणे, या बाबींचा समावेश आहे.



**अल्पमुदतीचे अभ्यासक्रम**

राज्यात २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध खाजगी औद्योगिक आस्थापना कार्यरत असून इस्पात इंडस्ट्रीज, व्हिडिओकॉन इंडस्ट्रीज, वॉकार्ड लि., भारत फोर्ज लि., जे.एस. डब्ल्यू. स्टिल, किस्टोन रिअल्टर प्रा. लि., रेमंड लि. टाटा इंडस्ट्रीज, प्राज इंडस्ट्रीज लि. इ. नामांकित आस्थापनाचा सहयोगी उद्योजक म्हणून सहभाग मिळालेला आहे.



या योजनेंतर्गत ऑगस्ट २०१२ पर्यंत ७३५ तुकड्या सुरू करण्यात आल्या असून विद्यार्थ्यांच्या प्रवेशक्षमतेत १४,३०२ वाढ झाली आहे. या योजनेंतर्गत ४२ संस्थेत सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्यात आले आहेत. राज्यातील १०० प्रशिक्षकांना खाजगी आस्थापनांच्या साहाय्याने प्रशिक्षण देण्यात आले आहे. या संस्थांच्या पायाभूत सुविधा आधुनिक स्वरूपाच्या झाल्या आहेत. परिसर विकास, अद्ययावत यंत्रसामग्री/फर्निचर, संगणक केंद्र, कॉन्फरन्स हॉल इ. ची निर्मिती केली आहे. औद्योगिक आस्थापनाच्या सहभागामुळे प्रशिक्षणार्थ्यांना असलेल्या रोजगाराच्या संधीत वाढ झाली आहे.



**संपर्क** : या २५० औ. प्र. संस्थांची व सहयोगी उद्योजकांची नावे संचालनालयाच्या www.dvet.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहेत.

## कौशल्य विकास योजना

भारत सद्यस्थितीत जागतिक स्तरावर लोकसंख्येच्या दृष्टीने १२२ कोटीसह क्रमांक २ चा देश असून देशातील लोकांचे सरासरी वयोमान ३० वर्षे आहे. भारताच्या तुलनेत इतर विकसित देशातील लोकांचे सरासरी वयोमान बरेच आहे. भारतात २०२० पर्यंत ६५% लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील तर ५०% लोकसंख्या २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील असेल. भारतातील लोकांचे सरासरी वयोमान २९ वर्षे असेल. तुलनेत चीनचे सरासरी वयोमान ३७ वर्ष तर जपानचे ४८ वर्ष असेल. त्याचप्रमाणे इतर विकसित देशांचे ६० वर्षापेक्षा अधिक असेल. म्हणजेच २०२० पर्यंत भारत हा जगातील सर्वात तरुण देश असेल. परिणामी सर्वात तरुण व जास्त उत्पादनक्षमता असलेले मनुष्यबळ भारताकडे असेल. त्यामुळे भविष्यात इतर विकसित देशांमध्ये भारतातील कौशल्य प्राप्त मनुष्यबळाची मागणी अधिक वाढेल.

भारतातील तरुणांना उत्पादनक्षम बनविण्यासाठी जागतिक स्तरावरील बदलणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानारूप कौशल्याधारित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुण उपजत कौशल्य, आवड यानुसार विशिष्ट क्षेत्रातील कौशल्य प्राप्त करून रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनू शकेल. उत्पादन व सेवाक्षेत्रात योगदान देऊन राष्ट्रीय उत्पादनात भर घालू शकेल.

या सर्व बाबींचा विचार करून राष्ट्रीय स्तरावर पंतप्रधानांनी 'कौशल्य विकास' या कार्यक्रमास मिशनमोड कार्यक्रम म्हणून घोषित केले आहे.

**राष्ट्रीय कौशल्य विकास योजनेची उद्दिष्टे :**

- सन २०२२ पर्यंत ५० कोटी एवढे मनुष्यबळ विकसित करणे, समाजातील सर्व स्तरांवरील उमेदवारांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन स्त्री/पुरुष ग्रामीण/शहरी, संघटित/असंघटित इतर घटकांतील दरी कमी करणे, उत्पादन व सेवाक्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञाना अनुरुप कुशल मनुष्यबळाचा मागणीनुसार पुरवठा करणे, प्रत्येक नागरिकाच्या जीवनशैलीच्या दर्जात वाढ करणे, देशातील गुंतवणुकीस प्राधान्य देणे.

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास कार्यक्रम**

राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १३% असून राष्ट्रीय लोकसंख्येत ९.२८% एवढा वाटा आहे. त्यानुसार राज्याने प्रतिवर्षी २०.६५ लाख याप्रमाणे (वाढीव दराने) २०२२ पर्यंत ४.५ कोटी एवढे कुशल मनुष्यबळ विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर त्रिस्तरीय कार्यसमिती गठित करण्यात आली आहे.

या योजनेच्या संनियंत्रण, नियोजन व प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तसेच योजनेचा लाभ गाव पातळीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या दृष्टीने विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती, जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**विविध सहभागी मंत्रालयीन विभाग**

१) उद्योग संचालनालय, २) शालेय

शिक्षण विभाग, ३) सामाजिक न्याय विभाग, ४) महिला व बालकल्याण विभाग, ५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ६) कृषी व पर्यटन विभाग, ७) सामाजिक आरोग्य विभाग, ८) ग्रामीण विकास विभाग, ९) आदिवासी विकास विभाग, १०) पशु संवर्धन व दुग्धविकास विभाग, ११) वैद्यकीय शिक्षण विभाग

**राज्यस्तरावरील कार्यवाही**

**स्किल गॅप स्टडी –** प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे राज्यातील अधिक मागणीच्या ११ क्षेत्रांची या योजनेसाठी निवड करण्यात आली आहे. कार्यरत विविध आस्थापनांमध्ये या क्षेत्रातील विशिष्ट कौशल्य प्राप्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत देण्यात येणाऱ्या औद्योगिक शिक्षण पद्धतीत शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या उमेदवारांकडे असलेले कौशल्य व प्रत्यक्षात औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असलेले कौशल्य यात तफावत असल्यामुळे विविध क्षेत्रात रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध असूनही संबंधित आस्थापनांना प्राप्त उमेदवार मिळण्यास अडचण येते. या औपचारिक शिक्षण पद्धतीतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या उमेदवारांना विशिष्ट कौशल्याअभावी रोजगार मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही बाब विचारात घेऊन अधिक मागणी असलेल्या खालील ११ क्षेत्रातील स्किल गॅप स्टडीबाबत अहवाल तयार करण्यात आला.

अधिक मागणीचे ११ क्षेत्र –

१) बांधकाम, (कन्स्ट्रक्शन) २) उत्पादन व निर्मिती (प्रॉडक्शन आणि मॅन्युफॅक्च्युरिंग) ३) ऑटोमोबाइल ४) वस्त्रोद्योग (टेक्स्टाइल) ५) आतिथ्यसेवा (हॉस्पिटॅलिटी) ६) आरोग्यसेवा (हेल्थकेअर) ७) बँक, वित्त, विमा (बँकिंग, फायनान्स, इन्शुरन्स ८) रिटेल ९) औषधीनिर्माण व रसायने १०) कृषीप्रक्रिया ११) माहिती तंत्रज्ञान व या तंत्रज्ञानावर आधारित उद्योग सेवा

वरील ११ क्षेत्रांपैकी बँक, वित्त आणि विमा व औषधीनिर्माण व रसायने ही क्षेत्रे वगळता इतर ९ अहवाल तयार झाले आहेत. या अहवालानुसार या क्षेत्रात २०२२ पर्यंत विविध स्तरावरील मनुष्यबळाची आवश्यकता अंदाजे खालीलप्रमाणे आहे.



| क्षेत्र | लागणारे मनुष्यबळ (लाखांत) |
|---|---|
| बांधकाम | ८ |
| निर्मिती आणि उत्पादन | ३४ |
| वस्त्रोद्योग | २५० |
| ऑटोमोबाइल | ५५ |
| आतिथ्य (हॉस्पिटॅलिटी) | २ |
| आरोग्यसेवा | ३ |
| रिटेल | १७३ |
| माहिती तंत्रज्ञान व त्यावर आधारित सेवा | १६ |
| कृषी प्रक्रिया | ५ |

या अधिक मागणीच्या क्षेत्रातील विविध औद्योगिक व सेवाक्षेत्रातील आस्थापनांना आवश्यक असणारे मनुष्यबळ विकसित करुन त्याचा सातत्यपूर्ण पुरवठा करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :–

- औद्योगिक व सेवाक्षेत्रातील विशिष्ट कौशल्य प्राप्त मनुष्यबळाची मागणी नोंदविणे, इच्छुक कौशल्य प्राप्त उमेदवारांची रोजगार स्वयंरोजगार मिळण्याच्या दृष्टीने नोंदणी करणे, या उमेदवारांची व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामार्फत कल चाचणी / कौशल्य चाचणी घेणे, औद्योगिक आस्थापनांच्या मागणीनुसार उमेदवार कौशल्य प्राप्त करत असल्यास त्यास संबंधित आस्थापनेकडे रोजगाराच्या दृष्टीने मुलाखतीकरिता पाठविणे, मागणीनुसार उमेदवार कौशल्य प्राप्त करत नसल्यास त्यास आवश्यक कौशल्य प्राप्त करण्याकरिता स्किल गॅप, कल चाचणी, उपलब्ध रोजगाराच्या संधीनुसार प्रशिक्षण कार्यक्रम सुचविणे.
- हे प्रशिक्षण उमेदवाराच्या इच्छेनुसार महाराष्ट्रातील कोणत्याही नोंदणीकृत मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थामधून घेण्यास मुभा असेल.
- संबंधित प्रशिक्षण संस्था या उमेदवाराचे प्रशिक्षण पूर्ण करून त्यास रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देण्यास बांधील असेल.

टीप :– वरील सर्व प्रकारच्या आस्थापना व उमेदवारांची नोंदणी रोजगार स्वयंरोजगार विभागाच्या www.maharojgar.com या वेबसाइटवर करण्यात येते.

**रोजगार व स्वयंरोजगारासाठी लक्षगट व पात्रता :**

उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा,



संबंधित रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात/ वेबपोर्टलवर त्याने नावनोंदणी केलेली असावी, शैक्षणिक पात्रता इ. १० वी पास / नापास, उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षे असावे, अपंग/प्रकल्पग्रस्त/महिला/माजी सैनिक/ खेळाडू/ भूकंपग्रस्त/ गिरणी कामगार अथवा त्यांचे पाल्य/बारबाला इत्यादींना प्राधान्य.

**प्रशिक्षण सुविधा**

- राज्यातील विविध विभागांतर्गत उपलब्ध प्रशिक्षण सुविधांचा महत्तम वापर करून प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येतो.
- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात कार्यरत प्रशिक्षण संस्थांची क्षमता खालीलप्रमाणे वाढवण्यात येत आहे :–

सद्य:स्थितीत कौशल्य विकास योजनेंतर्गत राज्यात एकूण ९५७ नोंदणीकृत प्रशिक्षण संस्था कार्यरत असून डिसेंबर २०१३ पर्यंत ही संख्या १,५०० ने वाढविण्यात येईल.





सद्य:स्थितीतील राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची एकूण प्रवेशक्षमता १.५ लाख असून १२ व्या पंचवार्षिक योजनेअखेर ती २ लाखापर्यंत वाढविण्यात येईल.

❍ सद्य:स्थितीत कार्यरत प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने व प्रशिक्षण जास्तीत जास्त रोजगाराभिमुख करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक खाजगी सहभाग (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) योजनेच्या माध्यमातून सेवा व औद्योगिक क्षेत्रातील आस्थापनांचा सहभाग वाढविण्यात येईल.

राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास समन्वय समितीच्या सूचनेनुसार आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांच्यामार्फत वेबपोर्टल तयार करण्यात आले असून त्यात संबंधितांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. राज्यस्तरावर कार्यान्वित झालेले हे देशातील पहिलेच वेबपोर्टल आहे. ज्याच्या माध्यमातून इच्छुक उमेदवारांना इच्छित प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेऊन रोजगार देणाऱ्या आस्थापनांशी संपर्क साधता येईल. तसेच आस्थापनांना त्यांच्या विशिष्ट मागणीनुसार कुशल मनुष्यबळापर्यंत/ उमेदवारापर्यंत पोहोचता येईल व संपर्क साधता येईल. त्यासाठी मात्र सर्व संबंधितांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. उमेदवारांसाठी ही सेवा विनाशुल्क उपलब्ध आहे.



**सेवायोजन कार्यालयाचे आधुनिकीकरण**

❍ राज्यातील सर्व सेवायोजन कार्यालयाचे आधुनिकीकरण करण्यात येत असून उमेदवारांना रोजगाराच्या दृष्टीने एस.एम.एस. अलर्ट सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

❍ सर्व सेवायोजन कार्यालयांचे विकेंद्रीकरण करण्यात आले असून राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र निकेतन, इंजिनीअरिंग कॉलेजेस इ. च्या माध्यमातून ६,४१३ केंद्रांद्वारे ही सेवा पुरविण्यात येईल. आगामी काळात २५००० ग्राम संग्राम केंद्रांचे रूपांतर ही सेवा देण्याच्या दृष्टीने महा-ई सेवा केंद्रात करण्यात येईल.

**समुपदेशन व मार्गदर्शन केंद्रे**

सर्व सेवायोजन कार्यालयांचे रूपांतर व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रात टप्प्या-टप्प्याने करण्यात येत आहे. त्यासाठी प्रथम टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथे ही केंद्रे सुरू करण्यात येत आहे. स:द्यस्थितीत गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त विभागात १५ डिसेंबर २०१२ पासून ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. पुढील टप्प्यात राज्यातील सर्व जिल्ह्यांतील ४१६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात येईल.

याव्यतिरिक्त कुशल मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :

❍ आदिवासी उमेदवारांच्या विकासाच्या दृष्टीने २८ आदिवासी आश्रमशाळांचे रूपांतर व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळा (मिनी आयटीआय) मध्ये करण्यात आले आहे.

❍ राज्यात ४१६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यात ३ शिफ्टमध्ये विविध ८० व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्याची एकूण प्रवेशक्षमता १.५ लाख आहे.

❍ आर्टिझन टू टेक्नोक्रॅट या योजनेच्या माध्यमातून ५२ सेंटरमधून पारंपरिक पद्धतीने कौशल्य प्राप्त केलेल्या कारागिरांना प्रमाणपत्र देण्यासाठी सुविधा उपलब्ध असून आतापर्यंत १०,००० उमेदवारांनी त्याचा लाभ घेतला आहे.

❍ महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांमधून हजारपेक्षा अधिक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध असून त्याची एकूण प्रवेशक्षमता ६०,००० आहे.

❍ या व्यतिरिक्त राज्यात हुन्नर से रोजगार, एम.ई.एस., सुवर्ण जयंती रोजगार योजना, मानव विकास योजनांद्वारे कौशल्य विकास प्रशिक्षण सुविधा उपलब्ध आहेत.

## नवी संधी

( वंचित/दुर्बल घटकांसाठी विशेष प्रशिक्षण योजना)

**आदिवासी विद्यार्थ्यांसाठी :**

ही योजना एकूण १२ उपयोजनांसह २३ ऑगस्ट २००४ पासून आदिवासी लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या ६१ संस्थांमध्ये सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा १९,४३९ लाभार्थ्यांना उपयोग होतो. या योजनेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करण्यात आली असून, तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ६०० रु व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०० रु निर्वाहभत्ता देण्यात येतो.

**अल्पसंख्याक विद्यार्थी**

या योजनेंतर्गत उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या असून दरवर्षी ४,४१६ अल्पसंख्यांक उमेदवारांना त्याचा लाभ होत आहे. राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली.

**अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थी**

अनुसुचित जातीतील व नवबौद्धांच्या मुलां-मुलींसाठी विभागीय स्तरावर आयटीआय ही योजना २००६पासून सुरू आहे. नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या चार

संस्थांमधून ऑगस्ट २०१२ प्रवेश सत्रामध्ये २८८ प्रशिक्षणार्थ्यांना लाभ मिळालेला आहे. दोन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये १४४ एवढे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षित होतील.

**महिला विद्यार्थी**



राज्यामध्ये सर्व विभागातून १५ मुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांत आल्या आहेत. २०११-१२ मध्ये राज्यात एकूण २२६८० महिला प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

**अपंग विद्यार्थी**

शारीरिकदृष्ट्या अपंग उमेदवारांसाठी प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ३ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत तसेच अपंगासाठी वयाची अट ३५ वर्षांपर्यंत ठेवण्यात आली आहे.

अपंगांना वेगवेगळ्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकारने आयटीआय संस्थांमधून विविध व्यवसाय शिल्पकारागीर योजनेतून सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे.

## सामुदायिक महाविद्यालये

भारत सरकारने देशामधील सध्या सुरु असलेल्या महाविद्यालयांमध्ये २०० सामुदायिक महाविद्यालये (कम्युनिटी कॉलेज) शैक्षणिक वर्ष २०१३ पासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यामध्ये सोळा ठिकाणी सामुदायिक महाविद्यालये स्थापन करण्यात येतील. जास्तीत जास्त कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ तयार करण्यासाठी या महाविद्यालयांचा उपयोग होईल. यामुळे सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना कमी खर्चामध्ये उच्च दर्जाचे शिक्षण मिळणे सुलभ होईल.

हे उद्योगधंद्याशी व सेवायोजनांशी संबंधित राहील. या महाविद्यालयांचा व्यावसायिक व सामान्य शिक्षण दिले जाईल. सामान्य शिक्षण हे पदवी स्तरावरील राहील. स्थानिक गरज भागविण्याच्या दृष्टीने महाविद्यालय सुरू करण्यात येतील. हे कॉलेज चालविण्याची जबाबदारी राज्य शासनाची राहील. सद्य:स्थितीत कार्यरत संस्थेच्या पायाभूत सुविधांचा उपयोग करून प्रायोगिक तत्त्वावर हे महाविद्यालय सुरू करण्यात येतील. मोठ्या प्रमाणात वाढ झालेल्या व भविष्यात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध असलेल्या / होणाऱ्या क्षेत्रात व्यवसाय शिक्षण देण्यात येईल.

सामुदायिक महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराची संधी मिळेल. या शिक्षणामुळे संशोधन व उच्च शिक्षणाचा विकास आणि विस्तार होईल.

**– डॉ. प्र. रा. गायकवाड**

## अनाथांसाठी आय.टी.आय




अनाथ मुलांच्या प्रशिक्षणाची सोय आदित्य बिर्ला सेंटरच्या सहकार्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत करावयाची जबाबदारी घेण्यात आली. निवड केलेल्या अनाथ मुलांची मुंबईत राहण्याची, भोजनाची, प्रशिक्षण शुल्क भरण्याची व इतर आवश्यक खर्चांची जबाबदारी आदित्य बिर्ला सेंटरने घेतली.

**कृती आराखडा**

ग्रामीण भागातील अनाथ आश्रमातील १० वी त शिकणाऱ्या मुलांचा शोध घेणे, त्यांच्याशी / त्यांच्या पालकांशी संपर्क साधून पुढील शिक्षणासाठी मुंबईत येण्यास प्रवृत्त करणे, आय.टी.आय.मध्ये दिल्या जाणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती देणे, त्याचे महत्त्व सांगून हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास दोन / तीन वर्षांत स्वत:च्या पायावर उभे राहू शकाल असा विश्वास देणे, १० वीच्या निकालानंतर त्यांना मुंबईत आणण्याची व्यवस्था करणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण करणे. या बाबींचा समावेश आहे.

**प्रत्यक्ष कृती**

१० वी चा निकाल लागल्यानंतर चार ते पाच दिवसांत ही मुले विविध ठिकाणच्या अनाथ आश्रमातून आवश्यक ते दाखले, गुणपत्रकासह मुंबईत दाखल झाले. संस्थेतील सहकार्यांसह आय.टी.आय प्रवेशासाठी आवश्यक असणारे अर्ज घेवून आम्ही चेंबूर येथील आदित्य बिर्ला सेंटरवर गेलो. एका हॉलमध्ये सर्व मुलांना एकत्र बसविले. खेडेगावातून मुंबईत प्रथमच आलेली मुले बावरलेली होती. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्यावरील दडपण कमी करणे गरजेचे होते. त्यांच्याशी संवाद साधून, त्यांच्या मनावरील दडपण कमी केले गेले. सर्व प्रकारची मदत करण्याचा विश्वास देण्यात आला. दुसऱ्या दिवशी सर्व मुलांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड येथे आणून त्यांना संस्था दाखविली. वेगवेगळ्या व्यवसायांची माहिती करून दिली. त्यांचे प्रवेश अर्ज भरुन घेतले. अनाथ आश्रमात राहून शिकत असतानाही मुलांनी शालांत परीक्षेत चांगले गुण मिळविले होते. त्यामुळे गुणवत्तेनुसार दहावी उत्तीर्ण असलेल्या ४४ उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड येथील सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमात प्रवेश मिळाला. १० वी अनुत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना ८ वी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना कुर्ला नेहरुनगर या संस्थेत प्रवेश मिळाला. ७ उमेदवार ८ वी पर्यंतही शिकलेले नव्हते त्यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आली.



आता ही मुले दुसऱ्या वर्षाचे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना एखाद्या कारखान्यात शिकाऊ उमेदवार म्हणून घेतले जाईल. त्या प्रत्यक्ष कामाच्या अनुभवानंतर तीन वर्षात स्वत:च्या पायावर उभे राहण्याची क्षमता त्यांच्यात आलेली असेल.

(अनाथ मुलांचा गोषवारा : आई, वडील, नातेवाईक, घर नसलेले ०५, आई, वडील नसलेले १०, वडिल नसलेले १७, आई नसलेले १०, आई वडील दोन्ही आहेत १७, एकूण ५६)

**– प्रा. पुरुषोत्तम वाघ,** औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संपर्क : ९२२४३२४८९३

# गुणवत्तावाढीचे नवे क्षितिज

**डॉ. अभय वाघ**

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी जागतिक बँक आणि भारत सरकार यांच्या सहकार्याने तांत्रिक शिक्षण, गुणवत्ता कार्यक्रम (टेक्निकल एज्युकेशन क्वॉलिटी इम्प्रुव्हमेंट प्रोग्रॅम – टीईक्यूआयपी) राबवला जात आहे. या प्रकल्पाचा उद्देश हा तंत्रशिक्षणामध्ये उत्कृष्टता




आणून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञ निर्माण करणे हा आहे. या प्रकल्पाची संकल्पना व आरेखनाप्रमाणे प्रत्येक टप्प्याचे नियोजन करताना पूर्वीच्या अंमलबजावणीमध्ये आकलन झालेल्या बाबी व अनुभवलेल्या उणिवांचा विचार करण्यात आला आहे.

**तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम – टप्पा १**

तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाचा प्रथम टप्पा महाराष्ट्रात एप्रिल २००३ ते जून, २००८ या कालावधीत राबवण्यात आला. या टप्प्यात महाराष्ट्रासहित भारतातील १३ राज्यांचा समावेश करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या वतीने हा प्रकल्प राज्यात राबवण्याकरिता जागतिक बँके बरोबर ४ फेब्रुवारी, २००३ रोजी नवी दिल्ली येथे करार करण्यात आला.

हा प्रकल्प प्रथम टप्प्यात राबवण्यासाठी राज्यातील १० अभियांत्रिकी महाविद्यालयांची निवड मानव संसाधन विकास मंत्रालयाने केली. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी ४ अभियांत्रिकी महाविद्यालये व ३ तंत्रनिकेतनांची निवड करण्यात आली. याप्रमाणे प्रथम टप्प्यात खालील नमूद केलेल्या एकूण १७ संस्थांचा सहभाग आहे. या संस्थांसाठी १६८.६६ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

प्रथम टप्प्यातील महाविद्यालये व त्यांना मिळालेली रक्कम : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे – २५.५४५ कोटी रुपये, व्ही.जे.टी.आय., मुंबई – २२.१६७ कोटी रुपये, यू.आय.सी.टी., मुंबई – २३.३३० कोटी रुपये, श्री. गुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड – ९.९८३ कोटी रुपये, श्री. संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव – ७.००कोटी रुपये, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली – ८.५४० कोटी रुपये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे – ७.४९६ कोटी रुपये, यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर – ८.४११ कोटी रुपये, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे, सांगली – ९.२९९ कोटी रुपये, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद – ८.३७० कोटी रुपये.

**तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम – टप्पा २**

दुसऱ्या टप्प्यातील महाविद्यालये व त्यांना मिळालेली रक्कम : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती – ८.८४३ कोटी रुपये, विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, पुणे – ६.५२० कोटी रुपये, जी.एच.रायसॉनी कॉलेज, नागपूर – १०.००कोटी रुपये, डि.के.टी.इ. सोसायटी टेक्सटाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी, कोल्हापूर – ६.९७२ कोटी रुपये, शासकीय तंत्र निकेतन, मुंबई – २.१०३ कोटी रुपये, शासकीय तंत्र निकेतन, पुणे – २.०८५ कोटी रुपये, शासकीय तंत्र निकेतन, नागपूर – २.००० कोटी रुपये, एकूण – १६८.६६४ कोटी रुपये.

**प्रकल्पाचा उद्देश**

या कार्यक्रमाचा प्रथम टप्पा हा मुख्यत: शैक्षणिक उत्कृष्टतेचा विकास, निवडक

> भारत सरकारद्वारे जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनामध्ये उत्कृष्टता आणण्याकरिता तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रम हा प्रकल्प राबवण्याचा महत्त्वाकांक्षी व प्रभावशाली कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम २००३ पासून सुरू झाला आहे. हा कार्यक्रम १०–१२ वर्ष कालावधीचा दूरगामी असून प्रकल्पाची व्याप्ती व्यापक स्वरूपाची आहे. हा प्रकल्प तीन टप्प्यात संपूर्ण देशामध्ये राबवण्यात येत आहे.

संस्थांचे जाळे (नेटवर्किंग) तयार करणे, समाज व उद्योगास सेवा पुरविणे व व्यवस्थापकीय क्षमतेत सुधारणा या चार क्षेत्रांतर्गत राबवण्यात आला. यामुळे शैक्षणिक वातावरणामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशासकीय व तांत्रिक प्रशिक्षण दिले गेले. प्रकल्प संस्थांमध्ये नोकरीच्या संधी वाढल्या असून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सरासरी वेतनात लक्षणीय वाढ झाली. प्रकल्पांतर्गत संस्थांच्या नेटवर्किंग योजनेंतर्गत यंत्रसामग्री, विशेष कौशल्य, संशोधन, कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

**दुसरा टप्पा**

दुसरा टप्पा देशामध्ये ऑगस्ट, २०१० ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत राबवावयाचा असून हा प्रकल्प अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयांकरिता राबवण्यात येणार आहे. या टप्प्यामध्ये राज्यातील पहिल्या फेरीमध्ये १६ संस्था तसेच दुसऱ्या फेरीमध्ये २ संस्था याप्रमाणे एकूण १८ संस्थांची निवड झाली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी, धोरण दिग्दर्शन व मार्गदर्शनासाठी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समितीची स्थापना करण्यात आली आहे. या प्रकल्पाची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सुलभता गटाची स्थापन करण्यात आली आहे.

तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाच्या दुसरा टप्प्याची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे होईल- निवडक संस्थांमध्ये शैक्षणिक दर्जात वाढ करणे, पदवीधरांची नोकरीसाठीची उपयुक्तता वाढविणे व उत्तम शैक्षणिक गुणवत्ता प्रदान करता येणे शक्य व्हावे यासाठी संस्थांचे सक्षमीकरण करणे, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संधी उपलब्ध करून देणे आणि मागणीनुसार संशोधन आणि विकासाची संधी उपलब्ध करणे, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक केंद्रांची स्थापना, प्रभावी अध्यापनासाठी विषयानुरूप प्रशिक्षण, व्यवस्था-व्यवस्थापनात सुधारणा, व्यवस्थापन बळकटीकरणासाठी क्षमता विकसन, प्रकल्प व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापन या बाबींचा समावेश आहे.या प्रकल्पात एकूण २०० कोटी याप्रमाणे अनुदान टप्प्याटप्प्याने संबंधित संस्थांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**संस्थांची निवड**

**प्रकल्प - २ मध्ये महाराष्ट्रातील खालील अठरा संस्थांची निवड झाली आहे.**

**शासकीय संस्था :** १. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड, २. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव, ३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, ४. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, ५. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, ६. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, ७. वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, मुंबई.

**अनुदानित :** १. सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मुंबई, २. भारती विद्यापीठ युनिव्हर्सिटी, पुणे, ३. इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, ४. श्री. गुरु



गोंविदसिंगजी इन्स्टिट्यूट ऑफ इजिं. ॲण्ड टेक्नॉलॉजी, नांदेड, ५. वालचंद कॉलेज ऑफ इंजि., सांगली, ६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ, लोणेरे.

**विना अनुदानित :** १. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे, २. डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटी जळगांव, ३. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर. ४. जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजि., नागपूर, ५. राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे, सांगली.

**प्रमुख वैशिष्ट्ये**

जागतिक बँकेमार्फत तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रम हा प्रकल्प भारतात तंत्रशिक्षणांतर्गत राबवण्यासाठी भारत सरकारने जागतिक बँकेकडून अंदाजे रु. १२५० कोटी सॉफ्टलोन प्रथम टप्प्यात घेतले होते. या रकमेचा विनियोग तंत्रशिक्षणामध्ये उत्कृष्टता आणून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञ निर्माण करण्यासाठी करण्यात आला. त्याद्वारे भारत हे जगात विकसित राष्ट्र म्हणून आत्मविश्वासाने उभे राहण्यास मदत झाली आहे.

या प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात देशातील महाराष्ट्रासहित उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश व केरळ अशा एकूण ६ राज्यांचा समावेश करण्यात आला होता.

**निष्कर्ष**

तंत्रशिक्षण सुधार कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात निवड झालेल्या संस्थांमध्ये प्रकाशन, एकस्व हक्क (पेटंट), संशोधन आणि विकास, पुरस्कार आणि मान्यता पीएच.डी. प्राप्ती या ५ परिमाणांवर उल्लेखनीय यश प्राप्त झाले. उदाहरणार्थ, राष्ट्रीय स्तरावरच्या जर्नलमध्ये २००४-०५ मध्ये ८७ शोध निबंध प्रसिध्द होत होते, ते प्रमाण पहिल्या टप्प्याच्या शेवटापर्यंत म्हणजे २००७-२००८ मध्ये जवळपास दुपटीने वाढून १४५ झाले. २००४-०५ मध्ये १६ एकस्व हक्क (पेटंट) नोंदवले गेले. २००७-०८ मध्ये जवळपास तिप्पट म्हणजे ४२ एकस्व हक्क नोंदवले गेले. २००४-२००५ मध्ये ४ एकस्व हक्क मंजूर झाले, तर २००७-०८ मध्ये १० एकस्व हक्क मंजूर झाले.

संशोधन आणि विकास प्रकल्पांमध्ये पहिल्या टप्प्यात लक्षणीय वाढ दिसून आली. बाह्य स्रोतांकडून तसेच व्यावसायिक व अव्यावसायिक तत्त्वावर दुप्पट प्रकल्प पूर्ण करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार आणि मान्यतेची संख्या ३६ वरुन ४४ पर्यंत पोहचली तर राष्ट्रीय स्तरावर ही संख्या १६ वरुन २८ वर पोहचली. विविध संस्थांमधून पीएच.डी. प्राप्त करणाऱ्यांचे प्रमाण दुपटीने वाढून प्रथम टप्प्याच्या ४ वर्षात ५८ वरुन ११२ वर पोहचले. वरील आकडेवारी बोलकी असून तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम - टप्पा १ चे यश उत्साहवर्धक आहे.

या प्रकल्पाच्या टप्पा दोनच्या उद्देशाप्रमाणे निवड झालेल्या संस्थांमध्ये जोरात काम सुरु आहे. प्रकाशन, एकस्व हक्क, संशोधन, पुरस्कार आणि मान्यता याबाबतीत जोरकसपणे प्रयत्न सुरु आहेत. निर्धारित केलेले उद्दिष्ट कालबद्धरीत्या साध्य करू असा विश्वास वाटतो.

**संपर्क : ९९२००३४७९४**




# अधिकारी घडवणारी संस्था

मुंबई येथे असणाऱ्या राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या माध्यमातून संघ लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षांकरिता प्रशिक्षण देण्यात येते. महाराष्ट्रीय पदवीधरास प्रशासकीय सेवेत येण्यासाठी व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेची स्थापना १९७६ साली करण्यात आली. संस्थेतून आतापर्यंत ७५० विद्यार्थी उच्च पदावर नागरी सेवा प्रशासकीय पदे भूषवित आहेत. नागरी सेवा परीक्षेमध्ये मराठी टक्का वाढविण्याकरिता या संस्थेचा मोठा हातभार लागत आहे.



महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतून नागरी सेवा परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी मुले-मुली मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेत प्रवेश घेतात. संस्थेतून त्यांना सर्व प्रकारच्या सेवा-सुविधा, प्रशिक्षण, मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा देण्यासाठी आवड निर्माण या संस्थेतून केली जाते.

**संस्थेतील सेवा-सुविधा:** वसतिगृह सुविधा, ग्रंथालय सुविधा, वाचन कक्ष (२४ तास सेवा), विद्यावेतन, लेक्चर सुविधा, इंटरनेट सुविधा, उपहारगृह, जिमखाना.

**प्रवेशासाठी पात्रता :** संस्थेत प्रवेश घेण्यासाठी संस्थेची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. त्यासाठी सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी (टक्केवारीची अट नाही).

आ) वैद्यकीय शाखेचा विद्यार्थी असल्यास १२ महिन्यांची इंटर्नशीप पूर्ण केल्याचा दाखला जोडणे आवश्यक.

इ) उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (रहिवासी) असला पाहिजे यासाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे

**डॉ.म.बा.भिडे**

ई) उमेदवार अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय संवर्गाचा असल्यास जातीचा दाखला आवश्यक आहे.

**वयोमर्यादा:** संघ लोकसेवा आयोगाप्रमाणे- सर्वसाधारण २१ ते ३० वर्षे, इतर मागासवर्गीय २१ ते ३३ वर्ष,अनुसूचित जाती/ जमाती २१ ते ३५ वर्ष

१०० विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षेतून निवड केली जाते.

**प्रवेश परीक्षेचे स्वरूप** : प्रवेश परीक्षेचे स्वरूप हे नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या धर्तीवर असते, परीक्षेसबंधी सर्व माहिती प्रतिवर्षी नामांकित वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे घोषित केली जाते.

प्रवेश परीक्षा: पेपर- सामान्य अध्ययन/अभियोग्यता चाचणी वस्तुनिष्ठ (कालावधी: २ तास, गुण२००), निगेटिव्ह मार्किंग असते ( ०.३३ % )

**प्रवेश परीक्षेची पूर्वतयारी:**

१. प्रवेश परीक्षेसबंधी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात प्रकाशित होते.

२. संकेतस्थळ www.siac.org.in वरून प्रवेश अर्ज व माहितीपुस्तक डाऊनलोड करून फक्त अर्जाच्या किंमतीचा डिमांड ड्राफ्ट पाठवून द्यावा. अर्जाची किंमत जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येते. प्रवेशाची सविस्तर माहिती संकेतस्थळ व जाहीरातीत नमूद करण्यात येते.

**प्रवेश परीक्षा :** प्रवेश परीक्षा नोव्हेंबर/डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेतली जाते. परीक्षेसबंधी माहितीपुस्तिका,अभ्यासक्रम प्रवेश अर्जासोबत दिला जाईल.

**निवडप्रक्रिया** : नागरी सेवा परीक्षेच्या तयारीकरिता अकरा महिन्यांकरिता प्रवेश दिला जातो. निवडप्रक्रिया गुणवत्तेनुसार संवर्गनिहाय शासन नियमानुसार केली जाते. तसेच वसतिगृहाचा प्रवेश गुणवत्तेनुसार संवर्गनिहाय दिला जातो.

**विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सेवा** :

**वसतिगृह :** मुंबईबाहेरील विद्यार्थ्यांना ही सेवा दिली जाते.

पान ३४ वर



उच्च व तंत्र शिक्षण विभाग संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आधिपत्याखाली ४ शासकीय विज्ञान संस्था, २ शासकीय न्याय साहाय्यक विज्ञान संस्था, ७ शासकीय कला व वाणिज्य महाविद्यालये, १२ शासकीय अध्यापक महाविद्यालये, ४ राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था, १ व्यवस्थापन व संशोधन संस्था व १ विधी महाविद्यालय कार्यरत असून, ४० अनुदानित अध्यापक महाविद्यालये व महाविद्यालये कार्यरत आहेत. हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे तसेच आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थी आर्थिक परिस्थिती अभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शासनाने विविध शिष्यवृत्ती / सवलत योजना लागू केल्या आहेत.

# संधी आणि साधन

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती

● **एकलव्य अर्थसाहाय्य योजना :** या योजना १९९६ पासून लागू असून या योजनेंतर्गत लाभधारक विद्यार्थ्यांना दरवर्षी रु.५,०००/- इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेसाठी शासनाकडून दरवर्षी रु.७० लाख इतकी तरतूद करण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यास विधी, वाणिज्य व कला या शाखांमध्ये किमान ६०% गुण व विज्ञान शाखेकरिता किमान ७०% गुण असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/- पेक्षा जास्त नसावे.

● **दक्षिणा अधिछात्रवृत्ती :** ही योजना १९६५ पासून लागू करण्यात आली असून, सदर योजनेचा उद्देश हा राज्यातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेता यावे हा आहे. या योजनेत शासकीय महाविद्यालयीन स्तरावरील ५४ व विद्यापीठ स्तरावर २२ अशा एकूण ७६ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दरवर्षी देण्यात येतो. पात्र विद्यार्थ्यांची निवड महाविद्यालयीन पातळीवर गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत शिफारस करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमधून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून करण्यात येते.

● **जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली यांची शिष्यवृत्ती :** सदर योजना जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्याकडून राबवण्यात येत असून सदर योजनेंतर्गत राज्यातील एका विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर विद्यार्थ्याची निवड जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्याकडून करण्यात येते. या योजनेंतर्गत लाभधारक विद्यार्थ्यास प्रति महिना रु.८,०००/- व इतर खर्चासाठी रु.१०,०००/- प्रतिवर्ष देण्यात येते.

● **खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :** राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या हेतूने सदर शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वाणिज्य शाखेतून २३० विद्यार्थी, विधी शाखेतून ५५ विद्यार्थी, कला शाखेतून ३०८ विद्यार्थी व विज्ञान शाखेतून ६१५ अशा एकूण १२०८ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. प्रस्तुत योजनेंतर्गत लाभधारक विद्यार्थ्यास प्रति महिना रु. १००/- इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेसाठी विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी च्या परीक्षेत किमान ६०% गुण असणे आवश्यक आहे.

● **शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती :** सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्यातील शासकीय विद्यानिकेतनमधून शालान्त परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या ८० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यास कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी दरमहा रु.१,०००/- व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी रु.१,५००/- दरमहा इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेसाठी विद्यार्थ्यास शालान्त परीक्षेत किमान ६०% गुण आवश्यक असून त्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२५,०००/- पेक्षा जास्त नसावे.

● **अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती :** ही योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेत राज्यातील मुस्लीम, शिख, ख्रिश्चन,पारशी व बौद्ध या अल्पसंख्याक समाजातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेसाठी विद्यार्थ्यास मागील वर्षातील परीक्षेत किमान ५०% गुण आवश्यक असून त्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न हे रु.२ लाखापेक्षा जास्त नसावे. सदर योजनेंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणापासून पदवी / पदव्युत्तर पदवी तसेच एम. फील, पी.एचडी यासाठी वेगवेगळ्या दराने शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. प्रत्येक वर्षी

लाभधारक विद्यार्थ्यांची संख्या केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येते.

● **महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर स्कीम शिष्यवृत्ती :** सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेअंतर्गत राज्यातील ७,४१७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. प्रस्तुत योजनेंतर्गत लाभधारक विद्यार्थ्याला पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी रु.१०,०००/- प्रतिवर्षी व पदव्युत्तर शिक्षणासाठी रु.२०,०००/- प्रतिवर्षी इतकी शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे. या योजनेसाठी विहित केलेल्या पात्रतेनुसार विद्यार्थ्यास उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेत किमान ८०% गुण आवश्यक असून अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.४.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

● **अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती :** अहिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षेनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने सदर योजना सुरू केली असून या योजनेंतर्गत राज्यातील २५५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. प्रस्तुत योजनेत लाभार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी रु.३००/- दरमहा, पदवी अभ्यासक्रमासाठी रु.५००/- दरमहा व पदव्युत्तर पदवीसाठी रु.१,०००/- इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.

● **गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती :** या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्यात गणित व भौतिकशास्त्र या विषयांसाठी प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. या योजनेसाठी संबंधित विद्यार्थ्यास १२ वी विज्ञान परीक्षेत किमान ६० टक्के गुण तसेच गणित व भौतिकशास्त्र या विषयात किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.

● **शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती :** राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना पी. एचडी करता यावी यासाठी एकूण १४ विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दरमहा १,७५० रुपये इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेसाठी विद्यार्थ्याने पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत व अन्य परीक्षेत किमान द्वितीय श्रेणी प्राप्त करणे आवश्यक आहे.

● **गुणवान विद्यार्थी अर्थसाहाय्य योजना :** या योजनेंतर्गत माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ८८ गुणवान विद्यार्थ्यांना व उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या १२० गुणवान विद्यार्थ्यांना शासनमान्य व अनुदानित महाविद्यालयांकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यात येते. ❑ ❑



पान ३२ वरून

# अधिकारी घडवणारी संस्था

संस्थेच्या वसतिगृहात मुंबईबाहेरील २५ विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. हा प्रवेश नि:शुल्क आहे. वसतिगृहात ज्यांना प्रवेश मिळाला नाही अशा मुंबईबाहेरील ३५ विद्यार्थ्यांना चर्चगेट येथील शासकीय मुलांचे वसतिगृह येथे प्रवेश दिला जातो. परंतु हा प्रवेश सशु:ल्क (पे सीट) आहे. अशा प्रकारे एकूण ६० विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जातो. मुलींचे तेलंग स्मारक वसतिगृह चर्चगेट येथे असून एसआयएसीकडून ५ मुलींची नि:शुल्क प्रवेशाकरिता निवड केली जाते व इतर १० पात्र मुलींची निवड स:शुल्क (पे सीट) करण्यात येते.

## ग्रंथालय सुविधा

नागरी सेवा परीक्षा अभ्यासक्रमानुसार परीक्षेसंबंधी सर्व विषयाची सामान्य अध्ययनाच्या अभ्यासासाठी सर्व पुस्तके, गाइड, संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. जवळजवळ सात हजार पुस्तके आहेत. ग्रंथालयात नागरी सेवा परीक्षेच्या तयारीकरिता लागणारी ३० ते ३५ देशी/विदेशी नियतकालिके (मासिके/ साप्ताहिके/पाक्षिक इ.) उपलब्ध आहेत.

## विद्यावेतन

संस्थेत प्रवेश घेतलेल्या पूर्णवेळ विद्यार्थ्यांना संस्थेतून रुपये २०००/- विद्यावेतन दिले जाते. विद्यावेतनकरीता विद्यार्थ्यांची ८०% हजेरी असणे आवश्यक आहे.

## विषयानुसार वर्ग

संस्थेत सर्व विषयांचे वर्ग घेतले जातात. जनरल स्टडीज, वैकल्पिक विषयाकरिता तज्ज्ञ प्राध्यापकांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सर्व तयारी करून घेतली जाते. वर्ग सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत असतात.

## इंटरनेट सुविधा

विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. इंटरनेट सुविधेकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

## जिमखाना

संस्थेत जिमखाना विभाग असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबर त्यांचे आरोग्य चांगले राहण्याच्या उद्देशाने जिमखाना सुरू करण्यात आला आहे. त्याचे कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

## प्रवेश सत्र

**संस्थेतील प्रवेश सत्र :** संस्थेचा प्रवेश दोन सत्रामध्ये असतो. १) डिसेंबर ते मे प्रथम सत्र (नागरी सेवा पूर्वपरीक्षामध्ये), २) ऑगस्ट ते नोव्हेंबर द्वितीय सत्र (मुख्य परीक्षा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये)

३) पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्याला पूर्वपरीक्षेची तयारी करता येते. दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेची तयारी करता येते. पहिल्या सत्राकरिता प्रवेश, प्रवेश परीक्षेद्वारे दिला जातो. दुसऱ्या सत्राकरिता प्रवेश पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दिला जातो. मुलाखत प्रशिक्षण सत्र एप्रिलमध्ये घेतले जाते. ❑ ❑

# शिष्यवृत्ती



**मदन मोरवे**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गुणवत्ताधारक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता मेरिट-कम-मिन्स शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाने २००७-०८ पासून चालू केली. मुस्लिम, शिख, बौद्ध, ख्रिश्चन व पारशी समाजातील व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. ही योजना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे राबवली जाते. या योजनेत डे स्कॉलर विद्यार्थ्यांना रु. २५,०००/- आणि होस्टेलर विद्यार्थ्यांना रु. ३०,०००/- एवढी शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेचा लाभ आतापावेतो १६७५४ एवढ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी घेतला असून त्यासाठी केंद्र शासनाने रु. ४३,४५,०७,२५४/- एवढे अनुदान खर्च केले आहे.

उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी २००८-०९ पासून शिष्यवृत्ती योजना तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे राबवण्यात येत आहे. ही योजना व्यावसायिक अभ्यासक्रम आणि १२ वी नंतरचे सर्व अभ्यासक्रम अशी दोन प्रकारे राबवली जाते. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जास्तीत जास्त रु. २५,०००/- आणि १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांसाठी रु. ५०००/- शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. या शिष्यवृत्तीचा आतापावेतो ८८३६७ एवढ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना लाभ मिळाला असून त्यासाठी राज्य शासनाने रु. २०९,३३,५२,४१३/- एवढे अनुदान खर्च केले आहे. इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांसाठी आतापावेतो २९९४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून त्यावर शासनाने रु. १,३७,७९,११७/- एवढे अनुदान खर्च केले आहे.

दोन्ही शिष्यवृत्ती योजनांसाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत. - ■ अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी अर्जदारानी माध्यमिक शालांत परीक्षा राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी. ■ अर्जदाराने सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) / स्पर्धा परीक्षेद्वारे प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे किंवा अर्जदाराला १० वी / १२ वी / पदवी परीक्षेमध्ये कमीत कमी ५० टक्के गुण मिळणे आवश्यक. (महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी ५० टक्क्यांची अट लागू नाही.) ■ अर्जदार दुसऱ्या कोणत्याही शिष्यवृत्ती / भत्ता यांचा लाभार्थी नसावा. ■ अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाखापेक्षा जास्त नसावे.

केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेमुळे सैमा फिरदोस आणि सैमा खान या दोन अत्यंत गरीब घरातील विद्यार्थिनींना त्यांचे वैद्यकीय शाखेतील शिक्षण पूर्ण करता आले. सैमा खान या विद्यार्थिनीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. ही पदवी संपादन केली असून, त्या आता जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे शासकीय सेवेत रुजू झालेल्या आहेत.

**रोजगाराभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना** - अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना सेवा, उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रामध्ये रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील कौशल्य आणि क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी ही योजना प्रस्तावित केली होती. सध्याच्या आर्थिक सुधारणा, उदारीकरण आणि जागतिकीकरण लक्षात घेऊन सद्य:स्थितीत रोजगार निर्मितीचा कल लक्षात घेऊन अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना सेवा, उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात रोजगाराची संधी मिळण्यासाठी प्रशिक्षण देण्याची योजना केंद्र शासनाने घोषित केली होती. त्या अनुषंगाने योजना शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून राज्य शासनाने राबवण्याचा निर्णय घेतला. या योजनेत दरवर्षी ५००० उमेदवारांना त्याचा लाभ देण्यात येतो आणि त्यात उमेदवारांना जास्तीत जास्त रु. ४०००/- एवढी फी प्रतिपूर्ती देण्यात येते. २००८-०९ पासून ते सन २०१२-१३ पर्यंत २१०१६ एवढ्या अल्पसंख्याक उमेदवारांना लाभ मिळाला असून त्यासाठी राज्य शासनाने रु. ६,९२,६९,४८४/- एवढे अनुदान खर्च केले. ❐ ❐

## यशकथा

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोणावळा व इंडियन हॉटेल्स कं. लि., मुंबई यांच्यात २००९ मध्ये हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट व्यवसायाशी संबधित सुधारणा व अमंलबजावणी करण्याविषयी प्रशिक्षण सहकार्य करार करण्यांत आला. हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम नव्यानेच सुरू होत असल्यामुळे त्या संबंधित लागणारी सर्व माहिती, यंत्रसामग्री, उपकरणे, इमारतीचे बांधकाम, इ.विषयी सर्व सहकार्य व मार्गदर्शन ताज ग्रुपमार्फत पुरविण्यात आले. प्रशिक्षण सुरू असताना ताज ग्रुपतर्फे तज्ज्ञांकडून इंग्रजी व व्यक्तिमत्त्व विकासाविषयी प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण सुरू असतानाच प्रशिक्षणार्थ्यांना १० ते १५ दिवसांचे ऑन जॉब ट्रेनिंग ताज ग्रुपतर्फे देण्यात आले. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागामार्फत नव्याने उभारण्यात आलेल्या हॉस्पिटॅलिटी



सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हॉस्पिटॅलिटी स्किल ट्रेनिंग सेंटरचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण. यावेळी सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, रोजगार व स्वयंरोजगार आयुक्त विजयकुमार गौतम व ताज ग्रुपचे प्रतिनिधी उपस्थित होते.

इमारतीचे बांधकाम करताना ताज ग्रुपचे सहकार्य मिळाले. ताज ग्रुपने मार्गदर्शन केल्यामुळे पंचतारांकित हॉटेलप्रमाणे इमारत उभारण्यात आली. संगणक विभागासाठी ई-लर्निंग क्लासरूमची उभारणी करण्यात आली. त्यामध्ये एकाच वेळी औरंगाबाद, लोणावळा, मुंबई या ठिकाणी चालणारे प्रशिक्षण, प्रशिक्षणासंबंधी शंका, अडचणींचे निरसन करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत ताज ग्रुपने सहकार्य केले. कुकरी, इंडियन, कॉन्टिनेंटल, बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी रेस्टॉरंट सर्व्हिस असे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. टाटा हाऊसिंग कं.तर्फे कार्पेंटर प्रशिक्षण, ताज सलूनमार्फत ब्युटी पार्लरशी संबंधित प्रशिक्षण, क्रोमा कं.तर्फे रिटेल प्रशिक्षण, व्होल्टास कं.तर्फे रेफ्रिजरेटर सर्व्हिस सेंटर, इंडीट्रॅव्हल कं.तर्फे ड्रायव्हिंग प्रशिक्षण, टाटा रिॲल्टी कं.तर्फे कॅड-कॅम सॉफ्टवेअरसह लॅब उभारण्यात आली आहे.

# आश्वासक आणि सुरक्षित निवारा

(१) मुलींसाठी प्रियदर्शिनी वसतिगृह योजना.

राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० मुलींची सोय असलेले 'प्रियदर्शिनी' वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणाकडे आकर्षित करणे व उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी मुलींना आश्वासक व संरक्षित निवासाची व्यवस्था करून देणे हा आहे. त्यापैकी सध्या राज्यात १३ प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृह सुरू आहेत. या वसतिगृहामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसाच्याआत या वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी वसतिगृह अधीक्षक यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. वसतिगृहामध्ये विद्यार्थीनींना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो, वसतिगृहातील अभ्यासक्रमनिहाय जागांची वाटणी पुढीलप्रमाणे आहे- ११ वी व १२वी सर्व विद्याशाखा (४५ टक्के), पदवी पातळीवरील अभ्यासक्रमासाठी सर्व विद्याशाखा (४० टक्के), औद्योगिक तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनींसाठी (१५ टक्के). वसतिगृहामध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थीनींना सत्त्वयुक्त आणि पुरेसे अन्न व निवारा या सोयी मोफत पुरविण्यात येतात. इतर विद्यार्थीनींकडून प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे आकार वसूल करण्याची तरतूद आहे.

प्रियदर्शिनी वसतिगृहासाठी शासनाकडून दिल्या जात असलेल्या अनुदानाची माहिती :-

प्रियदर्शिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी शासनाकडून प्रस्तुत संस्थेला प्रत्येक विद्यार्थिनीसाठी दरमहा रु. ३३५/- रु. विद्यावेतन देण्यात येते त्यामध्ये २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून रु. ९००/- दरमहा (शैक्षणिक वर्षातील दहा महिन्यांसाठी) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.



> राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेषत: ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही राज्य शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. ही बाब विचारात घेऊन उच्च शिक्षण विभागाच्या आधिपत्याखाली वेगवेगळया वसतिगृह योजना राबवण्यात येत आहेत.


सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, मुंबई

**प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह :-**

१: ता.भोर, जिल्हा पुणे, क्षमता : ६०, (२) शिरपूर, जि. धुळे, क्षमता: ५०, (३) पुसद, जि. यवतमाळ क्षमता : ५०, (४) घाटंजी, जिल्हा यवतमाळ, क्षमता : ५०

**सहसंचालक (उच्चशिक्षण) यांच्या मुख्यालयी मुलींची वसतीगृहे -**

परगावी/दूरच्या ठिकाणी शिक्षणासाठी मुलींना पाठविण्यास पालक तयार होत नाहीत. त्यामुळे उच्च शिक्षणापासून मुली वंचित राहतात. म्हणून विभागीय सहसंचालकांच्या मुख्यालयी व तज्ज्ञांच्या नियंत्रणाखाली नव्याने वसतिगृह स्थापन करण्याचा व सध्या अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची क्षमता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन वसतिगृह व विस्तारित वसतिगृहांचे बांधकाम दोन वर्ष कालावधीच्या आत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन असून, या योजनेमुळे उच्च शिक्षणात मुलींचा टक्का वाढणार आहे. ग्रामीण भागातील मुलींना राहण्याची सोय होणार आहे. या नवीन वसतिगृहांच्या माध्यमातून एकूण १७७० व विस्तारित वसतिगृहांच्या माध्यमातून ४८० अशा एकूण १४ वसतिगृहांद्वारे प्रवेश क्षमतेत २२५० इतकी वाढ झाली आहे.

**वसतिगृहांचे ठिकाण व प्रवेश क्षमता**

मुंबई - इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई, प्रवेश क्षमता - ३२०, पुणे -डेक्कन कॉलेज-अभिमत विद्यापीठ, प्रवेश क्षमता५००, औरंगाबाद - अध्यापक महाविद्यालय, प्रवेश क्षमता-२००, महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर, प्रवेश क्षमता-१००, पनवेल - अध्यापक महाविद्यालय परिसर, प्रवेश क्षमता-३००,

गडचिरोली - विज्ञान महाविद्यालय, प्रवेश क्षमता - ५०, जालना - प्रवेश क्षमता - १००.

**शासकीय महाविद्यालयातील विस्तार करावयाची वसतिगृहे व वाढीव प्रवेश क्षमता**

कोल्हापूर - राजाराम महाविद्यालय, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, औरंगाबाद - ज्ञान विज्ञान महाविद्यालय - वाढीव प्रवेश क्षमता - ६०, नागपूर - (अ) वसंतराव नाईक महाविद्यालय, वाढीव प्रवेश क्षमता - १००, (ब) विज्ञान संस्था नागपूर, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, अमरावती -विज्ञान संस्था, वाढीव प्रवेश क्षमता - २२०, कोयना एज्युकेशन सोसायटीचे प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह पाटण, जि. सातारा, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, किनवट, जि. नांदेड, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, अहमदपूर, जि. लातूर, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, वसंतनगर, कोटग्याळ, ता. मुखेड, जि. नांदेड, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, कन्नड, जि. औरंगाबाद, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,बौरंगाबाद, वाढीव प्रवेश क्षमता - १००, शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, आष्टी, जि.बीड, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग, वाढीव प्रवेश क्षमता - ५०, असे एकू- ९३० आहेत.

> शासकीय महाविद्यालयांमध्ये मुलां/मुलींसाठी एकूण २४ वसतीगृहे सुरू आहेत. मुंबई येथे मुलांसाठी एक व मुलींसाठी दोन शासकीय वसतिगृहे आहेत. मुंबई येथील शासकीय मुलांचे / मुलींचे वसतिगृहाचे प्रवेश शासनाच्या उच्च शिक्षण विभागाकडून निश्चित करण्यात येतात.

**शासकीय महाविद्यालय वसतिगृहे**

शासकीय मुलांचे वसतीगृह, चर्चगेट, मुंबई, प्रवेश क्षमता - ३५७, सावित्रीबाई फुले महिला छात्रालय, चर्नी रोड, मुंबई, प्रवेश क्षमता - ४५०, तेलंग मुलींचे वसतिगृह, प्रवेश क्षमता - २५०, इस्माईल युसूफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (मुले), प्रवेश क्षमता - १४०, शासकीय विज्ञान संस्था,नागपूर (मुली), प्रवेश क्षमता - ६०, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर (मुले), प्रवेश क्षमता - १००, वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर, (मुले) प्रवेश क्षमता - १००, वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर, (मुली) प्रवेश क्षमता - ९०, शासकीय अद्यापक महाविद्यालय, औरंगाबाद, (मुले) प्रवेश क्षमता - ६०, शासकीय अद्यापक महाविद्यालय, औरंगाबाद, (मुली) प्रवेश क्षमता -६०, शासकीय विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद, (मुले) प्रवेश क्षमता - ६०, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद, (मुले) प्रवेश क्षमता - ६०, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद, (मुली) प्रवेश क्षमता - ६०, राजाराम महाविद्यालय,कोल्हापूर (मुली) प्रवेश क्षमता - ३५, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, प्रवेश क्षमता - १००, एस.एम.टी.टी. अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (मुले), प्रवेश क्षमता - ४०, शासकीय अध्यापक महाविद्यालय,बुलढाणा (मुले), प्रवेश क्षमता-३०, शासकीय अध्यापक महाविद्यालय,अकोला (मुली) प्रवेश क्षमता - २४, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला (मुले), प्रवेश क्षमता - ४२, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती (मुली-नवीन), प्रवेश क्षमता - १०४, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती (मुली-जुने), प्रवेश क्षमता - ४८, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती (मुले-नवीन), प्रवेश क्षमता - ८४, शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था अमरावती (मुले-जुने), प्रवेश क्षमता -८४, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी (मुली), प्रवेश क्षमता - ४०, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी (मुले), प्रवेश क्षमता - ४०, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल (मुले), प्रवेश क्षमता - ४०, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल (मुली), प्रवेश क्षमता - १५. ❑❑

## आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे



आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी ईबीसी वसतिगृह सुरू करावे असा निर्णय शासनाने घेतला आहे. सध्या राज्यामध्ये जिल्हयांच्या ठिकाणी सुरू असलेली ११ वसतिगृहे पुढीलप्रमाणे: १) मालेगाव, जि. नाशिक, २) नंदूरबार, ३) यवतमाळ ४)अमरावती, ५) बुधगाव, जि. सांगली, ६) कोल्हापूर, ७) नांदेड ८) बीड, ९) जव्हार, जि. ठाणे, १०) वरोरा, जि. चंद्रपूर ११) वर्धा.


या वसतिगृहांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांना प्रवेश दिला जातो. उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील उच्च शिक्षण अभ्यासक्रमाच्या शासकीय तसेच शासन अनुदानित, विनाअनुदानित संस्थामधील पदविका, पदवी व पदव्युत्तर पदविकेमध्ये शिकणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. या वसतिगृहामध्ये २०% जागा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत. या वसतिगृहांमध्ये इयत्ता ८वी पासून माध्यमिक शाळेत/उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या आय.टी.आय., तंत्रनिकेतन, डी.एड्. मध्ये शिक्षण घेणाऱ्या व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासननियुक्त निवड समितीद्वारे प्रवेश दिले जातात. प्रवेश मिळाल्यानंतर राहण्याची व जेवणाची सोय शासनामार्फत मोफत केली जाते.

# स्वत:च्या पायावर सन्मानाने

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत २९ गटांतील एकूण ११३६ अभ्यासक्रम ६ महिने, १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अर्धवेळ व पूर्णवेळ स्वरूपाचे अभ्यासक्रम विविध शैक्षणिक अर्हतेनुसार राबवण्यात येतात. रोजगार व स्वयंरोजगारासाठी, औद्योगिकीकरणाची गरज भागविण्यासाठी आधुनिकतेनुसार अभ्यासक्रमात बदल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सर्व स्तरातील विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण मिळावे, यासाठी अभ्यासक्रमांची संख्या वाढवून २९ गटांमध्ये ६ महिने, १ वर्ष, २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

२०१२ मध्ये मंडळाच्या दोन वर्ष कालावधीच्या पूर्णवेळ स्वरूपाच्या विविध गटांतील २११ अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी + २ स्तराची 'समकक्षता' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मंडळाचे प्रमाणपत्र हे राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इ. १२ वी (सर्व विद्या शाखा) उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राशी समतुल्य राहील. त्यामुळे मंडळाचे हे अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवार विविध शाखांतील पदविका, पदवीच्या प्रवेशासाठी पात्र झाले आहेत.

मंडळाच्या १ वर्ष व २ वर्ष कालावधीच्या पूर्णवेळ स्वरूपाच्या विविध गटातील अभ्यासक्रमांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमाशी, नोकरीसाठी पर्यायी शैक्षणिक अर्हता म्हणून मान्यता देण्यात आली आहे. यामुळे मंडळाचे अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवार शासकीय अथवा खाजगी विभागामार्फत, निर्गमित झालेल्या जाहिरातीमध्ये; ज्या ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील अभ्यासक्रमांची मागणी केली आहे, अशा जाहिरातीच्या पदास अर्ज करण्यास पात्र झाले आहेत. याचप्रमाणे भारत सरकार, वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या निर्णयानुसार मंडळाचा बॉयलर अटेंडंट हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतर स्टिम बॉयलरवरील फायरमन किंवा ऑपरेटर किंवा असिस्टंट फायरमन किंवा असिस्टंट ऑपरेटर म्हणून १ वर्ष कालावधीचा अनुभव धारण केल्यानंतर बाष्पके संचालनालयाकडील (डायरेक्टोरेट ऑफ बॉयलर) द्वितीय बॉयलर परिचर, समकक्षतेचा समजण्यात येतो. सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक या पाठ्यक्रमाशी मंडळातील (i) वास्तुशास्त्र आरेखक (आर्किटेक्चरल ड्राफ्समन) (ii)– बांधकाम अधीक्षक (कंस्ट्रक्शन सुपरवायझर) हे दोन अभ्यासक्रम समकक्ष आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक या पदावरील नेमणुकीसाठी पात्र होत आहेत.



**औद्योगिकीकरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल या बाबींचा विचार करता अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विशिष्ट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कमी कालावधीचे व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. अशा विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारास चालना मिळण्यासाठी आवश्यक व्यवसाय शिक्षणाची संधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिली आहे. यासाठी १९८६ मध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची स्थापना करण्यात आली.**

जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ अभियांत्रिकी साहाय्यक या पदावर नामनिर्देशनाने अथवा बदलीने नियुक्ती करण्यासाठी मंडळाचा बांधकाम अधीक्षक हा अभ्यासक्रम समकक्ष आहे. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवार जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियांत्रिकी साहाय्यक या पदासाठी पात्र होत आहे २१ जानेवारी, २०१३ च्या निर्णयानुसार व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे २ वर्ष कालावधीचे पूर्णवेळ स्वरूपाचे अभ्यासक्रम 'प्रमाणपत्र अभ्यासक्रमाऐवजी 'पदविका अभ्यासक्रम' या नावाने प्रमाणपत्र प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त पूर्व व्यावसायिक, द्विलक्षी अभ्यासक्रम, एच.एस.सी.व्होकेशनल इत्यादी अभ्यासक्रम शिकत असलेल्या अथवा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी मंडळातील काही अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी थेट बसण्याची संधी उपलब्ध आहे.

मंडळाचे अभ्यासक्रम चालविण्यासाठी जास्तीत जास्त आस्थापना/संस्थांना अर्ज करण्याची संधी मिळण्याच्या हेतूने ४ फेब्रुवारी, २०१२ च्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्था, एन.सी.व्ही.टी. संलग्नीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ए.आय.सी.टी.ई. / मेडीकल कौन्सिल / इंडीयन नर्सिंग कौन्सिल / नॅशनल कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट हॉटेल अॅण्ड कॅटरिंग टेक्नॉलाजी किंवा भारत सरकारच्या कौन्सिलने मान्य केलेल्या तत्सम संस्था, विद्यापीठाशी संलग्नीत असलेली महाविद्यालये, केंद्रीय किंवा राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मान्य केलेल्या शाळा / संस्था किंवा तंत्रशिक्षण मंडळाने मान्य केलेल्या संस्था, इंटर नॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशन व इंटर नॅशनल सिव्हील ऑरगनाझेशन यांच्या मान्यता प्राप्त संस्था आदी संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविण्यासाठी मान्यता देण्यात येते.

**संपर्क :** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्र निकेतन इमारत, क–विभाग, दुसरा मजला, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. दूरध्वनी:(०२२) २६४७४४३५. संकेतस्थळ–www.msbve.gov.in.

**दरवर्षी ७०,००० विद्यार्थी मंडळाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन व्यवसाय शिक्षणाचा लाभ घेत आहेत.**

# मुलींचे आयटीआय

केवळ मुलींसाठी राज्यात १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आल्या आहेत. त्यापैकी पुणे जिल्ह्यातील औंध येथील मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने उत्कृष्ट काम करणारी संस्था असा नावलौकिक मिळविला आहे.

या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९९२ साली करण्यात आली असून तिचा समावेश २००८ पासून पब्लिक प्रायवेट पार्टनशिप या केंद्र साहाय्य योजनेमध्ये करण्यात आला आहे. संस्थेने व्हिडिओकॉन, लुकास-टीव्हीएस, भार इलेक्ट्रॉनिक्स, सायंरॉनिक्स इन्स्ट्रुमेंटस, रेणु इलेक्ट्रॉनिक्स, हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स इत्यादी नामवंत उद्योगांशी सामंजस्य करार केला आहे आणि त्याद्वारे मागील दोन वर्षात उत्तीर्ण विद्यार्थीनीना १०० टक्के रोजगार मिळवून दिला आहे.




सर्व प्रकारची अद्ययावत यंत्रसामुग्री येथे उपलब्ध आहे. फळे व भाजीपाला प्रक्रिया विभागासाठी सुसज्ज स्वयंपाकघर आणि प्रक्रिया करण्याची यंत्रसामुग्री आहे.

या संस्थेत शिल्पकारागीर प्रशिक्षण, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण, उत्पादनाभिमुख प्रशिक्षण, लोकसेवा केंद्र, मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण, मोड्युलर एम्प्लॉएबल स्किल, आर्टीझन टू टेक्नोक्रॅट या योजना आणि सेंटर ऑफ एक्सलन्स इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या सुरु आहेत. ज्या महिला व मुलींना शिक्षणाची संधी काही अपरिहार्य कारणामुळे मिळालेली नाही. त्यांना या संस्थेत विविध व्यवसायातील प्रशिक्षण घेता येतील. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थीनींना शासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या विद्यावेतन, इ.बी.सी सवलत, अनुसूचित जमातीसाठी निर्वाह भत्ता, एसटी/ रेल्वे पास सवलत, ग्रंथालयाची व ब्रॉडबॅंड इंटरनेट सुविधा आदी सवलती नि:शुल्क दिल्या जातात. संस्थेच्या १०० मुलींसाठीच्या वसतिगृहाचे बांधकामही सुरू आहे.

या संस्थेतून सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व म्हणजे १०० टक्के विद्यार्थिनींना रोजगार मिळाला आहे. दीर्घमुदतीचे व अल्पमुदतीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांनी स्वयंरोजगार सुरू केलेले आहेत. फ्रुट्स ॲन्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग व हॉटेल आणि केटरिंग पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींना ब्ल्यू डायमंड, ताज ग्रुप, मॅकडॉनाल्ड आदी ठिकाणी रोजगार मिळालेला आहे. ❐ ❐




शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुली), औध.



## कौशल्यनिर्मिती

'शिका व कमवा' ही संकल्पना उद्योगक्षेत्राला लाभणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी व विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आली आहे. यामुळे 'शिका व कमवा' ही योजना तरुणांमध्ये कौशल्य विकास करून रोजगाराची मोठ्या प्रमाणात संधी निर्माण करण्यास उपयोगी सिद्ध होणार आहे. राज्य शासनाने यशस्वी इन्स्टिटयूट फॉर स्किल डेव्हलपमेंट, पुणे या संस्थेमार्फत उद्योगसमूहाच्या सहभागासह शिका व कमवा या योजनेंतर्गत तंत्र शिक्षण मंडळाचे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. या योजनेंतर्गत खालील अल्पमुदतीचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहेत. १. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल ड्रग सायन्स (पार्ट टाइम), २. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल फूड सायन्स (पार्ट टाइम), ३. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल रिटेल मॅनेजमेंट (पार्ट टाइम), ४. डिप्लोमा इन सप्लाय चेन ॲन्ड लॉजिस्टिक मॅनेजमेंट (पार्ट टाइम) ५. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट (पार्ट टाइम)

'शिका व कमवा' ही संकल्पना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमासाठी प्रथमच पथदर्शी प्रकल्प म्हणून राबवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थींचा विमा उतरविण्याची व वैद्यकीय देखभालीची जबाबदारी सहभागी उद्योगसमूहाची राहणार आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्क, परीक्षा शुल्क, मंडळ निर्धारित करील. ते प्रतिविद्यार्थी शिक्षणशुल्क व विद्यार्थ्यांना द्यावयाचे विद्यावेतन अदा करण्याची जबाबदारी सहभागी उद्योगसमूहांची राहाणार आहे.

– विजय चांदेकर

# सूत्रधाराच्या शोधाचे शास्त्र

**न्याय साहाय्यक विज्ञान ही विज्ञानाची शाखा आहे. यामध्ये विज्ञान विषयाच्या मूलभूत सिध्दांत व मूळ शाखेमध्ये उपलब्ध असलेले ज्ञान व विधी प्रयोग यांचा उपयोग गुन्ह्याची वस्तुस्थिती स्पष्ट व सिद्ध करण्यासाठी केला जातो.फॉरेन्सिक या शब्दाचा अर्थ न्यायाशी संबधित आहे. या विज्ञानाचा न्याय देण्यासाठी उपयोग केला जातो. फॉरेन्सिक सायन्स मूलत: उपयोजित विज्ञान आहे. या विज्ञानामध्ये बॉयोलॉजी, सेरॉलॉजी, डीएनए, रसायन, नार्कोटिक्स, बॅलेस्टिक्स, एक्सप्लोजिव्ह, भौतिक, फोटोग्रॅफी, दस्तऐवज, (कागदपत्रे) वन्यजीव अपराध, सायबर अपराध, आवाजाची ओळख, टॉक्सिकॉलॉजी, इ. शाखांचा अभ्यास गुन्हा शोधण्यासाठी केला जातो.**

मानवी सभ्यतेच्या विकासाबरोबर समाजामध्ये गुन्ह्यांची संख्या व विविधता या दोन्हीमध्ये वाढ झालेली आहे. गुन्हेगार नवीन पद्धतीच्या तंत्रज्ञानाचा उपयोग हे गुन्हा करण्यासाठी वापरत आहेत व त्यामध्ये वाढ पण झालेली आहे. एक गुन्हा घडल्यापासून गुन्हा सिद्ध होईपर्यंत फॉरेन्सिक सायन्स ( न्याय साहाय्यक विज्ञान) ची भूमिका माध्यमांद्वारे रुजली आहे.

फॉरेन्सिक शब्दाचा अर्थ, टू ब्रिंग टू द कोर्ट असा आहे. फॉरेन्सिक तपासामध्ये दडलेले तथ्य शोधणे, त्यांचे विश्लेषण वैज्ञानिक विधीद्वारा करून गुन्ह्याची माहिती जमा करणे. घटनास्थळावर घडलेल्या गुन्ह्याचे बारकाईने निरीक्षण करून घडलेल्या घटना स्पष्ट करणे. न्याय साहाय्यक विज्ञान हे अनेक विषयांचे मिश्रण आहे. जसे भौतिक विज्ञान, रसायन विज्ञान, वनस्पती विज्ञान, संगणक विज्ञान, सूक्ष्मजीव विज्ञान, मनोविज्ञान, प्राणी विज्ञान, चिकित्सा विज्ञान इ.

**महाराष्ट्रात यंत्रणा नव्हती**


सध्याच्या काळात गुन्ह्यांमध्ये वापरण्यात येत असलेल्या नवीन तंत्रज्ञान व रसायनांचा वापर होत असल्याने गुन्हा व गुन्हेगार शोधण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाची गरज आहे. हे कार्य करण्यासाठी न्याय साहाय्यक विज्ञान शाखेत अद्ययावत शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर तयार करणे आवश्यक आहे.

**न्याय साहाय्यक विज्ञानाचा अभ्यासक्रम**

या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ऑगस्ट २००९ मध्ये न्याय साहाय्यक विज्ञान संस्था औरंगाबाद व मुंबई येथे स्थापन केल्या आहेत. २०११ मध्ये अशी एक संस्था नागपूर येथे स्थापन केली आहे. या तिन्ही संस्था तिन्ही शहरामध्ये असलेल्या नामांकित विज्ञान संस्थांची परिसरामध्ये कार्यरत आहेत. या तिन्ही संस्थेचे वैशिष्टये म्हणजे न्याय साहाय्यक विज्ञानाचा अभ्यासक्रम येथे शिकविला जातो. अशा प्रकारची देशात न्याय साहाय्यक विज्ञान अभ्यासकमाला समर्पित संस्था एकही नाही. सध्या मुंबई व औरंगाबाद च्या न्याय सहाय्यक विज्ञान संस्थेत तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम, दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम व एक वर्षाचे दोन पदविका अभ्यासक्रम सुरू आहेत. मुंबईची संस्था मुंबई विद्यापीठ व औरंगाबादची संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व नागपूरची संस्था ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरला संलग्नित आहे.

मुंबई व औरंगाबाद या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ सायन्स इन फॉरेन्सिक सायन्स व मास्टर ऑफ सायन्स इन फॉरेन्सिक सायन्सची पदवी प्रदान करतात. पदविका अभ्यासक्रमामध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फॉरेन्सिक सायन्स ॲण्ड रिलेटेड लॉ, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डिजीटल ॲण्ड सायबर फॉरेन्सिक ॲण्ड रिलेटेड लॉ यांचा समावेश आहे.

पदवी अभ्यासक्रमासाठी ५०, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २० व पदविका अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. नागपूरच्या शासकीय न्याय साहाय्यक विज्ञान संस्थेमध्ये सध्या पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरू आहे. शैक्षणिक वर्ष २०१४ मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या तिन्ही संस्थांमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह आहे. या तिन्ही संस्था राज्य शासनाच्या असल्याने शैक्षणिक शुल्क अत्यंत कमी आहे. या संस्थांमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, ग्रंथालय, कार्यालय व इतर पायाभूत सुविधा तयार केल्या आहेत. या संस्थांमध्ये शिकविले जाणारे अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहेत. हे अभ्यासक्रम इतर शैक्षणिक संस्था मध्ये शिकविल्या जाणाऱ्या पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा वेगळे आहेत. अभ्यासक्रमामध्ये फॉरेन्सिक केमेस्ट्री फॉरेन्सिक फिजिक्स, फॉरेन्सिक बायॉलॉजी, फॉरेन्सिक सायन्स, सायबर फॉरेन्सिक, फॉरेन्सिक सायकॉलॉजी व विधी हे विषय शिकविले जात आहेत.



**अद्ययावत प्रयोगशाळा**

या संस्थांमध्ये ६ अद्ययावत प्रयोगशाळा आहेत. प्रत्येक प्रयोगशाळेसाठी लागणारी उपकरणे, यंत्रे, रसायने, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, किट्स, मॉडेल्स, चार्ट्स, पुस्तके, नियतकालिके उपलब्ध आहेत.



या सर्व उपकरणांचा शारीरिक द्रव्य जसे रक्त, वीर्य, लाळ, मूत्र, केस ( मानवी व प्राण्यांचे केस), डीएनए (गुणसुत्रे) बोटांचे ठसे, अनेक प्रकारची विषे, मादक पदार्थ, अल्काहोल, विस्फोटके, दव्ये व अन्नधान्यांची भेसळ

**(पान ४३ वर)**

# भाषाकौशल्याची किमया

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यक, स्पर्धा परीक्षा यांशिवाय बी.ए., बी.कॉम., बी.बी.ए., बी.सी.ए. अशा पदव्या धारण करणारे तरुण म्हणजे बेकारीत भर असा समाजात एक गैरसमज पसरला आहे. कला, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, विधी, पत्रकारिता, चित्रकला, चित्रपट, भाषा, साहित्य, संगीत, क्रीडा इ. क्षेत्रात पदवी संपादून जगता येतं. चांगलं वेतन कमावता येतं. करिअर या क्षेत्रातही करता येते हे आपण समजून घेतलं पाहिजे.

साहित्य, कला, संगीत, जाहिरात क्षेत्रात शब्द मोजून मोल ठरते. त्यामुळे बी.ए., एम.ए., बी.कॉम, एम्.कॉम, बी.बी.ए., एम्.बी.ए., बी.जे.सी., एम्.जे.सी., बी.सी.ए., एम्.सी.ए., बी.पी.एड., एम.पीएड, बी.एड, एम.एड, ए.टी.डी, जी.डी.आर्ट या पदव्या संपादन करणाऱ्यांना आता भाषेच्या अधिकार, सामर्थ्य, ज्ञान, कौशल्य, उपाययोजना इ. च्या आधारावर जीवनातील नवनवी क्षितिजे खुणावत आहेत व या क्षेत्रात डॉक्टर, इंजिनीअरपेक्षा अधिक प्रतिष्ठा, प्रसिद्धी, पैसे मिळतात हे आपण रोज पाहत आहोत.

### शिक्षक / प्राध्यापक

आज मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड, तमीळ, गुजराथी इ. भाषांतून आपणास पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून त्यासोबत शिक्षणशास्त्रातील पदविका अथवा पदवी संपादून शिक्षक, प्राध्यापक होता येते. तुम्ही विनाअनुदानित अथवा अनुदानित अशा कोणत्याही संस्थेत शिक्षक, प्राध्यापक झालात की रु. २५,००० ते रु.१ लाख इतकं मासिक वेतन शासनमान्य श्रेणीनुसार मिळवू शकाल. समाजमानसात पैशापेक्षा शिक्षकाची प्रतिष्ठा मोठी आहे. मी प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक, विद्यापीठीय शिक्षक, संशोधक, मार्गदर्शक, प्राचार्य अशी सतत नवनवी पदे संपादत माझं जीवन यशस्वी व समृद्ध करू शकलो. माझं निवृत्ती वेतनच रु. ४०,००० आहे. यावरून शिक्षण क्षेत्रातील संधी आपलं जीवन यशस्वी करू शकतात यावर तुमचा विश्वास बसावा. समाजमनात या पदाची प्रतिष्ठा इतकी मोठी की विद्यार्थी कुठेही भेटोत लवून नमस्कार करतात. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तुमचे विद्यार्थी तुम्हास आदराने साहाय्य करण्यास तत्पर असतात. मला बसमध्ये कधी उभे राहून प्रवास करण्याची पाळी येत नाही. कोणीतरी पालक, विद्यार्थी दत्त असतात. स्वत: उभे राहतात. मला बसवतात. यापेक्षा या क्षितिजाचं कवेत न येणारं टोक कोणतं?

### साहित्यिक/समीक्षक

ललित लेखन हे भाषाप्रभूत्वाशिवाय करता येत नाही. तुम्ही भाषेतील उच्च शिक्षण संपादन केलं असेल तर अधिक प्रतिभा संपन्न लेखन करू शकता. मराठीत जे लेखक झाले त्यांना नि त्यांच्या वारसांना आज लाखो रुपयांच्या घरात मानधन मिळते. हे भाषेचे वाढते मूल्य स्पष्ट करणारे आहे. तुम्ही जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात कार्य, व्यवसाय, नोकरी करत भाषेच्या बळावर कवी, नाटककार, कादंबरीकार, टीकाकार, वक्ता होऊन अधिक पद, प्रतिष्ठा, धन कमावून समाजापुढे 'सेलेब्रेटी', 'रोल मॉडेल' होऊ शकता. वि. स. खांडेकर, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, विजय तेंडुलकर, नारायण सुर्वे, सुरेश भट,

> जीवनात जागतिकीकरणामुळे जे महत्त्वाचे बदल घडून आले, त्यामुळे भाषेस व भाषेच्या उच्च शिक्षणास असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भाषा शिकली की फक्त लिपिक (क्लार्क) होता येतं हे चित्र मागं पडलं आहे. 'बोलणाऱ्याची माती विकते, न बोलणारा पदरी मोती असून विकू शकत नाही' हे वास्तव आहे. शब्द सोन्याचा पिंपळ होतो आहे.



आचार्य अत्रे ही नावं जुनी झाली म्हटली तर आज द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या साहित्याचं मोल सदाबहार ठरतं आहे. साहित्यकृतींवर मालिका, चित्रपट बनून ते घरोघरी पोहोचत आहे. 'श्यामची आई' हे त्याचं सार्वत्रिक चित्र म्हणून सांगता येईल. 'ययाती' माहीत नाही, असा मराठी माणूस मिळणं दुर्मीळ! तुमच्या साहित्याचे अनुवाद अन्य देशी, परदेशी भाषात होऊन तुम्ही जगप्रसिद्ध होणं आजच्या संगणक, इंटरनेट व जागतिकीकरणाच्या युगात नित्याची गोष्ट होऊन गेली आहे. समीक्षेशिवाय दैनिकाची पुरवणी वा नियतकालिक नसते हे पण आपण लक्षात ठेवले पाहिजे.

### अनुवादक / दुभाषी

माहिती व संपर्क क्रांतीच्या या युगात दळणवळण व संपर्क माध्यमात इतकी गती आली आहे की जगाचे अंतरच संपून गेले आहे. जग world wide web (www) मुळे खेडं बनून एक झालंय. त्यामुळे माणसाचं बहुभाषी होणं आवश्यकच नाही तर अनिवार्य झालं आहे. भारतीय माणूस एका दिवसात देशाच्या या टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन परत येणं शक्य झालं आहे. तीच गोष्ट विदेशाची. विदेशी जाण्याचं, फॉरेन रिटर्न म्हणून घ्यायचा काळ केव्हाच मागे पडलाय. या बदलत्या स्थितीमुळे प्रत्येक भारतीयास सर्व भारतीय प्रांतभाषांची ओळख आवश्यक वाटू लागली आहे. भारतीयांचं 'आन्तरभारती' असणं व त्याचवेळी तो 'आंतरराष्ट्रीय' असणं काळाची गरज होते आहे. माणसात शेकडो भाषांच्या संपादनाची बौद्धिक क्षमता असली तरी व्यवहारात ते अन्य व्यवधानांमुळे उतरणे अशक्यप्राय होते. अशा वेळी अनुवादक व दुभाषा असणं वरदान ठरतं. अनुवाद व दुभाषी होण्यासाठी पदवीशिक्षणानंतर अनेक विद्यापीठात प्रमाणपत्र पदविका व पदवी पाठ्यक्रम आहेत. तुम्ही अनुवादक व दुभाषी म्हणून प्राविण्य संपादन केल्यानंतर तुम्हास विदेशी सेवा विभाग, पत्रकारिता, पर्यटन, प्रकाशन, भाषा संपर्क इ. क्षेत्रात तर गलेलठ्ठ पगार मिळतोच पण आज विधी व वैद्यक क्षेत्रात

लिप्यंतरण (ट्रान्स्क्रीप्शन) , लिपिसर्जन / अनुवाद (ट्रान्सक्रियेशन), रूपांतरण, भाषांतर, द्विभाषिक संवाद इ. क्षेत्रे म्हणजे शब्द व मिनिटावर पैसे मोजणारी क्षेत्रे बनली आहेत. अनुवादकास आज पानावर दर ठरवून पैसे दिले जातात. दुभाषी मिनिटावर आपलं मूल्य वसूल करतो. स्त्रियांना घर, मुलं-बाळं सांभाळून इंटरनेट, संगणक, ई-मेलद्वारे अनुवाद, लेखन कार्य करून हजारो रूपये मिळतात. पत्रकारिता, वाहिन्या, वृत्तसंस्था, आकाशवाणी, दूरदर्शन या विभागातही मोठी मागणी आहे. युवकांपेक्षा या क्षेत्रात युवती, महिला आघाडीवर असल्याचे सार्वत्रिक चित्र बनले आहे. त्यामुळे 'नर्स'सारखे हे क्षेत्र महिलांचे एकाधिकार क्षेत्र बनले आहे. जागतिक पर्यटन व्यवसाय हा पूर्णपणे भाषेच्या जोरावर चालतो. संपर्क, प्रचार, समुपदेशन, मार्गदर्शन, सहल संयोजक सर्व ठिकाणी अनुवाद व दुभाषी अशी जोड भूमिका वठवणाऱ्या व्यक्तींना प्राधान्याने घेऊन अधिक वेतन दिले जाते. सिनेमा, दूरदर्शनमध्ये ध्वनिमुद्रणात अनुवाद (डबिंग) चे महत्त्व वाढते आहे. चित्रपट अनेक भाषांत एकाच वेळी प्रकाशित करणे केवळ अनुवादामुळे शक्य झाले आहे. हिस्ट्री, नॅशनल जिऑग्राफी, कार्टून्स इ. चॅनल्स केवळ अनुवादाने बहुभाषिक, बहुदेशी झालीत.

**पत्रकारिता/माध्यम विकास**

विधी पालिका (विधिमंडळ/संसद), न्यायपालिका (न्यायालये), कार्यपालिका (प्रशासन) या देशाच्या तीन आधारभूत स्तंभानंतर चौथा स्तंभ मानला जातो पत्रकारितेस. यात मुद्रित पत्रकारितेबरोबर महाजालीय पत्रकारिता (आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तवाहिन्या) ही अंतर्भूत असते. हे क्षेत्र आज जीवनातील सर्वाधिक प्रभावी साधन व माध्यम मानले जाते. याची सारी मदार असते ती भाषेवर. वृत्त लिहिणे, वृत्त संपादणे, वृत्त चित्रीकरण, वृत्त प्रेक्षपण, वृत्त निवेदन, वृत्त विश्लेषण, वृत्त संवाद, मुलाखती सर्वांसाठी लागते ती भाषा. मुद्रित माध्यमात पत्रकार व संपादकांचा भाव रोज वधारतो आहे. एका वृत्तसंस्थेतून दुसऱ्या संस्थेत गेले की किमान दहा हजार रुपयांची वाढ होते. इथले वेतनही शिक्षक, प्राध्यापकांशी स्पर्धा करणारे ठरले आहे. शिवाय समाजात मान्यता, आदर मिळतो तो वेगळा. इथे वार्षिक वेतन लाखांच्या घरात बोलले जाते. ही क्षेत्रे कार्पोरेट वा बहुराष्ट्रीय बनत चालल्याने ही भाषा प्रभुत्वावर इथलं मोल व मूल्य ठरतं.

**छायाचित्रण/छायांकन/ध्वनिमुद्रण**

ही कौशल्य व तांत्रिकदृष्ट्या नाजूक क्षेत्रे व पत्रकारिता व माध्यमांची अंग असली तरी भाषिक प्रतिभा व प्रभुत्त्वाच्या बळावर तुम्ही इथे राज्य करू शकता. इथेही राज्य, राष्ट्र, जग अशी विस्तारणारी साम्राज्य तुम्ही भाषेच्या जोरावर पादाक्रांत करू शकता. चांगले प्रश्न विचारता येणं, मुलाखत खुलवता येणं, वृत्ताचं कमी वेळात प्रभावकारी विश्लेषण करता येणं, प्रतिस्पर्ध्यावर मात ही सारी राजकीय कौशल्ये आता छायाचित्रकार, मुलाखतकार, ध्वनिमुद्रणकार, छायांकनकार (व्हिडिओशूटर) यांच्यात केंद्रित झाली ती भाषिक साधन व सामर्थ्यावर. भाषा फिरवणे, वळवणे, वापरणे ज्यांना लीलया जमते तो चांगला अँकर, डी. जे., आर. जे. होऊ शकतो तीच गोष्ट छायाचित्रण व ध्वनिमुद्रणास लागू पडते. कार्यक्रम होत असताना पाहणे, युद्धाचा प्रत्यक्ष थरार अनुभवणे या गोष्टी छायाचित्रकारांमुळे शक्य होतात. गौतम राजाध्यक्ष हे या क्षेत्रातलं उदाहरण. सत्यजीत रे हा आदर्श. यामुळे या क्षेत्रास आज सोनेरी दुनिया म्हटले जाते ते उगीच नाही. आवाजाची अमीन सयानी जादू कोण नाकारेल?

**जाहिरात क्षेत्र**

पूर्वी जाहिरात केवळ मुद्रित असायची. तीत चित्र नसायची. असायचे ते फक्त शब्द आणि शब्द. 'आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने' असं ते रूप होतं. मग जाहिरात सचित्र झाली. बोलकी व दृष्य झाली. ध्वनिमुद्रण किमयेमुळे रेडिओ जाहिरातीचं प्रभावी माध्यम बनलं. श्रव्य जाहिरात (जिंगल्स) आज कोट्यवधीची उलाढाल करत आहे. दूरदर्शन, चित्रपट, वाहिन्या (चॅनल्स) मुळे जाहिरात दृक-श्राव्य बनली तशी जाहिरातीतील भाषेचं सामर्थ्य वाढलं. 'ढूँढते रह जाओगे', 'कर लो दुनिया मुठ्ठी में', 'थ्री इन फ्री' यांसारख्या जाहिराती आबाल-वृद्धांच्या तोंडी एकाच वेळी घोळतात. ते भाषिक बळावरच. जाहिरात विश्वात एका शब्दाला एक कोटी रुपये मिळतात. या क्षेत्रात कल्पना, प्रतिभा, दृष्टी, भाषा, संगीत, वादन, गायन, भाषण, लेखन साऱ्याला सारखं महत्त्व असतं. जाहिरातीची उलाढाल अब्जावधी रुपयांची आहे. वृत्तपत्रे व वाहिन्या चालतात त्या जाहिरातीवर. इथं भाषा सर्वस्व असते. सत्ता जाहिरातीवर चालते व जाहिरातीमुळे कोसळते म्हणतात, त्यात भाषाई जादूच असते.

या प्रमुख क्षेत्रांशिवाय कार्यक्रमांचे सूत्र संचालन, कार्यक्रम संयोजन (इव्हेंट मॅनेजमेंट), ध्वनी अभिनय (व्हाइस ओव्हर), सजावट, फॅशन, आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, गायन या क्षेत्रातही भाषेचं असाधारण महत्त्व असतं. तिथंही तुम्हास कीर्ती, प्रसिद्धी, मान्यता, प्रतिष्ठा, संपत्ती मिळते तिचा आधार भाषाच असतो. व्यापार, उद्योगात, प्रवास, पर्यटनात ही भाषेचं, संवाद कौशल्याचं महत्त्व वाढतं आहे. शब्द 'शस्त्र आहे. त्याचा जपून वापर करा' असं शाळेच्या तुळईवर लिहिलेलं सुभाषित आज जगण्यात ब्रह्मवाक्य होतं आहे. यावरून भाषेचं महत्त्व अधोरेखित होतं. भाषा हृदयाचा ठाव घेणारी असते. ती मधुर हवी. ती संवादी हवी. असं जे आज वारंवार सांगितलं जातं ते वक्तृत्वास जगण्यात आलेल्या महत्त्वामुळे. आज आपलं जीवन राजकारण केंद्रित झालं आहे. राजकारणाची सारी मदार, उतार-चढाव सारं भाषिक प्रयोगावर बेतलेलं असतं म्हणून नव्या पिढीने उच्च




# सूत्रधाराच्या शोधाचे शास्त्र

**पान ४० वरून**

शोधण्यासाठी व त्यांचे परीक्षण करण्यासाठी उपयोग केला जातो.


संस्थेमध्ये याव्यतिरिक्त संगणक, इंटरनेट व सायबर क्राईम शोधण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा व सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेत मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे गुन्हेगारास पकडण्याची सोय आहे. त्यासाठी ४८ चाचण्या घेतल्या जातात. भविष्यात नोकरीवर ठेवताना किंवा लग्नाच्या वेळीही अशा चाचण्या कराव्या लागतील. संस्थेमध्ये बनावट नोटा ओळखणे, बनावट सह्या ओळखणे, चेक किंवा कागदपत्रावर केलेली खडाखोड, बनावट प्रमाणपत्रे बनविणे, आदी प्रकारातील गुन्ह्यांचा शोध लावण्याच्या कामासाठी व्हीएससी मशिनचा वापर केला जातो.



**प्रात्यक्षिकांवर भर**

या तिन्ही संस्थांमध्ये विद्यार्थ्याला पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिकाद्वारे शिकवण्यावर संस्थेचा भर असतो. यासाठी संस्थेत आगळेवेगळे उपक्रम राबवले जातात. गेल्यावर्षी शासकीय न्याय साहाय्यक विज्ञान संस्था, औरंगाबाद यांनी १० गुन्हे आणि त्यांचा शोध लावण्यासाठी स्पर्धा घेतली. हत्या, दरोडा, बलात्कार, आत्महत्या, बनावट छायाचित्रे अपलोड करणे यांसारख्या गुन्ह्यांचे मॉडेल तयार करण्यात येऊन प्राण्यांचे रक्त वापरण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांनी घटनास्थळाचा अभ्यास करून गुन्हेगाराचा शोध घेतला. त्याचे व्हिडीओ यू ट्यूबवर अपलोड केले असता त्यास जगभरातून लाईक्स मिळाले. भारतात हा विषय एवढ्या विस्ताराने शिकवत असल्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. या तिन्ही संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मार्च २०१२ मध्ये मोठ्या प्रमाणावर मुंबई येथे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी चर्चासत्रामध्ये शोधनिबंध सादर केले आहे. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रीय व राज्यस्तरीय न्याय साहाय्यक प्रयोगशाळा येथे भेटीचे आयोजन, संस्था स्थरावर तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा यंत्रे व उपकरणे हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. हिवाळी व उन्हाळी सुट्यांमध्ये विद्यार्थ्यांना राज्यातील व देशातील नामांकित प्रयोगशाळेत प्रशिक्षणासाठी पाठविले जाते.

भविष्यात या संस्थेमध्ये न्याय साहाय्यक विज्ञानाचे विविध शाखांमध्ये संशोधन सुरू करण्यात येईल. या संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना करिअरची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. हे विद्यार्थी क्षेत्रिय, राज्य व केंद्रीय न्याय साहाय्यक



विज्ञान प्रयोगशाळेमध्ये, न्यायवैद्यक तज्ज्ञ म्हणून काम करतील. याव्यतिरिक्त विद्यार्थी पोलीस खाते, सी.आय.डी., बँक, इन्शुरन्स कंपनी, व अनेक औद्योगिक क्षेत्रामध्ये करिअर निवडू शकतात. काही तज्ज्ञ विद्यार्थी स्वत:ची खाजगी प्रयोगशाळा सुरू करू शकतील.

❑ ❑

---

शिक्षणात प्राधान्याने भाषिक अभ्यासक्रम निवडले पाहिजे. भाषेतील पदवी म्हणजे जगण्याचा, सुखी जीवनाचा परवाना मानून नवी क्षितिजे कवेत घेण्यासाठी भाषिक अभ्यासक्रमांना जगण्याचं सशक्त साधन म्हणून स्वीकारलं तर त्यांच्या आयुष्याचं सोनं होईल !

संपर्क : ९८८१२५००९३

❑ ❑




पान २३ वरून

## आम्ही बदलू जगासोबत

■ **उद्योग-संस्था समन्वय**

उद्योग व संस्था यांच्या भागिदारीविषयी विविध स्तरांवर चर्चा होत असल्या तरी प्रत्यक्षात आवश्यक तो समन्वय दिसून येत नाही. त्यामुळे उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ मिळत नसून शिक्षण सुरू असताना उद्योगांमध्ये आवश्यक अनुभव मिळत नाही. संस्थांना याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने सर्वोत्कृष्ट उद्योग समन्वय असणाऱ्या संस्थेला पारितोषिक देण्याची योजना जाहीर केली आहे. प्रत्येक विभागामध्ये एक प्रमुख उद्योग व एक प्रमुख संस्था निर्धारित करण्यात आले आहे. त्याद्वारे परिसरातील इतर उद्योगांना प्रमुख उद्योग व इतर दहा संस्थांना प्रमुख संस्थेशी जोडून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

■ एका विशिष्ट पातळीवर न थांबता सातत्याने गुणवत्ता वृद्धी व्हावी जेणेकरून जागतिक स्पर्धेमध्ये मंडळ मागे राहू नये यासाठी मंडळाच्या प्रणालीमध्ये सतत सुधारणा केल्या जाव्यात असे मंडळाचे धोरण आहे. ४५ दिवसात निकाल, शिक्षकांचे प्रशिक्षण, अभ्यासक्रम उजळनी, नवीन अभ्यासक्रम तयार करणे ह्यासाठी मंडळ सतत प्रयत्नशील आहे.

कारभारातील सुस्पष्टता आणि पारदर्शकता यामुळे मंडळाला यश मिळाले आहे, ही बाब विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवी. इथे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निगडित आहे. प्रवेश घेणारी मुलं आपापल्या क्षेत्रात कुणीतरी मोठं बनण्याच्या उद्देशाने येत असतात. त्यांचा, त्यांच्या पालकांचा आणि मंडळाला मदत करणाऱ्या विविध उद्योगव्यवसायातील मान्यवरांचा विश्वास मंडळाशी जोडला गेला असल्यामुळे मंडळावरील जबाबदारी मोठी आहे. कारभारामध्ये सुसूत्रता असणे महत्त्वाचे आहे. आजवरच्या कारभारातून मंडळाने ते दाखवून दिले आहे आणि आता त्यावर आंतरराष्ट्रीय मान्यतेचे शिक्कामोर्तबही झाले आहे. मंडळाचे संकेतस्थळ www.msbte.com.

❑ ❑



## सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल, कंपनी सेक्रेटरी

# भरपूर संधी... पुरेपूर समाधान

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्ट्न्टस ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना १९४९ साली झाली. देशातील चार्टर्ड अकौन्टन्टसी (सनदी लेखापाल) या व्यवसायाचे नियमन करण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना केली गेली.

सनदी लेखापाल हा आव्हानात्मक असा व्यवसाय आहे. अकौंटिंग (लेखा तपासणी), ऑडिटिंग (हिशेब तपासणी), कार्पोरेट फायनान्स (कंपनी वित्त), टॅक्सेशन (कर निर्धारण), कार्पोरेट गव्हर्नन्स (कंपनी सुशासन) अशासारखे करियरचे विविध पर्याय सनदी लेखापालांना उपलब्ध होतात.

सार्वजनिक सनदी लेखापाल हा प्रोप्रायटर म्हणून करिअर सुरू शकतो किंवा एखाद्या लेखापाल फर्ममध्ये त्याला रुजू होता येतं. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करनिर्धारणाच्या कार्यात सनदी लेखापाल तज्ज्ञ सल्ला देऊ शकतो. याशिवाय व्यावसायिक सल्लागार म्हणून वित्तीय अहवाल तयार करणे, यासारख्या सेवासुद्धा देऊ शकतो.

### व्यवस्थापकीय सल्लागार सेवा

व्यवसाय आणि उद्योगांकडे असलेल्या संसाधनांच्या प्रभावी वापरासाठी सनदी लेखपाल साहाय्य करू शकतात. वित्तीय आणि व्यूहात्मक व्यवस्थापन, नियोजन आणि वित्तीय धोरण निर्धारण या बाबींमध्ये ते सल्ला देऊ शकतात. व्यावसायिकांना आणि व्यक्तींना करनियोजन करण्यासाठी साहाय्य करू शकतात. उद्योग आणि शासकीय विभागात सनदी लेखापालांना मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य वित्तीय अधिकारी, मुख्य कार्यान्वयन अधिकारी अशासारख्या जबाबदारीची पदे भूषविता येऊ शकतात.

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या या माहिती तंत्रज्ञानाशी निगडित लेखा परीक्षण, आंतरराष्ट्रीय करनिर्धारण, आंतरराष्ट्रीय व्यापारी कायदे या विषयांसाठी भारतीय सनदी लेखापालांनांच प्राधान्य देतात.

### सनदी लेखापाल कसे व्हाल?

१० वी उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थी कॉमन प्रोफिशिएन्सी टेस्टसाठी (सीपीटी) संस्थेकडे नाव नोंदवू शकतो. असे नाव नोंदवल्यानंतर ६० दिवसांनी आणि १२ वीची परीक्षा दिल्यावर सीपीटी परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागते. ही परीक्षा ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर इंटरमिजिएट प्रोफिशिएन्सी कोर्स (आयपीसी)च्या गट एक किंवा दोन किंवा दोन्ही गटांसाठी नाव नोंदवावे लागेल. प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू होण्याआधी ३५ तास कालावधीचा व एक आठवड्याचा दिशानिदेशन (ओरिएंटेशन) कोर्स पूर्ण करावा लागतो. प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी माहिती तंत्रज्ञानाशी निगडित १०० तासांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. इंटरमिजिअट प्रोफिशिएन्शी अभ्यासक्रमाला बसावं लागतं. आठ महिन्यांचा अभ्यासक्रम संपल्याबरोबर ही परीक्षा होते. इंटरमिजिएट प्रोफिशिएन्सी अभ्यासक्रम गट एक किंवा दोन्ही गट उत्तीर्ण झाल्यावर प्रत्यक्ष सराव (प्रॅक्टिकल) प्रशिक्षणात सहभागी व्हावं लागतं.

पहिल्या वर्षीच्या प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या कालावधीत १५ दिवसीय सामान्य व्यवस्थापन आणि संवाद कौशल्य (प्रथम) अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

१८ महिन्यांचे प्रॅक्टिकल प्रशिक्षण पूर्ण होण्याआधी १५ दिवसीय सामान्य व्यवस्थापन आणि संवाद कौशल्य (द्वितीय) अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. आधी उत्तीर्ण केली




नसल्यास इंटरमिजिएट परीक्षा गट दोन उत्तीर्ण करावी लागते. यानंतर सनदी लेखापाल अंतिम परीक्षेसाठी नोंदणी करून या परीक्षेची तयारी करावी लागते. प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या तिसऱ्या वर्षात आणि अंतिम परीक्षेला बसण्यापूर्वी प्रगत माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण पूर्ण करावं लागतं. तीन वर्ष कालावधीचे प्रॅक्टिकल प्रशिक्षण पूर्ण करावं लागतं. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर अंतिम परीक्षेला बसावं लागेल किंवा शेवटच्या सहा महिन्याची आर्टिकलशिप प्रशिक्षण सुरू असताना या परीक्षेला बसावं लागेल.

अंतिम परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल आणि सामान्य व्यवस्थापन व संवाद कौशल्य (द्वितीय) अभ्यासक्रम उत्तीर्ण केला नसल्यास तोही पूर्ण करावा लागेल. त्यानंतर द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्ट्न्टस ऑफ इंडिया या संस्थेकडे नाव नोंदणी करावी लागेल. त्यानंतर उमेदवारास सनदी लेखापाल असे संबाधले जाईल.

### थेट प्रवेश मार्ग–एक

ज्या वाणिज्य पदवीधर किंवा पदव्युत्तर पदवीधरास ५५ टक्के गुण किंवा इतर शाखेतील पदवी किंवा पदवीधरास ६० टक्के गुण असतील त्यांना हा अभ्यासक्रम थेटपणे करता येतो.

त्याचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत. १) इंटरमिजिएट इंटिग्रेटेड प्रोफेशनल कॉम्पिटन्स अभ्यासक्रमासाठी नाव नोंदवावं लागेल. २) त्यानंतर एक आठवड्याच्या कालावधीचा आणि ३५ तासांमध्ये विभाजित करण्यात आलेला ओरिएन्टेशन अभ्यासक्रम आणि १०० तासांचे माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण पूर्ण करावं लागेल. ३) तीन वर्षांच्या प्रॅक्टिकल प्रशिक्षणासाठी नाव नोंदवावं लागेल. ४) पहिल्या वर्षिच्या प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या कालावधीत सामान्य व्यवस्थापन आणि संवाद कौशल्य (एक) अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. ५) प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या ९ महिन्यानंतर आणि इंटरमिजिएट इंटिग्रेटेड प्रोफेशनल अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी केल्यानंतरच्या तारखेपासूनच्या ८ महिन्यांच्या

अभ्यासानंतर इंटरमिजिएट इंटिग्रेटेड प्रोफेशनल अभ्यासक्रमाची परीक्षा द्यावी लागेल. ६) इंटरमिजिएटच्या दोन्ही गटाच्या परीक्षा देऊन उत्तीर्ण व्हाव्या लागतील. ७) सीए अंतिम परीक्षेसाठी नोंदणी करून या परीक्षेची तयारी करावी लागेल. ८) प्रशिक्षणाच्या शेवटच्या १९ ते ३६ महिन्यांच्या कालावधीत सामान्य व्यवस्थापन आणि संवाद कौशल्य (दोन), अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. ९) प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या तिसऱ्या वर्षांत आणि अंतिम परीक्षेच्या आधी प्रगत माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण पूर्ण करावं लागेल. १०) तिसऱ्या वर्षाच्या प्रॅक्टिकल प्रशिक्षणाच्या शेवटच्या सहा महिन्यात अंतिम परीक्षा द्यावी लागेल. ११) अंतिम परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. १२) द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्ट्न्टस ऑफ इंडियाकडे नाव नोंदणी करावी लागेल. त्यानंतर उमेदवारास सनदी लेखापाल असे संबोधलं जाईल.

**थेट प्रवेश -दोन**

द इन्स्टिट्यूट ऑफ कम्पनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया आणि द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकौन्टन्टसच्या इंटरमिजिएट स्तराची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या संस्थेच्या दोन्ही गट वा एका गटाच्या इंटरमिजिएट इंटिग्रेटेड प्रोफेशनल कॉम्पिटन्स अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी करावी लागेल. इतर मुद्दे थेट प्रवेशप्रक्रिया पहिल्या भागाच्या चार क्रमांकापासून समान राहतील.

पत्ता -१) बोर्ड ऑफ स्टडिज, द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टन्ट्स ऑफ इंडिया, आयसीआयए भवन-ए-२९, सेक्टर ६२, नॉयडा-२०१ ३०९, दूरध्वनी -०१२०-३०४५९३१, ईमेल -bosnoida@icai.org, वेबसाइट - www.icai.org

२) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल ऑफ आयसीएआय, आयसीआयए भवन - २७, कफ परेड, कोलाबा, मुंबई - ४०० ०५, दूरध्वनी-०२२-३९८९ ३९८९ ई मेल-wro@icai.org, वेबसाइट - www.wirc-icai.org

**कंपनी सेक्रेटरीज फाऊन्डेशन कोर्स**

द इंस्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने आठ महिने कालावधीचा कंपनी सेक्रेटरीज फाऊन्डेशन कोर्स हा व्यावसायिक अभ्यासक्रम चालविण्यात येतो. या अभ्यासक्रमाला कोणत्याही शाखेतील १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. या अभ्यासक्रमांतर्गत इंग्लिश आणि बिझिनेस कम्युनिकेशन, इकॉनॉमिक्स अँड स्टॅटिस्टिक्स, फायनांशिएल अकौंटिंग आणि एलिमेंट ऑफ बिझिनेस लॉज अँड मॅनेजमेंट हे विषय शिकविले जातात.

हा अभ्यासक्रम केल्यावर कार्पोरेट प्लॅनर आणि स्ट्रॅटेजी मॅनेजर म्हणून भूमिका बजावण्याची संधी मिळू शकते. कंपनी सेक्रटरीला अनेकदा संस्थांतर्गत कायदेतज्ज्ञ म्हणून सुध्दा काम करावं लागतं. संचालक मंडळाचे मुख्य सल्लागार म्हणून सुध्दा भविष्यात संधी मिळू शकते.

हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना कंपनी सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह प्रोग्रॅम या ९ महिने कालावधीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो. त्यानंतर कंपनी सेक्रेटरी प्रोफेशनल प्रोग्रॅम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तो पात्र ठरू शकतो.



पत्ता-द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया१३, जॉली मेकर चेबंर्स, नंबर २, फर्स्ट फ्लोअर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१, दूरध्वनी- २२०२ १८२६, २२८४४०७३ फॅक्स -२२८५० १०९ मेल-wiro@icsi.edu वेबसाइट -www.icsi.edu

**कॉस्ट अकौन्टन्ट्स**

इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकौन्टन्ट्स तर्फे फौन्डेशन आणि इंटरमिजिएट अभ्यासक्रम चालविले जातात. फौन्डेशन अभ्यासक्रमाला कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकतो. इंटरमिजिएट अभ्यासक्रमाची प्रवेश अर्हता ही कोणत्याही विषयातील पदवी आहे.

**प्रवेशाचे टप्पे**

१२वी उत्तीण झालेल्या उमेदवाराला फाऊन्डेशन परीक्षा द्यावी लागते. त्यानंतर १८ महिन्याच्या कालावधीचा इंटरमिजिएट अभ्यासक्रम करावा लागतो. कोणत्याही शाखेतील पदवीधराला या अभ्यासक्रमाला थेट प्रवेश दिला जातो. ही परीक्षा उत्तीर्ण केल्यावर १८ महिने कालावधीचा अंतिम अभ्यासक्रम करावा लागतो. ३ वर्षाच्या प्रॅक्टिकल प्रशिक्षणासह अंतिम परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. या नंतर द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकौन्टट ऑफ इंडियाचे कॉस्ट अकौन्टन्ट म्हणून सदस्यत्व प्रदान केलं जातं. कॉस्ट अकौन्टन्ट्सना जगभर मॅनेजमेंन्ट अकौन्टन्ट्स म्हणून ओळखले जाते.

**कॉस्ट अकौन्टन्ट् काय करतात?**

कॉस्ट अकौन्टन्ट्सना सध्याच्या काळात विविध खाजगी, सार्वजनिक आणि शासकीय क्षेत्रातील विविध प्रकारच्या ऑडिटची-लेखा परीक्षणाच्या कामासाठी मोठी मागणी आहे.

कॉस्ट अकौन्टन्ट संस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त करून स्वतंत्रपणे प्रॅक्टिस सुरू करू शकतो. इतर कॉस्ट अकौन्टन्टसच्या सोबतीने सल्लागार कंपनीची स्थापना करू शकतो. कॉस्ट अकौन्टन्ट पुढील क्षेत्रात सेवा देऊ शकतो. १) कार्पोरेट क्षेत्राचे कॉस्ट ऑडिट, २) सहकार क्षेत्राचे कॉस्ट ऑडिट, ३) बँकांचे स्टॉक ऑडिट, ४) केंद्रीय एक्साइज ऑडिट ५) सेबीचे अंतर्गत ऑडिट

**करिअरची संधी**

हा अभ्यासक्रम केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या कौशल्यामुळे अनेकांना कार्पोरेट, खाजगी आणि सार्वजनिक कंपन्यांमध्ये वित्त नियंत्रक, वित्तीय व्यवस्थापक, वित्तीय संचालक, मुख्य वित्तीय अधिकारी, कॉस्ट कन्ट्रोलर, चीफ इंटरनल ऑडिटर, चेअरमन कम मॅनेजिंग डायरेक्टर अशासारख्या उच्चश्रेणीच्या पदांवर कार्य करण्याची संधी मिळू शकते.

पत्ता-वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल, रोहित चेम्बर्स, चौथा माळा, जन्मभूमी मार्ग, फोर्ट मुंबई - ४००००१, दूरध्वनी - ०२२-२२८७ २०१०, फॅक्स - २२८७ ०७६३, ईमेल - www. icwa-wirc-org, वेबसाइट - wirc@icwa.org

❒ ❒

लोकराज्यच्या मे महिन्याच्या अंकातील 'आपलं गाव, आपलं पाणी' या लेखाच्या लेखकाचे नाव अॅड. बाळ ज. बोठे असे आहे.

# कष्टाची पायवाट यशाचा राजमार्ग

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला येत्या १ जुलैला २४ वर्षे पूर्ण होत आहेत. राज्यातील साडेपाच लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण सुलभ पद्धतीने आणि माफक शिक्षणशुल्कात उपलब्ध करून देणारे हे विद्यापीठ २०१३ च्या जुलै महिन्यात आपल्या रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे.**

राज्यात १६ विद्यापीठे असताना आणखी एक विद्यापीठ, म्हणजे सुशिक्षित बेकारांचा कारखाना, कशाला काढायचा? असा प्रश्न विचारून जी कल्पनाच आधी मोडीत काढली गेली होती ती राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी उचलून धरली आणि १ जुलै १९८९ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. यामागे पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांचे अथक प्रयत्न कारणीभूत होते.

**श्रीनिवास बेलसरे**

स्पर्धाशील जगात जर भारताला महासत्ता व्हायचे असेल तर सर्वात महत्त्वाचे ठरेल ती त्याच्या मनुष्यबळाची गुणवत्ता! ती अचानक वाढविता येत नाही. प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाला जर स्पर्धेत उतरायचे असेल तर पायाभूत सुविधांचा विकास खूप घाईने साधणे शक्य नसते. त्यामुळे उपलब्ध सोईसुविधा अधिक प्रभावीपणे वापरून समाजाचा शिक्षणाचा अनुशेष भरून काढणे गरजेचे होते. त्यासाठी आहेत त्याच महाविद्यालयांच्या इमारती आणि प्राध्यापकांच्या ज्ञानाचा उपयोग सुटीच्या दिवशी करणारी, दूर आणि मुक्त शिक्षणपद्धती उत्तम ठरेल हे शासनाच्या लक्षात आले.

सुशिक्षित तरुण बेकार राहतात त्याचे खरे कारण पदवी पातळीवरील अनेक अभ्यासक्रम



व्यवसायाभिमुख नाहीत, हे डॉ. ताकवले यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून लक्षात घेतले होते. त्यावरचा योग्य इलाज म्हणूनच त्यांनी जगातील पहिले मुक्त विद्यापीठ असलेल्या इंग्लंडच्या 'द ओपन युनिव्हर्सिटी'चा अभ्यास करून, आपल्या मुक्त विद्यापीठाची संकल्पना विकसित केली. त्यामुळे १९८९ साली महाराष्ट्र विधिमंडळाने जो विशेष कायदा करून, ह्या विद्यापीठाची स्थापना केली त्यातच, 'आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसायाभिमुख उच्च शिक्षण देणारे विद्यापीठ' म्हणून कार्य करण्याचा आदेश, या विद्यापीठास देण्यात आला. राज्यातले पहिले (आणि अद्याप एकमेव) स्वावलंबी विद्यापीठ म्हणून मुक्त विद्यापीठ कार्यरत आहे. या विद्यापीठास शासन पगारासाठी अनुदान देत नाही.

या विद्यापीठाचा भर आगळेवेगळे उपयोजित शिक्षणक्रम विकसित करण्यावरच राहत आला आहे. कृषिविज्ञान विद्या शाखेपासून, संगणकशास्त्र, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व्यवस्थापन, मानव्यविद्या, आरोग्यविज्ञान, शिक्षणशास्त्र, शैक्षणिक सेवा, सहयोग व विशेष उपक्रम व अशा विद्याशाखा कार्यरत आहेत. इतरत्र न आढळणारा 'विद्यार्थी सेवा विभाग' असा स्वतंत्र विभागही ह्या विद्यापीठात आहे.

### पूर्वतयारी शिक्षणक्रम

### शिक्षणक्रम

**पदवी पूर्वतयारी**

**प्रवेश पात्रता :** वयाची १८ वर्षे १ जुलैला पूर्ण असावीत. इंग्रजी मराठी लिहिता-वाचता येणे पुरेसे. शिकण्याची प्रामाणिक इच्छा हीच पात्रता. **(कालावधी : ६ महिने)** पुढील संधी-फायदे : १०वी १२वी न करताही पदवी घेता येते. विद्यापीठाच्या अनेक पदवी-पदविका शिक्षणक्रमांना प्रवेश. जेथे जेथे प्रवेश पात्रता १२वी उत्तीर्ण अशी आहे त्या सर्व मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांना प्रवेश मिळू शकतो.

### बी.ए. (मराठी), बी.कॉम (मराठी-इंग्रजी-हिंदी-उर्दू)

**प्रवेश पात्रता :** १२वी उत्तीर्ण किंवा मुक्त विद्यापीठाचा पदवी पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण किंवा १९७५ पूर्वीची अकरावी उत्तीर्ण. याशिवाय १० वीनंतर २ वर्षाची शासनमान्य पदविका केलेली असेल तर मुक्त विद्यापीठाच्या पदवी शिक्षणक्रमास थेट प्रवेश मिळू शकतो. **कालावधी : ३ वर्षे**

**पुढील संधी-फायदे:** मुक्त विद्यापीठात किंवा अन्य पारंपरिक विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेता येते. केंद्रीय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांना बसता येते. वरील दोन्ही शिक्षणक्रमांची अभ्यासकेंद्रे राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांत कार्यरत आहेत. याशिवाय नाशिक, मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, नांदेड, औरंगाबाद, सावंतवाडी आणि अमरावती येथे विद्यापीठाची विभागीय केंद्रेही कार्यरत आहेत.

### सर्वांसाठी शिक्षण

मुक्त विद्यापीठाने आपला 'पूर्वतयारी' हा शिक्षणक्रम गेली २४ वर्षे राबवला आहे. त्याचा मुख्य उद्देश 'सर्वांसाठी उच्च शिक्षण' उपलब्ध व्हावे, असा आहे. गणित, इंग्रजी या विषयांचा बाऊ न करता सर्वांना पुढील उच्च शिक्षण घेता यावे, ही मुक्त विद्यापीठाची धारणा असल्याने विद्यापीठाने तशी व्यवस्था आपल्या पदवी पूर्वतयारी या केवळ ६ महिन्यांच्या शिक्षणक्रमाद्वारे विकसित केली आहे.

केवळ इंग्रजी आणि गणित येत नाही म्हणून कुणाला पुढील शिक्षणासाठी कायमचे अपात्र ठरविणे योग्य नाही. मात्र अजिबात इंग्रजी न येताही प्रगती करणे अवघड जाईल म्हणून मुक्त

ज्ञानगंगा घरोघरी

संगणकाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळू शकेल. त्यामध्ये दीड वर्षाचा 'डिप्लोमा इन कम्प्युटर हार्डवेअर मेंटेनन्स ॲण्ड नेटवर्किंग टेक्नॉलॉजी', पत्रकारिता, मेंटनन्स ॲण्ड नेटवर्कींग टेक्नॉलॉजी बी. ए.-पत्रकारिता, बी. ए.-पब्लिक सर्व्हिसेस, ब्युटीपार्लर व्यवस्थापन, योगशिक्षक पदविका, डिप्लोमा इन फॅशन डिझायनिंग ॲन्ड ब्युटिक व्यवस्थापन, बी. एस्सी, इन हॉस्पिटॅलिटी ॲण्ड टुरिझम स्टडीज, बी. एस्सी इन हॉस्पिटॅलिटी ॲण्ड कॅटरिंग सर्व्हिसेस, बी. एस्सी इन ग्रॅफिक्स ॲण्ड ॲनिमेशन अशा अनेक आकर्षक शिक्षणक्रमांनाही प्रवेश घेता येतो.

### अल्प फीमध्ये अनेक संधी

पूर्वतयारी शिक्षणक्रमाची संपूर्ण फी केवळ ६०० रुपये असून जूलै २०१३ पासून ह्या शिक्षणक्रमाचे प्रवेश सुरु होत आहेत. ज्यांना १२वी न करता पुढील उच्च शिक्षण पूर्ण करायची इच्छा आहे त्यांनी ही संधी सोडणे उचित होणार नाही. (अधिक माहितीसाठी संपर्क: ०२५३-२२३०१११ आणि ०२५३- २२३००९५. संकेतस्थळ: http:// ycmou. digitaluniversity. ac)

### ३ वर्षांत २ पदव्या

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार

महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार १०,१२ वी नापास, मात्र ह्या विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम आणि पदवीचे प्रथमवर्ष उत्तीर्ण होणाऱ्यांना १२ वी उत्तीर्ण मानून शासकीय नोकरीसाठी अर्ज करता येणार आहे. तसा शासन निर्णय सरकारने नुकताच जारी केला आहे. (शासन निर्णय क्र.आर.जी.डी.-१५११/प्र.क्र.८९ /१३ दि.२० मे २०११)

विद्यापीठाने आपल्या पदवी पूर्वतयारी शिक्षणक्रमात इंग्रजीसाठी, मूलभूत भाषा कौशल्ये हा त्या भाषेची प्राथमिक ओळख करून देणारा अभ्यासक्रम तसेच गणिताचा परीचय करून देणारा 'सर्वांसाठी गणित' हा अभ्यासक्रमही ठेवला आहे. त्यामुळे १२वीच काय अगदी ९ वी १० वी नापास विद्यार्थीही पूर्वतयारी शिक्षणक्रमास प्रवेश घेतात. या ६ महिन्यांच्या या शिक्षणक्रमानंतर येत्या जून २०१३ मध्ये विद्यार्थी सरळ पदवीच्या प्रथम वर्षास प्रवेश घेऊ शकतील. बी.ए.किंवा बी.कॉम ह्या पदव्यांनाच केवळ प्रवेश मिळतील असे नाही तर या विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठात अनेक व्यावसायिक शिक्षणक्रमांना तसेच

कोणतीही पदवी एक वर्षात मिळत नाही. मुक्त विद्यापीठाने मात्र स्पर्धाशील समाजाचा विचार करून ज्यांना वेगाने अधिक शिक्षण त्याच कालावधीत घ्यायचे आहे त्यांच्यासाठी द्विपदवीधर योजना सुरू केली आहे. यासाठी खरे म्हणजे मुक्त शिक्षणपद्धती समजून घ्यायला हवी. जेव्हा विद्यार्थी संगणकशास्त्रातील एखादी पदविका प्राप्त करतो तेव्हाच त्याने मुक्त विद्यापीठाच्या द्वि-पदवी पद्धतीचा फायदा करून घेत केवळ रविवारी चालणाऱ्या या पदवी शिक्षणक्रमाला प्रवेश घेणे फायद्याचे असते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुक्त विद्यापीठात प्रवेश घेताना आपल्याला स्थलांतर दाखला द्यावा लागत नाही. त्यामुळे एकाच वेळी

महाराष्ट्र सरकारने एक विशेष कायदा करून या विद्यापीठाची स्थापना केली असल्याने सर्व सरकारी नोकऱ्यांत मुक्त विद्यापीठाची पदवी चालते. (शासन निर्णय क्र.आर.जी.डी.-१३९४/प्र.क्र.२१/९४/१३ दि.८ मार्च १९९५) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता या विद्यापीठास आहे. त्याशिवाय कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग या कॅनडातील आंतरराष्ट्रीय संस्थेने विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट गुणवत्तेबद्दल पुरस्कार दिला आहे.

संगणकातील किंवा खरे म्हणजे दुसरा कोणताही शिक्षणक्रम करताना आपल्याला मुक्त विद्यापीठाची पदवी घेता येते.

**बदल घडवून आणणारी शिक्षणव्यवस्था**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी हे विद्यापीठ, ही समाजात मूलभूत बदल घडवून आणणारी संस्था असल्याचे सिद्ध केले आहे.

या वर्षी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत राज्यातून ८० उमेदवार उत्तीर्ण झाले. त्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदवी असलेला रमेश गोरख घोलप हा विद्यार्थी होता. या निकालानंतर लगेच काही दिवसांत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा निकाल लागला. त्यात रमेश घोलप राज्यात पहिल्या क्रमाने उत्तीर्ण झाला. त्याची कथा मोठी प्रेरक आहे. अकरावीला असतानाच त्याच्या वडलांचे निधन झाले. आई बांगड्या विकून घर चालवीत होती. रमेशला ते काही सहन झाले नाही. त्याने १२ वीनंतर पदवी घ्यायचे स्वप्न अर्धवट सोडून डी.एड. केले आणि जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षकाची नोकरी पकडली. मात्र तिथे घोलप गप्प बसले नाहीत. त्यांनी मुक्त विद्यापीठाच्या बी. ए. शिक्षणक्रमाला प्रवेश घेतला. मुक्त विद्यापीठात अत्यल्प फी असते हा मुद्दा त्यांना अनुकूल वाटला.

काही वर्षे अध्यापन केल्यावर त्यांनी निर्णय घेतला की आता आपले स्वप्न साकार करूनच म्हणजे सनदी अधिकारी होऊनच गावाकडे परत यायचे. घोलप यांनी शिक्षकाची नोकरी सोडली. थेट मुंबई गाठली. शासकीय प्रशिक्षण केंद्रात अभ्यास सुरु केला आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले. त्याबरोबरच त्यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही उत्तम यश मिळवले. स्वत: पोलिओग्रस्त असूनही या गुणवंत विद्यार्थ्याने आपल्या नावावर आणि विद्यापीठाच्याही नावावर विक्रम नोंदवला आणि राज्यात दुसऱ्यांदा मुक्त विद्यापीठाचा पदवीधर एम.पी.एस.सीत पहिला आला.

**समाजाच्या गरजांचा विचार**

केवळ महागड्या महाविद्यालयांची फी भरण्यासाठी पैसे नसल्याने गुणवत्ता असूनही (चांगले शिक्षण न परवडल्याने) मोठा वर्ग मागे राहून जाईल अशी भीती आहे. शक्य तेवढी माफक फी ठेवणाऱ्या मुक्त विद्यापीठाची खरी उपयुक्तता इथेच लक्षात येते. याशिवाय ज्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या काही पारंपरिक कार्यकौशल्ये घरीच शिकून काम करतात आणि केवळ पोट भारतात, त्यांना विकासाची संधी आपोआप नाकारली जाते. उदा. चर्मकार समाज, नाभिक समाज, ग्रामीण कास्तकार, शेतमजूर. विद्यापीठाने त्यांचाही विचार करून त्यांना जरी पारंपरिक पदवीच्या प्रमाणपत्रात रूची नसली, तरी त्यांच्याच व्यवसायातली आधुनिक कौशल्ये शिकवून, त्यांचा आर्थिक स्तर कसा वाढविता येईल याचा विचार केला आहे. सलून टेक्निक्स, कॉब्लर टेक्निक्स, गॅस सिलेंडर वाहणारी मुले यांच्यासाठीही विशेष शिक्षणक्रम विकसित केले आहेत. असे समाजाच्या गरजांवर आधारित उपयोजित शिक्षणक्रम विकसित करण्यासाठी विद्यापीठात स्वतंत्र 'सहयोग आणि विशेष उपक्रम' विभाग कार्यरत आहे. लडाख लेह अशा भागात आपला जीव धोक्यात घालून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठीही विद्यापीठाने शिक्षणक्रम विकसित केलेले असून राज्याच्या पोलीसदलाबरोबर झालेल्या सामंजस्य करारानुसार पोलीस प्रशासन, एम.बी.ए. (पब्लिक पॉलिसी व्यवस्थापन) असे वेगळे शिक्षणक्रम सध्या सुरू आहेत. आय.बी.एम. तसेच ल्युपिन लॅबरेटरिज अशा नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्याबरोबर विद्यापीठाचे अनुबंध आहेत.



शासकीय स्तरावरही या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी विक्रम केले आहेत. गेल्या वर्षी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिले आलेले ईश्वर कातकडे हे मुक्त विद्यापीठाचेच पदवीधर. त्याच वर्षी राज्यातील मुलींमध्ये पहिल्या आलेल्या अर्चना पाटील मुक्त विद्यापीठाच्याच विद्यार्थीनी. सर्व अपंगांत पहिला आलेला हंसराज पाटीलही मुक्त विद्यापीठाचा पदवीधर आहे. राज्याच्या सर्वात महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांत विक्रमी यश मिळवून महाराष्ट्राच्या या युवकांनी दूर आणि मुक्त शिक्षणपद्धतीचे उपयोगित्व सिद्ध केले आहे. आता अधिकाधिक युवा-युवतींनी या पद्धतीचा अंगीकार करून स्वत:ला अधिक कुशल, ज्ञानसंपन्न आणि स्पर्धाशील केले पाहिजे. ( या लेखाचे लेखक हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रमुख, संस्थात्मक संप्रेषण प्रमुख आहेत.)

❐ ❐

महाविद्यालयात रोज न जाता स्वतंत्रपणे अभ्यास करता यावा म्हणून विद्यापीठ विद्यार्थ्यांना खास पद्धतीने लिहिलेली पुस्तके विनामूल्य देत असते. शिवाय रविवारी अभ्यास केंद्रावर तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करतात. या ३ विद्यापीठांची ४००० हून अधिक अभ्यासकेंद्रे राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांत नामांकित महाविद्यालयात कार्यरत आहेत. तेथे त्या त्या महाविद्यालयातले प्राध्यापक मुक्त विद्यापीठाचे अभ्यासक्रम शिकवित असतात. दररोज महाविद्यालयात जायची गरज नसल्याने कुणाला नोकरी करता येते, कुणाला इतर विद्यापीठाच्या दुसऱ्या एखाद्या शिक्षणक्रमासही प्रवेश घेऊन एका पदवीच्या कालावधीत दोन पदव्या मिळविता येतात.

# विद्यापीठांचे विद्यापीठ



**डॉ. राजपाल हांडे**

मुंबई विद्यापीठ हे १८५७ साली भारतात स्थापन झालेल्या पहिल्या तीन विद्यापीठांपैकी एक अग्रगण्य आहे. मुंबई विद्यापीठाला एक महान परंपरा आहे. या परंपरेत आतापर्यंत ४६ कुलगुरूंमध्ये १८५७ मध्ये पहिले कुलगुरू सर विल्यम यार्डलीपासून आतापर्यंत विल्यम वड्सवर्थ, सर फिरोजशाह मेहता, महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे, न्यायमूर्ती एम. सी. छगला, न्यायमूर्ती काशीनाथ तेलंग, न्यायमूर्ती चिमणलाल सेटलवाड, सर बी. जे. वाडिया, न्यायमूर्ती एन. एच. भगवती, नौरोजी जहांगीर वाडिया, डॉ. पी. बी. गजेंद्रगडकर, डॉ. जॉन मथाई, प्राचार्य राम जोशी, प्राचार्य टी. के. टोपे, डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. भालचंद्र मुणगेकर ते सध्याचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर असे कुलगुरू विद्यापीठाला लाभले.

> १८५७ साली स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवला आहे. देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून या विद्यापीठाला आदर आणि सन्मान प्राप्त झाला आहे. या विद्यापीठाची थोर परंपरा आणि वारसा हा चैतन्यदायी आहे.

**दोन कॅम्पस (परिसर)**

अशी महान परंपरा असलेल्या विद्यापीठाला सध्या अस्तित्वात असलेले दोन कॅम्पस म्हणजे कलिना येथील २४३ एकरचा विद्यानगरी परिसर आणि १४ एकरचा फोर्ट मुंबई परिसर तसेच केंद्र आणि उपकेंद्र यामध्ये रत्नागिरी येथे २० एकर, ठाणे ६.५० एकर कल्याण ६.२६ एकर. विद्यापीठाचे परिक्षेत्र सावंतवाडी ते तलासरीपर्यंत विखुरले आहे. या सर्व परिसर व परिक्षेत्रात ५६ विद्यापीठ विभाग आणि ६९१ महाविद्यालये व संस्था आहेत. या सर्व महाविद्यालयांमधून जवळजवळ ७ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुंबई विद्यापीठाचे भौगोलिक कार्यक्षेत्र एकेकाळी गोव्यापर्यंत विस्तारित होते. तसेच पाकिस्तानातील कराचीमध्येसुद्धा मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालय होते. आता सध्या मुंबई विद्यापीठाचे भौगोलिक कार्यक्षेत्र सावंतवाडीपासून तलासरीपर्यंत विस्तारित आहे आणि या भौगोलिक कार्यक्षेत्रामध्ये आदिवासी, ग्रामीण, शहरी, उपनगरी, महानगरातील तसेच विदेशी विद्यार्थीदेखील शिक्षण घेत आहेत. आदिवासी व ग्रामीण परिसरातील तरुण विद्यार्थ्यांना ज्ञान सहजगत्या उपलब्ध करून देण्यासाठी मोबाइल नॉलेज रिसोर्स सेंटर हा प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. यामध्ये इंटरनेट सिस्टम सेवाही उपलब्ध असणार आहे.

**स्वतंत्र ओळख**

मुंबई विद्यापीठाने देशांतर्गत आणि देशाबाहेर आपली स्वत:ची एक ओळख निर्माण केली आहे. औद्योगिक आणि विदेशी विद्यापीठांबरोबर शैक्षणिक करार व आदानप्रदान करून विद्यापीठाने मानाचे स्थान निर्माण केले आहे. या विद्यापीठामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, विधी, व्यवस्थापन, ललितकला अशा विविध शैक्षणिक शाखा आहेत. तसेच विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती मंडळ (एनएएसी) या संस्थेकडून २००१ साली 'पंचतारांकित' आणि २०१२ मध्ये 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

**नावीन्यपूर्ण प्रकल्प**

उज्ज्वल परंपरा कायम ठेवून अलीकडच्या

## तारांगण...







मुंबई विद्यापीठाच्या मान्यवर माजी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दादाभाई नौरोजी, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाल कृष्ण गोखले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आदींचा समावेश आहे. विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधरांमध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोविंद भांडारकर, वामन आबाजी मोडक, बाळ मंगेश वागळे यांचा समावेश आहे.

काळात विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक नावीन्यपूर्ण प्रकल्प राबवले आहेत. क्रेडिट आणि ग्रेडिंग सिस्टिम पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर चालू केली आहे. पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील जवळजवळ सर्व विषयांचे अभ्यासक्रम सुधारित केले आहेत. गेल्या दोन वर्षात २५ नवीन अभ्यासक्रम चालू केले आहेत, स्वतंत्र व्यवस्थापन शाखा निर्माण केली आहे. राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शनपर तत्त्वांप्रमाणे महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याच्या धोरणामध्ये आतापर्यंत ५ महाविद्यालयांना स्वायतत्ता प्रदान करण्यात आली आहे, इतर काही महाविद्यालयांचे प्रस्ताव विचाराधीन आहेत. संशोधन क्षेत्रामध्ये विद्यापीठाची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. मुंबई विद्यापीठ शिक्षकांमध्ये संशोधनांची आवड जोपासण्यासाठी दरवर्षी जवळजवळ रु. ९० लाख ते रु. १ कोटीपर्यंत लघुप्रकल्पासाठी अनुदान देत आहे. राज्यस्तरीय संशोधन स्पर्धा 'आविष्कार'मध्ये गेल्या वर्षी मुंबई विद्यापीठाने विजेतेपद आणि यावर्षी उपविजेतेपद मिळवले आहे. विद्यापीठाची कलाक्षेत्रात आघाडी आहे. यावर्षीच्या युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने १०९ गुणाने विजतेपद पटकावून गेल्या २८ वर्षांतील स्वत:चा राष्ट्रीय उच्चांक मोडला आहे.

### क्रीडाक्षेत्राला प्राधान्य

मुंबई विद्यापीठामध्ये नॅनो सायन्स आणि नॅनो तंत्रज्ञान, ग्रीन टेक्नॉलजी, सेंटर फॉर एक्सलेन्स इन बेसिक सायन्सेस अशा नावीन्यपूर्ण संस्था कार्यान्वित आहेत. तसेच क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी मरीन ड्राइव्ह येथील मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात सिंथेटीक ॲथॅलेटिक ट्रॅक कार्यान्वित करण्याचा प्रकल्प चालू आहे. विद्यापीठाच्या कलिना संकुलात प्रथमच नव्याने बनविलेल्या मुख्य प्रवेशद्वारावर आदिवासी समाजाच्या संस्कृतीचा वारसा जोपासण्यासाठी वारली चित्रकलेच्या माध्यमातून त्यांचे वर्षभरातील जीवनदर्शन दाखवून त्यांना मानाचे स्थान देण्याचा एक प्रयत्न केला आहे.

विद्यापीठाच्या विविध माजी विद्यार्थ्यांकडून आतापर्यंत रु. ४० कोटी देणगी स्वरूपात प्राप्त झाले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय संस्था युरोपियन कमिशन, ब्रिटिश कोलंबिया सरकार, पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना, यू. एस. आर्मी डिपार्टमेंट अशा विविध संस्थांकडून जवळजवळ रु. ५ कोटींचे अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच औद्योगिक संस्था आणि रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्याकडून रु. ९ कोटींचे अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन या सर्वांकडून रु. ५० कोटींचे अनुदान प्राप्त झाले आहे. या सर्व अनुदानांचा विनियोग विद्यार्थ्यांसाठी आणि शैक्षणिक क्षेत्रातील इतर प्रकल्पांसाठी करण्यात येत आहे.

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या योजनेंतर्गत मंडणगड येथे आदर्श महाविद्यालयाची (मॉडेल कॉलेज) स्थापना करण्यात आली आहे.

### कलिना संकुलाचे सुशोभीकरण

कलिना संकुलाचे सुशोभीकरण करत असताना उद्यानविज्ञानाच्या प्रकल्पाअंतर्गत विविध फळवृक्षांची लागवड करण्यात आली आहे. विद्यानगरी कलिना संकुलाच्या सौंदर्यात भर घालणारे आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन केंद्र ही अत्याधुनिक वास्तू निर्माण करण्याचा प्रकल्प विद्यापीठाने हाती घेतला आहे. त्या संपूर्ण प्रकल्पाची किंमत २५० कोटी रुपये आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने रु. १०० कोटी देण्याचे मान्य केले आहे. आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन केंद्र हे एक जागतिक दर्जाचे संकुल असेल. यामध्ये सहा हजार प्रेक्षकांना बसण्याची व्यवस्था तसेच इतर विविध चर्चासत्र कक्ष व प्रेक्षागृह यांची व्यवस्था असेल.

### नव्या तंत्रज्ञानाचा वापर

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा घेण्यापासून निकाल **पान ५३ वर**

## महाराष्ट्रातील विद्यापीठे

| अ. क्र. | विद्यापीठ | मुख्यालय | स्थापना |
|---|---|---|---|
| १. | मुंबई विद्यापीठ | मुंबई | १८५७ |
| २. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ | नागपूर | १९२३ |
| ३. | पुणे विद्यापीठ | पुणे | १९४८ |
| ४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | औरंगाबाद | १९५८ |
| ५. | शिवाजी विद्यापीठ | कोल्हापूर | १९६२ |
| ६. | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ | अमरावती | १९८३ |
| ७. | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ | जळगाव | १९९० |
| ८. | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ | नांदेड | १९९४ |
| ९. | महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय | वर्धा | १९९७ |
| १० | कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय | रामटेक | १९९७ |
| ११. | सोलापूर विद्यापीठ | सोलापूर | २००४ |
| १२. | एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठ | मुंबई | १९५१ |
| १३. | गोंडवाना विद्यापीठ | गडचिरोली | २०११ |
| १४. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ | राहूरी | १९६८ |
| १५. | पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ | अकोला | १९६९ |
| १६. | मराठवाडा कृषी विद्यापीठ | परभणी | १९७२ |
| १७. | डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ | दापोली | १९७२ |
| १८. | पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ | नागपूर | २००० |
| १९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ | लोणेरे | १९८९ |
| २०. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | नाशिक | १९८९ |
| २१. | आरोग्य विज्ञान विद्यापीठ | नाशिक | १९९८ |

## नागरी सेवा परीक्षा

# मराठी मुद्रेचे वास्तव

**केंद्र लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षेच्या नुकत्याच जाहीर केलेल्या (३ मे, २०१३) अंतिम निकालात महाराष्ट्रातील सुमारे ८० विद्यार्थ्यांनी विविध गुणानुक्रमाने स्थान प्राप्त करत या निकालावर मराठी मुद्रा उमटवली आहे. आयोगाने यावर्षी भरती केलेल्या ९९८ जागांपैकी सुमारे ८० विद्यार्थी हे महाराष्ट्रीय आहेत. देशात १५ वा आलेला कौस्तुभ दिवेगावकर ते ९९८ वी आलेली स्नेहल भापकर अशा गुणानुक्रमे सुमारे ८० विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा परीक्षेच्या अंतिम निकालात यश प्राप्त केले आहे. गेल्या ५-६ वर्षांतील महाराष्ट्राचा निकाल पाहिल्यास आयोगाद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांपैकी सुमारे ८ ते १० टक्के जागांवर महाराष्ट्रीय विद्यार्थी पात्र होत आहेत ही बाब सकारात्मक आहे.**

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील विद्यार्थी लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षांमध्ये चांगले यश मिळवित आहे. विशेषत: मराठी माध्यम घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. वेळेचे नियोजन व त्याची प्रभावी अंमलबजावणी, अभ्यासातील सातत्य, सराव चाचण्यांद्वारे नियमितपणे केलेले स्वयंमूल्यमापन, जिद्द व मेहनतीच्या आधारेच हे विद्यार्थी या परीक्षेत यश संपादन करू शकले. अर्थात महाराष्ट्राला लाभलेला शैक्षणिक वारसा, उपलब्ध शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांची क्षमता यांचा विचार करता हे प्रमाण आणखी वाढले पाहिजे यात शंका नाही. त्यासाठी विद्यार्थी-पालक, शिक्षण संस्था-विद्यापीठे, प्रकाशन संस्था, प्रसार माध्यमे आणि मार्गदर्शक संस्था अशा सर्व स्तरावर आणखी नेमके प्रयत्न हाती घेणे गरजेचे आहे. तथापि



**तुकाराम जाधव**

यावर्षी अंतिम यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांचे यश योग्यरीत्या लक्षात घेऊन त्याचे विश्लेषण केल्यास भारतीय प्रशासनातील मराठी टक्का वाढण्यास हातभार लागेल हे नक्की!

दरवर्षी अंतिम यादीत झळकणारे विद्यार्थी आय.ए.एस., आय.एफ.एस. आय.पी.एस., आय.आर.एस. (आय.टी व कस्टम्स), आय.आय.टी.एस., आय.आर.टी.एस. अशा त्या-त्या वर्षी भरल्या जाणाऱ्या सुमारे १७-१८ विविध पदांसाठी निवडले जातात. प्रत्येक विद्यार्थी आपल्याला हव्या असणाऱ्या आयएएस, आयएफएस अथवा आयपीएस पदासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत असतो, यात शंका नाही. अर्थात प्रत्येकालाच ही पदे प्राप्त होतात असे नाही. त्यामुळे पुढील रँक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर सेवा बहाल केल्या जातात. तथापि, विद्यार्थ्यांनी त्यामुळे निराश वा नाराज होण्याचे कारण नाही. कारण या परीक्षेद्वारे भरली जाणारी सर्व पदे त्या-त्या विभाग, क्षेत्रात महत्त्वपूर्ण असतात आणि त्याद्वारे पदोन्नती, आव्हानात्मक कार्य आणि विविध पद्धतीने सार्वजनिक हीत व सामाजिक विकासात योगदान देण्याची उत्तम संधी प्राप्त होते. त्यामुळे आयएएस जरी मिळाले नाही तरी आपल्याला प्राप्त झालेल्या सेवेद्वारा मोठी संधी प्राप्त होते हे लक्षात घेतले पाहिजे.

गेल्या ८-१० वर्षांतील यूपीएससी परीक्षेच्या यशातील महाराष्ट्राचा आलेख हा आशादायी आहे यात शंका नाही. विशेषत: या क्षेत्राची करिअर म्हणून निवड केलेल्या व याकडे नव्याने वळू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, ही बाब सकारात्मक मानावी लागते. या परीक्षेसंबंधी उपलब्ध झालेले मार्गदर्शन, वरिष्ठ, यशवंतांच्या मार्गदर्शनाची परंपरा, संदर्भ साहित्याची वाढणारी उपलब्धता, त्यातही मराठी भाषेतून दर्जेदार मार्गदर्शन व संदर्भ साहित्याची निर्मिती, परीक्षेतील यश, विशेषतः बहुजन, ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांचे यश आणि या सर्व बाबींमुळे समाजात प्रशासकीय सेवेतील करिअरविषयी निर्माण होणारी जागृती इ. घटकांमुळे विद्यार्थी या क्षेत्राचा विचार करत आहेत. या संदर्भात आणखी एक लक्षणीय बाब म्हणजे २००५ नंतर वाढलेली पदांची संख्या. खाजगी क्षेत्रात २००९ पासून चालू असलेल्या मंदीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक नोकऱ्यांचे वाढलेले हे प्रमाण नक्कीच महत्त्वाचे आहे.


### पहिल्या प्रयत्नात यशस्वी

या वर्षीच्या यशस्वी विद्यार्थ्यांपैकी १०पेक्षा अधिक विद्यार्थी पहिल्या प्रयत्नातच यशस्वी झाले आहेत. ही निकालासंदर्भातील दुसरी महत्त्वाची बाब होय. गेल्या काही वर्षात पहिल्या प्रयत्नातच यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत आहे. स्पर्धा परीक्षेविषयी पदवीकाळातच उपलब्ध होणारी माहिती, यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, मार्गदर्शक संस्थांचे साहाय्य, पदवी काळापासूनच परीक्षेच्या तयारीची सुरुवात इत्यादी घटकांमुळे, गेल्या वर्षी देशात १० वा आलेला अमृतेश औरंगाबादकर असो की, या वर्षीचे चिन्मय पंडित, अजिंक्य काळे, प्रसन्न दातार, ओमकार मोघे, तृप्ती शर्मा, पियुषा जगताप इ. विद्यार्थी असो, या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध तयारीच्या आधारे पहिल्या प्रयत्नातच यश मिळवले आहे. नियोजनबद्ध व नेमक्या अभ्यासाच्या आधारे पहिल्या प्रयत्नात आणि २१ व्या वर्षी या परीक्षेत

Union Public Service Commission UPSC

# मराठीतून परीक्षा

मराठी माध्यमातून परीक्षा देऊन पहिल्या शंभर आणि विशेषतः पन्नास क्रमांकात येणे अशक्य आहे, असा एक समज महाराष्ट्रात बऱ्याच काळापासून रूढ होता. खरेतर भूषण गगराणी यांच्यानंतर अगदी अलीकडील उदाहरण घ्यायचे तर अजित जोशी (गुणानुक्रम २७), शीतल उगले (गुणानुक्रम ३७) आणि बालाजी मंजुळे (गुणानुक्रम ५६) यांनी मराठी माध्यमातून परीक्षा लिहून पहिल्या पन्नासात येण्याचा मान मिळवला. यावर्षी कौस्तुभ दिवेगावकर याने मराठी माध्यमातून परीक्षा लिहून देशात १५ वा क्रमांक प्राप्त केला. त्याशिवाय यावर्षीच्याच योगेश निरगुडे, प्रतीक ठुबे, हरेश्वर स्वामी, वैभव ढेरे, वैशाली पतंगे, वैभव अलदर, सुनील अगवणे यांनी मराठीतून परीक्षा देऊन यश संपादन केले आहे. ही बाब मराठीतून तयारी करणाऱ्या आणि मराठीतून परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. वस्तुतः आपण कोणत्या भाषेतून परीक्षा देत आहोत यापेक्षा आपली तयारी कशी आहे? आपण कोणत्या दर्जाचे संदर्भसाहित्य वाचत आहोत? आणि महत्त्वाचे म्हणजे प्रभावी लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी लेखनाचा किती सराव करत आहोत? या बाबी महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे मराठी माध्यमातून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जे चांगले संदर्भ साहित्य मराठीतून उपलब्ध आहे, त्याबरोबरच इंग्रजीतील संदर्भ पुस्तके वाचावीत आणि तयारीचा दर्जा सुधारण्यावर भर द्यावा. असे केल्यास तयारीचा दर्जा उंचावेल. त्यामुळे मराठी माध्यमातून लिहून देखील चांगला गुणानुक्रम प्राप्त करता येईल.



यशस्वी होता येते, हे सिद्ध केले आहे. महाराष्ट्रात या परीक्षेविषयी जाणीव-जागृती वाढल्यामुळे या परीक्षेविषयी पूर्वी असणारे अनेक गैरसमज, न्यूनगंड दूर झाल्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने या परीक्षेकडे वळत आहेत.

### दुसऱ्या प्रयत्नातले यश

दुसऱ्या प्रयत्नात यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत आहे. पहिल्या प्रयत्नात यश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना अपेक्षित गुणानुक्रम आणि पद मिळतेच असे नाही. त्यामुळे असे विद्यार्थी पुन्हा परीक्षा देतात आणि दुसऱ्या प्रयत्नात अपेक्षित गुणानुक्रम व पद प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर काही विद्यार्थी पहिल्या प्रयत्नात मुलाखतीपर्यंत जाऊनदेखील अंतिम यादीत स्थान प्राप्त करू शकत नाहीत. असे विद्यार्थीही दुसऱ्या प्रयत्नात जोमाने तयारीला लागतात. तर असंख्य विद्यार्थी पहिल्या प्रयत्नातील अपयशामुळे दुसऱ्या प्रयत्नावर विशेष लक्ष केंद्रीत करतात. यावर्षी देशात १५ वा आलेला कौस्तुभ दिवेगावकर, ९८ वी आलेली मृण्मयी जोशी, प्रतीक ठुबे (२४८) ही अशा उमेदवारांची प्रातिनिधिक उदाहरणे मानता येतात. यामुळे दुसऱ्या प्रयत्नात यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचेही प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. एका बाजूला बरेच विद्यार्थी २२-२३ व्या वर्षीच यशस्वी होत आहेत, तर, दुसऱ्या बाजूला, ही बाब नव्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणारी ठरत आहे.

### मुलींची वाढती संख्या

यूपीएससीच्या अंतिम निकालात मुलींची वाढणारी संख्या हा पुढील महत्त्वाचा घटक ठरतो. महाराष्ट्राचा विचार करता बराच काळ, अनेक कारणांमुळे प्रशासकीय सेवा क्षेत्राकडे वळणाऱ्या मुलींचे प्रमाण फारच कमी होते. अजूनही ते पर्याप्त प्रमाणात वाढलेले नाही. तथापि गेल्या काही वर्षात एकंदर देश आणि राज्य पातळीवर किमान काही मुली यूपीएससी परीक्षेत यशस्वी होऊ लागल्यामुळे आता हे क्षेत्र मुलींसाठीही आकर्षण केंद्र ठरू पाहत आहे. त्यादृष्टीने विचार करता यावर्षी देशात २९ वी आलेली क्षिप्रा आग्रे, नम्रता गांधी (४२), श्रुती ओझा (८२), मृण्मयी जोशी (९८), नेहा देशपांडे (२०४), मोनिका पांडे (३७२), वैशाली पतंगे (४६९), प्रिया जाधव (५१५), तृप्ती शर्मा (६४७), दीपिका तांगडकर (७०८), पियुषा जगताप (७६२), स्नेहल भापकर (९९८) या विद्यार्थिनींचे यश महत्त्वपूर्ण मानावे लागेल.

### प्रतिकूल परिस्थितीतील यश

दरवर्षीप्रमाणे या वर्षी अतिशय प्रतिकूल सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमीतून येऊन सुद्धा काही विद्यार्थ्यांनी यूपीएससी परीक्षेत निर्भेळ यश प्राप्त केल्याचे दिसून येते. विनोदकुमार गायकवाड (२०६), योगेश निरगुडे (१३०), हरेश्वर स्वामी (३३२), सुनील आगवणे (८२८), मोतीलाल शेटे (६५१) आणि विश्वास जाधवर (९९५) या विद्यार्थ्यांचे यश नव्या उमेदवारांसाठी प्रेरणादायी आहे. ही बाब प्रतिकूल सामाजिक-आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरते.

### आव्हानात्मक संधी

प्रशासकीय सेवा परीक्षेकडे आव्हानात्मक संधी या दृष्टिकोनातून पाहणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय दिसून येते. त्यामुळेच आपले स्थिर झालेले करिअर सोडून जाणीवपूर्वक प्रशासकीय सेवेकडे वळणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. एका बाजूला अभियांत्रिकी व वैद्यकीय पदवी शिक्षण घेऊन त्या क्षेत्रात करिअर न करता सनदी सेवांचा मार्ग निवडणारे अनेक विद्यार्थी आहेत. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रात उच्च पदावर नोकरी करणारे अनेक उमेदवार समांतरपणे या परीक्षांची तयारी करत आहेत. तर दुसऱ्या बाजूला १२ वी नंतर जाणीवपूर्वक कला शाखेची निवड करून उपलब्ध वेळ यूपीएससीच्या तयारीसाठी वापरणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. त्याचप्रमाणे इतर शाखेत पदवी शिक्षण घेतानाच यूपीएससीची तयारी

करणारे बरेच विद्यार्थी दिसून येतात. सनदी सेवांच्या भरतीत झालेली वाढ, खाजगी क्षेत्रातील मंदी, प्रशासकीय सेवांचे आव्हानात्मक स्वरूप, त्याद्वारे विविध विभाग व पदांवर कार्य करण्याची मिळणारी संधी; शासकीय पदांबरोबर येणारी सत्ता व प्रतिष्ठा; त्याद्वारे समाजात सकारात्मक हस्तक्षेप करण्याची मिळणारी संधी; सद्य:स्थितीत प्रभावी व कार्यक्षमपणे कार्य करणाऱ्या अधिकारी व्यक्तींकडून मिळणारी प्रेरणा इ. अनेक घटकांमुळे अनेक उमेदवार नागरी सेवांकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होताना दिसत आहेत.

**सुधारणेस वाव**

अर्थात नागरी सेवा परीक्षांच्या प्रस्तुत निकालात महाराष्ट्राचे स्थान लक्षात घेता सुधारणेस वाव आहे. पहिल्या शंभर क्रमांकात किमान १० विद्यार्थी तरी महाराष्ट्रातील असावेत. प्रशासकीय सेवेत मराठी मुलींचेही प्रमाण आणखी वाढले पाहिजे. मुस्लीम-दलित-आदिवासी समूहातील विद्यार्थ्यांचेही प्रमाण वाढणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे अंतिम यादीतील एकूण मराठी विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा अधिक झाली पाहिजे. यासाठी उपरोक्त भागात म्हटल्याप्रमाणे अनेक पातळ्यांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. २०११ मध्ये पूर्वपरीक्षेच्या स्वरूपात झालेला बदल आणि आता २०१३ पासून मुख्य परीक्षेत झालेला बदल, या दोन्ही बाबी लक्षात घेऊन अभ्यासाचे नवे धोरण स्वीकारावे लागेल.



**अभ्यास-धोरण**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करताना नेमके 'अभ्यास-धोरण' ठरवणे महत्त्वाचे असते. या परीक्षांकडे वळणारे विद्यार्थी वेगवेगळ्या स्वरूपात या परीक्षांच्या अभ्यासपद्धतीविषयी ऐकत असतात, वाचत असतात. काही प्रसंगी भिन्न-भिन्न स्वरूपाची तर कधी विसंगत माहिती पुढे येते. अशा स्थितीत या परीक्षेचे स्वरूप, स्वत:ची शैक्षणिक स्थिती, व्यक्तिमत्त्वातील गुण-दोष; स्वत:तील कच्चे दुवे व बलस्थाने आणि या परीक्षेच्या तयारीसाठी




लागणारा वेळ या सर्व घटकांचा विचार करून स्वत:ची अभ्यास पद्धती विकसित करावी. अर्थात यासाठी पुढील महत्त्वपूर्ण पायऱ्या मूलभूत मानून अभ्यासाचे धोरण ठरवावे. सर्वप्रथम या परीक्षेतील पूर्व, मुख्य व मुलाखत या टप्प्यांचे स्वरूप सखोलपणे जाणून घ्यावे. प्रत्येक टप्प्याचे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर संपूर्ण परीक्षेचा अभ्यासक्रम बारकाईने अभ्यासावा. आयोगाच्या मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून प्रत्येक अभ्यासघटकांच्या तयारीची व्याप्ती व दिशा ठरवावी. प्रश्नांच्या विश्लेषणाद्वारेच आपल्या तयारीत परीक्षाभिमुखतेची हमी देता येते हे कायम लक्षात ठेवावे. त्यानंतर प्रत्येक विषयासाठी एनसीईआरटी ते अधिकृत संदर्भ पुस्तक अशी संदर्भ साहित्याची जमवाजमव करावी. शेवटी वेळ आणि अभ्यासाचे नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर द्यावा. हे सर्व करताना यूपीएससी परीक्षेचे स्वरूप आणि त्या परीक्षेची गरज काय आहे हे पद्धतशीररीत्या लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**सामान्य अध्ययनाचे महत्त्व**

२०१३ पासून यूपीएससीने मुख्य परीक्षेत महत्त्वपूर्ण बदल करून सामान्य अध्ययन या विषयाचे महत्त्व निर्णायकरीत्या वाढवले आहे. स्वाभाविकच आपल्या तयारीचा मुख्य रोख सामान्य अध्ययनावर असणे अपेक्षित आहे. त्यासाठी एका बाजूला सामान्य अध्ययनाच्या तयारीची व्याप्ती वाढवावी लागणार तर दुसऱ्या बाजूला प्रभावी व नेमक्या लिखाणाचा भरपूर सरावही करावा लागणार. याबरोबरीने निबंध आणि वैकल्पिक विषयांकडे योग्य लक्ष दिले जाईल, याचीही काळजी घ्यावी लागणार. महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न निव्वळ माहितीप्रधान नव्हे तर, विश्लेषणात्मक असणार हे लक्षात ठेऊन आपल्या तयारीची दिशा आखावी. नव्या बदलांचे स्वरूप लक्षात घेऊन समर्पक अभ्यास धोरण विकसित करण्यावर जोर दिल्यास अपेक्षित यश प्राप्त करणे सुलभ जाईल.

संपर्क : ९७६५९२३३४४
Email:admin@theuniqueacademy.com

पान ५० वरून

## विद्यापीठांचे विद्यापीठ

लागेपर्यंत वेगवेगळ्या विभागात आमूलाग्र बदल घडवून आणण्यात येत आहे. त्यामध्ये परीक्षा आणि नावनोंदणी अर्ज ऑनलाइन करणे, प्रश्नपत्रिका वेबलिंक मार्फत पाठविणे, तसेच ओएमआर बारकोड पद्धती अंमलात आणलेली आहे. जवळजवळ ४५% परीक्षा विभाग हा माहिती व तंत्रज्ञानांवर आधारित आहे. परीक्षेचे पेपर तपासण्यासाठी केंद्रांची संख्या वाढवण्यात आली आहे.

**मुक्त शिक्षण विभाग**

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त शिक्षण विभागात जवळजवळ ८५,००० विद्यार्थी शिकत आहेत. दूर व मुक्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश व नावनोंदणी प्रक्रिया राबवण्यात आली आहे. भविष्यकाळामध्ये विद्यापीठाच्या भावी योजनांमध्ये अमेरिकेतील इलिनॉयस विद्यापीठाच्या सहकार्याने प्रकल्प राबवण्यात येणार आहे. ऊर्जा अंकेक्षन (एनर्जी ऑडिट) सौरऊर्जा, हरित परिसर प्रकल्प आदी प्रकल्पही राबवण्यात येतील. महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय शिबिरे/परिषदासाठी वित्तीय साहाय्य,व्याख्यानमाला, चीन सरकार पुरस्कृत कन्फ्यूशियस इंस्टिट्यूट, विद्यार्थिनींना स्वसंरक्षणार्थ प्रशिक्षण, विद्यापीठीय शिक्षकांना संशोधनात्मक पुरस्कार, इनोवेशन क्लब आणि IPR, संस्कृत भाषेसाठी मोबाइल डिक्शनरी, मुनीजन (MUNISAN) इत्यादी प्रकल्पांचा समावेश आहे. आय.आयटी.च्या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मदतीने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक क्लब स्थापन करणे. तसेच इलिनोएस यूनिवर्सिटी यू.एस.ए., डिकन यूनिवर्सिटी ऑस्ट्रेलिया, एडिथ कोवान युनिवर्सिटी ऑस्ट्रेलिया, आथाबास्का युनिवर्सिटी, कॅनडा, युनिसा साऊथ आफ्रिका अशा अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यात आले. अशा प्रकारे तऱ्हेने वैविध्यपूर्ण वाटचाल मुंबई विद्यापीठ करीत आहे.

# तंत्राच्या कोंदणातील प्रतिभा

## जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सने घडविलेल्या चित्रकार/शिल्पकारांच्या कलाकृतीचा आलेख

राज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या जे. जे. स्कूल आर्ट्सने कला शिक्षणाच्या क्षेत्रात आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. या संस्थेतून कलेचे तंत्र आणि कौशल्य हस्तगत केलेले अनेक चित्रकार, कलादिग्दर्शक, मूर्तिकार यांनी अजरामर अशा कलाकृती घडवल्या आहेत. या संस्थेच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने दादासाहेब फाळके, शिल्पकार गणपतराव म्हात्रे, विनायकराव करमरकर, शिल्पकार नारायणराव सोनवडेकर, कलादिग्दर्शक एम. आर. आचरेकर, प्रमोद आणि विनोद गुरुजी बंधू, ए. ए. भोंसुले, चित्रकार गोपाळ देऊसकर, मुरलीधर आचरेकर, शंकर पळशीकर, वासुदेव गायतोंडे यांचा आदराने उल्लेख करावा लागेल.

**श्रीराम खाडिलकर**




प्रतिभा शिकवून येत नाही, ती जन्मजातच असावी लागते. कल्पनेचंही असंच आहे. कल्पना विकत किंवा भाड्यानं अजून कुठे मिळत नाहीये. याच पार्श्वभूमीवर तंत्र मात्र शिकून आत्मसात करता येतं. याच कारणामुळे दृश्यकला हा विभाग महाराष्ट्रात तंत्रशिक्षण खात्याच्या अखत्यारीत आणला गेला असला पाहिजे.

कल्पकतेला प्रतिभेची आणि तंत्राची जोड मिळाली म्हणजे काय घडतं याचे काही दाखले पाहिले तर महाराष्ट्रातली कलानिर्मिती खऱ्या अर्थानं प्रत्येकासाठी अभिमानास्पद आहे असंच म्हणावं लागेल.

### महाराष्ट्राची मिरासदारी

मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये चित्रकलेचं शिक्षण घेतलेले दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक ठरले. कारण कला आणि तंत्र यांची ते उत्तम सांगड घालू शकले. युरोपियन शिल्पकारांवर मात करण्याची क्षमता असलेले आणि स्वत:च्या शिल्पनिर्मितीच्या माध्यमातून ते सिद्ध करून दाखवलेले शिल्पकार म्हणून गणपतराव म्हात्रे यांचं नाव घ्यावंच लागेल. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत असताना घरी बसून गणपतराव म्हात्रे यांनी 'टू द टेंपल' म्हणजेच 'मंदिर पथगामिनी' या नावाचं शिल्प घडवलं. त्या शिल्पातली स्त्रीची नजाकत, कोवळ्या वयातल्या स्त्रीच्या चेहऱ्यावरचा गोडवा, मंदिरात पूजेला जाताना तबकात असलेली



पूजेची तयारी, दुसऱ्या हातात तिनं किंचित वाकडं धरलेलं पाण्याचं भांडं एक पाऊल जमिनीपासून किंचित वर उचलायला सुरुवात केल्याचं सूचन होणारी पाऊलाची स्थिती या सगळ्याच गोष्टी वास्तवाशी जवळीक साधणाऱ्या आहेत.


### छत्रपती शिवरायांचं अश्वारूढ शिल्प

भारतीय शिल्पकारांमध्ये विनायकराव करमरकर हे ठळक नाव आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्येच शिक्षण घेतलेले मेयो पदकाचे मानकरी ठरलेले करमरकर नंतर युरोपात जाऊन शिल्पनिर्मितीशी संबंधित अधिक ज्ञान संपादन करून आले. शिल्पकार विनायकराव करमरकरांना छत्रपती शिवरायांचं अश्वारूढ शिल्प घडवण्याची संधी मिळाली तेव्हा त्यांनी भल्या-भल्यांना अजिबात झेपणार नाही अशी करामत करून तेरा फूट उंचीचे हातात तलवार असलेले अश्वारूढ शिवरायांचे शिल्प ब्रॉन्झमध्ये ओतकाम करून एकसंध पुतळा घडवला. हे ओतकाम त्यांनी स्वत:च्या देखरेखीखाली मुंबईतल्या फाऊंड्रित केलं. वास्तविक एक शिल्प घडवण्यासाठी त्याच्या अनेक तुकड्यांचे स्वतंत्र ओतकाम करून मग ते सगळे तुकडे जोडले जातात. त्या पार्श्वभूमीवर करमरकरांनी एकही तुकडा न जोडता एकसंध ओतकामातून साधलेली किमया थक्क करणारी ठरली. पुण्यातल्या प्रिप्रेटरी स्कूलच्या मैदानात आज हे शिल्प आपल्याला पाहायला मिळतं. शिल्पकार करमरकर यांच्याच हातून साकार झालेली बरीच शिल्प आज मुंबईत दिसतात. त्यातलं एक जहांगीर आर्ट गॅलरीत सर कावसजी जहांगीर यांचं आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या वास्तूजवळ असलेलं जस्टिस मुल्ला यांचंही शिल्प करमरकरांनीच घडवलं आहे. प्रभादेवीची पु. ल. देशपांडे कलाअकादमी ज्या रवींद्र नाट्य मंदिर या नाट्यगृहाला लागून उभी आहे त्या रवींद्रमध्ये प्रवेश केल्यावर समोरच दिसणारं रवींद्रनाथ टागोरांचं शिल्प करमरकरांनीच घडवलं आहे

तेही सिमेंट या माध्यमात. शिल्पकार नारायणराव सोनवडेकर हे सुध्दा स्कूल ऑफ आर्टमध्येच शिकले होते आणि तिथंच शिल्पकला विभागात कलाशिक्षक म्हणून कामही करत होते. सोनवडेकरांनी कन्याकुमारी इथं असलेलं आणि जगप्रसिध्द झालेलं स्वामी विवेकानंदांचं शिल्प घडवून स्वत:च्या प्रतिभेची साक्ष दिली. सोनवडेकरांनी महाराष्ट्र विधान भवनासमोरच आज दिसत असलेलं महात्मा फुले यांचं शिल्पही घडवलं आहे.

### तंत्राची जोड

कलादिग्दर्शनाचाच विषय निघालाय म्हणून आणखी एक उदाहरण देता येईल. बनगरवाडी या मराठी चित्रपटाची निर्मिती होत होती. बनगरवाडीमध्ये जी नाणी आपल्याला काही सीनमध्ये पैशांची देवाण-घेवाण करण्याच्या निमित्तानं काही प्रसंगांमध्ये दिसतात ती या चित्रपटासाठी खास बनवून घेतली होती. याचं श्रेय कलादिग्दर्शक प्रमोद आणि विनोद या गुरुजी बंधूंना द्यावं लागेल. हे दोघंही आर्टस्कूलचेच विद्यार्थी आहेत. वातावरणनिर्मिती करण्यासाठी कलेला तंत्राची जोड कशी द्यायची हे त्यांनाही समजलेलं होतं.



आर्ट स्कूलमध्येच उपसंचालक या पदावर काहीकाळ काम केलेले चित्रकार गोपाळ देऊसकर यांनी असंख्य उत्तमोत्तम कलाकृती चितारल्या. पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिरात असलेली बालगंधर्व यांची दोन चित्रे देऊसकरांनीच घडवलेली आहेत आणि त्यातल्या स्त्रीरूपातल्या बालगंधर्वांच्या पैठणीचा काठ आपल्याला जरीचा दिसतोय. प्रत्यक्षात जवळ जाऊन न्याहाळल्यावर आपल्या लक्षात येईल की तिथं सोन्याचा रंग अजिबात वापरलेला नसून हिरव्या आणि पिवळ्या रंगाच्या छटांचं अफलातून आयोजन असं काही भन्नाट केलं गेलंय की तो काठ सोनेरी जरीकाम असलेला आहे असा आपल्याला भास होतो. कोणतं तंत्र कसं वापरायचं याचं ज्ञान आवश्यक असतं ते याचसाठी.

काही कलाकारांचं चित्रणतंत्र विलक्षण होतं. अशक्य गोष्टी त्यांनाच कसं शक्य व्हायच्या असा प्रश्न उभा राहतो. याच संदर्भातलं चित्रकार शंकर पळशीकर यांनी केलेलं आणि रवींद्र नाट्यमंदिरात पूर्वी असलेलं आणि सध्या तिथं दिसत नसलेलं विष्णुदास भावे यांचं एक व्यक्तिचित्र आहे. त्यात पळशीकरांनी चेहऱ्याच्या काही भागात राखाडी छटांचा वापर केला. हा रंग वापरण्यातलं त्यांचं कौशल्य इतकं सुंदर होतं, की अंगकांतीचाच तो रंग असावा असं त्या राखाडी रंगाचा वापर केलेला असूनही भासत होतं.

मुद्राचित्रण हे असंच एक वेगळं तंत्र आहे. हे तंत्र जर नीट जमलं तर कलेची अभिव्यक्ती उत्तम होऊ शकते. याच तंत्रात कलानिर्मितीच्या शक्यता आजमावून पाहता याव्यात म्हणून जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये ग्रॅफिक्ससाठी स्वतंत्र विभाग उघडला गेला. याचं श्रेय यज्ञेश्वर शुक्ल यांना द्यावं लागेल. त्यांच्यानंतर हा विभाग जोपासला तो वसंतराव परब यांनी.

खडकवासला आणि आरे गौळीवाडा इथली भित्तीचित्रं, तसंच बालभवनचा कलात्मक दरवाजा ही काहीवर्षांपूर्वी जेजेतल्याच कलाशिक्षकांनी विद्यार्थीवर्गाला मदतीला घेऊन केलेली कामे आहेत. त्यातल्या कलामूल्यांना आव्हान देता येणार नाही, हे निश्चित, कारण कलेचं मोल आणि तंत्राचं महत्त्व त्यांना नेमकं कळलं होतं.

### परंपरागत समृद्धी

विचारांच्या बदलत्या दिशा त्याच बरोबर अव्यक्त आणि अनुभव न घेतलेल्या गोष्टीच्या विचारांबद्दलची विस्तारित रूपं कधीकधी अमूर्त आणि अगम्य आकारांच्याच बरोबरीनं कातरत्या रंगछटांच्या साथीनं वासुदेव गायतोंडेंसारख्या कलाकाराच्या एखाद्या कॅनव्हासवर येतात, तेव्हा स्तिमित होण्याशिवाय पर्यायच नसतो, कारण त्या प्रत्येक कॅनव्हासवरचा दृश्यानुभव हा आपल्यासाठी पहिलटकरिणीसारखा असतो. त्यातले रंग अर्थपूर्ण असतात. तशी कलाकृती परत करायची झाली तर तसं शक्य नसतं. कारण चित्रणाचं तंत्र अवगत असलं तरीही त्यात प्रतिभा आणि कल्पकताही सामावलेली असते. जोवर प्रतिभा आणि कला यांचं स्वातंत्र्य अबाधित आहे तोवरच त्यांचं तंत्राच्या बरोबर असण्याला अर्थ आहे.

❒ ❒



## त्रिंदाद: रेम्ब्रा ऑफ द इस्ट

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये सुरुवातीपासून अधिकारपदावर प्रामुख्यानं ब्रिटिशच होते. तैलरंगाच्या वापरातून व्यक्तिचित्रण करण्याचे तंत्र ब्रिटिशांकडूनच आपल्या भारतीय कलाकारांनी आत्मसात केलं. हे तंत्र शिकवलं ब्रिटिशांनी, पण भारतीय अंगकांतीच्या रंगछटा तैलरंगात चित्रामध्ये दाखवण्याचं कसब साधलं ते केवळ स्कूल ऑफ आर्टमध्ये आधी विद्यार्थी म्हणून आणि नंतर कलाशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या ॲन्टोनिओ झेविएर त्रिंदाद यांना. एकाही ब्रिटिशाला हे कसब साध्य झालं नाही म्हणून तर त्रिंदाद यांचा उल्लेख रेम्ब्रा ऑफ द इस्ट असा मोठ्या कौतुकानं केला जातो. त्यांच्या या चित्रणातल्या वैशिष्ट्याचं दर्शन आपल्याला घडतं ते त्यांनी रंगवलेल्या कवेत घडा घेतलेल्या आणि नऊवारी साडी नेसलेल्या मराठमोळ्या स्त्रीच्या चित्रणात. स्कूल ऑफ आर्टच्या संग्रहातल्या दुर्मीळ कलाकृतींमध्ये आज ती आहे.

## सॉलोमन साहेब

स्कूल ऑफ आर्टच्याच संग्रहात असलेलं ए. ए. भोंसुले मास्तरांनी काढलेलं सॉलोमन साहेबाचं एक व्यक्तिचित्रही आहे. त्यात पांढऱ्या रंगाचा आणि अर्थातच उजळ रंगछटांचा मोठ्या सफाईनं वापर केला आहे. अशा रंगछटांमधल्या व्यक्तिचित्राचं निरीक्षण केल्यावर रंगांचे अत्यंत पातळ थर दिले गेलेले दिसतात.



# दृष्टिक्षेपात

# उच्च व तंत्रशिक्षण




इयत्ता १२ वी ( उच्च माध्यमिक शिक्षण) पूर्ण केल्यानंतर राज्यात पुढील शिक्षणासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतात. साधारणत: २५ टक्के विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकडे प्रवेश घेतात. उर्वरित ७५ टक्के विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान, विधी शाखेमध्ये प्रवेश घेऊन पुढील शिक्षण घेतात. उत्तीर्णांपैकी जास्त प्रमाणात कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ होत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने उच्च शिक्षणाच्या सोयी व दर्जामध्ये वाढ करण्याच्या हेतूने सन १९८४ सालापासून शालेय शिक्षण विभागापासून उच्च शिक्षण हा विभाग वेगळा केला.

उच्च शिक्षण विभागाचे स्वतंत्र कार्यालय हे शासकीय मध्यवर्ती इमारत (जुनी) येथे पहिल्या मजल्यावर पुणे स्टेशन जवळ, पुणे -१ येथे कार्यरत आहे. उच्च शिक्षण या संज्ञेत अकृषी विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक इत्यादी महाविद्यालयाचा समावेश असून त्याद्वारा पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम शिकविले जातात. उच्च शिक्षण संचालनालय हे महाराष्ट्रातील सर्व उच्च शिक्षण संस्थासाठीचे मुख्य कार्यालय म्हणून काम करते. या संचालनालयावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे कार्य मंत्रालयातील उच्च व तंत्रशिक्षण विभाग या प्रशासकीय विभागामार्फत केले जाते.

संचालनालयाच्या वतीने विभागीय स्तरावर दहा

उच्च शिक्षण सचांलनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतिगृहे.

महाराष्ट्र राज्यात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठांशी संलग्नित उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांचे खालील चार भागात वर्गीकरण करण्यात येते.

| अ.क्र. | महाविद्यालयाचा प्रकार | अनुदान स्थिती | संख्या |
|---|---|---|---|
| १. | शासकीय महाविद्यालये व संस्था | पूर्णत: शासकीय व अनुदानित | ३२ |
| २. | अशासकीय अनुदानित महाविद्यालये | अनुदानित | ११५३ |
| ३. | अशासकीय विना अनुदानित महाविद्यालये | विनाअनुदान | ०९ |
| ४. | अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालये | कायम विनाअनुदानित तत्त्वावर | २०३२ |
| | एकूण | | ३२२६ |



## शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतिगृहे



| | | | |
|---|---|---|---|
| शासकीय अध्यापक महाविद्यालये | १२ | शासकीय विज्ञानसंस्था | ०३ |
| शासकीय कला महाविद्यालये | ०६ | शासकीय वसतिगृहे | ०२ |
| शासकीय वाणिज्य महाविद्यालये | ०२ | आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे वसतिगृहे | ११ |
| न्यायसाहाय्यक विज्ञानसंस्था | ०३ | एकूण महाविद्यालये व संस्था | ३२ |
| शासकीय विधी महाविद्यालये | ०१ | ई.बी.सी. वसतिगृहे | ११ |
| प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण संस्था | ०३ | एकूण | ८६ |

उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या गुणवान व पात्रताधारक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाकडून खालील शिष्यवृत्त्या प्रदान केल्या जातात.




| **शिष्यवृत्तीचा प्रकार** | **एकूण** |
|---|---|
| राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२०८ |
| गणित व भौतिकशास्त्र विषयांतील शिष्यवृत्ती | १०० |
| शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | ८० |
| राज्य शासनाची दक्षिणा व अधिछात्रवृत्ती | ७६ |
| गुणवान विद्यार्थ्यांना साहाय्य. | २०८ |
| महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर स्किम ऑफ स्कॉलरशिप. टीप : (राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना एप्रिल २००७ पासून बंद करण्यात आली आहे.) | ७४१७ |
| हिंदी भाषेतील मॅट्रिक नंतरच्या अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती | २५५ |
| अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना | ५,१८९ |

## अर्थसाहाय्य

विद्यापीठ, महाविद्यालयातील शिक्षकांना परदेशात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदा, शिबिरे, संमेलने यांना उपस्थित राहण्यासाठी अर्थसाहाय्य योजना- सन १९८०-८१ या आर्थिक वर्षापासून विद्यापीठ किंवा विद्यापीठाशी संलग्नीत शासकीय/अशासकीय महाविद्यालयातील एक शिक्षक याप्रमाणे परदेशी जाणाऱ्या शिक्षकांना प्रवास खर्चाच्या ५० टक्के अर्थसाहाय्य अधिक आमंत्रित देशात राहण्याचा व जेवणाचा खर्च जास्तीत जास्त रुपये १०,०००/- इतके अनुदान देण्यात येते.

## प्रकाशने

| **समितीचे नांव** | **कार्य** |
|---|---|
| ▮ लोकसाहित्य समिती | महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागात लोकसाहित्य, लोकनृत्ये आणि लोकगीते जमा करून तज्ज्ञांद्वारा पुस्तके तयार करणे. |
| ▮ डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रकाशित, अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन |
| ▮ महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती | महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन |
| ▮ राजर्षी छत्रपती शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन |




उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षक तसेच मुलींच्या सबलीकरणासाठी व त्यांच्या उद्धारासाठी निस्पृहपणे कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना प्रतिवर्षी रोख रक्कम, शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र देऊन गौरविले जाते.

महिला सबलीकरणासाठी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये 'जागर जाणिवांचा' अभियानांतर्गत राज्य, विद्यापीठ व जिल्हा स्तरावर रोख रक्कम, प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह देवून गौरविले जाते. २०१२-१३ पासून 'जागर जाणिवांचा' हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

| **पुरस्काराचे नांव** | **संख्या** |
|---|---|
| महाकवी कुलगुरु कालीदास संस्कृत साधना पुरस्कार | ०८ |
| राज्य शिक्षक पुरस्कार | १३ |
| सावित्रीबाई फुले पुरस्कार | ०६ |
| जागर जाणिवांचा अभियान अंतर्गत पुरस्कार | |
| (अ) जिल्हास्तरीय (प्रथम व द्वितीय) | ७० |
| (ब) विद्यापीठस्तर (प्रथम, द्वितीय) | २६ |
| (क) राज्यस्तरीय (प्रथम, द्वितीय व तृतीय) | ०३ |
| एकूण पुरस्कार संख्या | १२६ |

❒ ❒

# एका विस्मृत विद्यापीठाचे संस्मरण

डॉ. सूरज अ. पंडित

मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये साधारण सव्वाशे बौद्ध लेण्यांचा एक समूह आहे. कान्हेरी या नावाने परिचित असलेल्या या लेणी समूहाचे प्राचीन नाव 'कण्हगीरी' किंवा 'कृष्णगिरी'असे होते. येथे एक सहस्त्रकाहून अधिक काळ बुद्ध भिक्षूंचा वास होता. भारतातीलच नव्हे तर देश-परदेशीच्या बुद्ध भिक्षूंचेही येथे प्राचीन काळी येण-जाणे असे. आज कान्हेरीची लेणी येथील प्रचीन शिल्पे,



चित्रे, स्थापत्य, जल व्यवस्थापन, शिलालेख आणि पुरातत्त्वीय अवशेष यासाठी ज्ञात आहेत. या बौद्ध भिक्षूसंघाचा उदय इ. स. पूर्व पहिल्या शतकाच्या सुमारास झाला. येथे थेरवाद व माहायान या दोन्ही मतांचे बुद्ध भिक्षू राहत असत. दक्षिण भारतातील पहिली बुद्धमूर्ती याच लेणी समूहात पाहायला मिळते. भारताच्या धार्मिक इतिहासातील कान्हेरीचे योगदान अनन्यसाधारण आहे.

कान्हेरी येथील भिक्षुसंघ प्रथम एक तीर्थक्षेत्र म्हणून नावारूपाला आला. येथे मध्य आशिया, नेपाळ, चीन, श्रीलंका अशा सुदूर प्रदेशातून बुद्ध भिक्षू आणि उपासक येत असत. येथील कला व शिलालेखांमध्ये तसे संदर्भ पाहायला मिळतात. इ. स. च्या चौथ्या - पाचव्या शतकापासून कान्हेरी येथील भिक्षूसंघ हळूहळू एक बौद्ध विद्यापीठ म्हणून विकास पावू लागला. दूरच्या प्रदेशातून येणाऱ्या व्यापाऱ्यांनी यासाठी मोठे अर्थसाहाय्य दिले आणि थोड्याच कळात कान्हेरीचा एक महत्त्वाचे बौद्ध विद्यापीठ म्हणून नावलौकिक झाला. याचा कृष्णगिरी महाविहार असा ऊल्लेख होऊ लागला. इ. स. च्या सातव्या शतकात भारताला भेट देणाऱ्या ह्युएन त्संग या चिनी प्रवासी भिक्षूने कान्हेरीला काही काळ वास्तव्य केले होते. तो म्हणतो, येथे हिनयान व महायान दोन्ही मतांचे भिक्षू राहतात. या भिक्षूसंघात बुद्ध तत्त्वज्ञानाचे व तर्कशास्त्राचे प्रकाण्ड पण्डित दिन्नाग यांचे वास्तव्य होते. कान्हेरीला अनेक आचार्य राहत असत ज्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक बौद्ध भिक्षूंना बौद्धधर्म आणि तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन मिळत असे. अशा ७० हून अधिक आचार्यांचे स्मारक स्तूप कान्हेरीला सापडले आहेत. ही गुरुपरंपरा येथील शिलालेखातही दिसते. कान्हेरीच्या अनेक भिक्षू-भिक्षुणींनी त्यांच्या आचार्यांसाठी दाने दिल्याचे, लेणी खोदल्याचे अनेक उल्लेख येथील शिलालेखात आढळतात. इतकेच नव्हे तर सिंधहून आलेल्या एका उपासकाने सारिपुत्ताच्या शरीरावशेषांवर कान्हेरी येथे स्तूप बांधला होता.


कान्हेरी येथे विविध बौद्ध ग्रंथांचा अभ्यास तसेच निर्मिती होत असे. येथील शिल्प व स्थापत्याचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की सद्धर्मपुंडरीकसूत्र, अमितायुर्ध्यानसूत्र, साधनमाला, एकादशमुख अवलोकितेश्वर सोत्रधारिणी, एकादशमुखम् अशा अनेक बौद्ध महायान सूत्रांचा प्रभाव होता, त्यांचे पठण-अध्ययन होत होते. अशा सूत्रांच्या सामूहिक पठणासाठी कान्हेरी येथे एक विशेष लेणे (क्र. ११) खोदले आहे. याच लेण्याचा ग्रंथालय म्हणूनही उपयोग केला जात असे. इ. स. आठव्या शतकात गौड प्रदेशातील (बंगाल प्रांत) एका उपासकाने कान्हेरीच्या भिक्षुसंघाला लागणाऱ्या ग्रंथांच्या प्रती करण्यासाठी लेखनिक नियुक्तिसाठी अक्षयनिधीचे (फिक्स डिपॉझीट) दान दिले होते. येथे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अशा दानांचा नेहमीच उपयेग होत असे, असे दिसते.


कान्हेरी येथे झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननात काही महत्वाचे पुरावे उजेडात आले आहेत. लेणी क्र. २५ मधील उत्खननात नालंदा विद्यापीठाच्या काही मुद्रा सापडल्या आहेत. यावरील बुद्धस्तुतीपर लेख अगदी स्पष्ट आहेत. यावरून कान्हेरी आणि नालंदा या दोन प्राचीन विद्याध्ययन केंद्रातील सौहार्दाचे संबंध स्पष्ट होतात.


इ. स. च्या दहाव्या- अकराव्या शतकापर्यंत या विद्यापीठाची अशीच भरभराट होत होती. अकराव्या शतकातील एका नेपाळी हस्तलिखितात कान्हेरीचा उल्लेख व वर्णन येते. यावरूनच या विद्यापीठाची दिगंत पसरलेली कीर्ती लक्षात यईल. असे मानले जाते की, तिबेटमध्ये बौद्ध धर्माचा प्रचार करणाऱ्या आतीश दिपंकर श्रीज्ञान या महान बौद्ध आचार्याने बौद्ध धर्माचे प्राथमिक धडे कान्हेरी येथेच गिरवले. असे हे कृष्णगिरी महाविहार या नावाने प्रसिद्धी पावलेले कान्हेरी हे विद्यापीठ आज विस्मृतीच्या पटलाआड गेलेले आहे.

❐ ❐

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, June 2013.
Date of Publication : 10th of every Month




केंद्रीय नागरी सेवा परीक्षेत
महाराष्ट्रात प्रथम आलेल्या
कौस्तुभ दिवेगावकरच्या यशाचे
रहस्य लोकराज्यचे नियमित वाचन
तुम्हीही वाचा आणि
यशाची शिखरे काबीज करा

लोकराज्य

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बराक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे–बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई –४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे